इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक – ३४८ ■ वर्ष – ४१

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

www.emahasatta.com
E-mail : mahasatta@gmail.com

बुधवार, ता. २२ एप्रिल २०२६ | वैशाख शुक्ल ६ | पाने १२ | किंमत ₹ ५.००

Bata FRANCHISE STORE TRANSFER
Welset & Profitable Bata Franchise Showroom
PRIME LOCATION IN ICHALKARANJI
Kindly Contact Interested Party Immediately
9730506050, 9021939778, 8668697618

## अजित दादांच्या स्मृतीयज्ञात मतरुपी आहुती द्या

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे बारामतीकरांना आवाहन

■ बारामती,ता.२१ –

**बारामतीची सांगता सभा म्हणजे अजित दादांच्या स्मृतीचा हा यज्ञ सुरू आहे, या यज्ञात आपली आहुती टाकली नाही तर मनात काहीतरी हुर हुर राहिली असती. त्यामुळेच, दादांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आम्ही इथे आलो आहोत. सुनेत्रा पवार यांना सर्वाधिक रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी करत, बारामतीकरांनी आपल्या मतांची आहुती या स्मृतीयज्ञात द्यायची आहे, नाहीतर आपण करंटे ठरू,असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावनिक आणि तितकेच जबाबदारीचे वक्तव्य केले.**

फडणवीस म्हणाले की,महाराष्ट्राच्या संस्कृतीत अनेकवेळा आपण पाहील आहे की, मोठा नेता गेल्यानंतर निवडणुक आपण बिनविरोध करतो. शरद पवार यांचे आभार मानतो, त्यांचा मला काल फोन आला होता. त्यांनी मला सांगितलं की, आमचा सुनेत्रा पवारांना पूर्ण पाठिंबा आहे. मी काँग्रेस प्रदेशाध्यक्षां देखील विनंती केली, त्यांनी ती विनंती मान्य केली. बारामतीमध्ये सभा घेताना माझ्यापैकी कुणीही आले नसते तरी बारामतीकरांनी रेकॉर्ड ब्रेक मतांनी सुनेत्रा वहिनींना निवडून दिले असते.



आताचा काळ दादांच्या स्मृतींच्या आठवणींच्या यज्ञाचा काळ आहे. त्यामुळे, प्रत्येकजणाने आपली मतरुपी आहुती यात द्यायला पाहिजे. ती आहुती दिली नाही तर तो आपण स्वतःला करंटे ठरू तसेच, बारामतीतून सर्वाधिक मतांनी निवडून येण्याचा रेकॉर्ड अजित दादांचा आहे, आता दादांच्या पश्चात रेकॉर्ड ब्रेक मतांनी वहिनी निवडून येतील, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

ते म्हणाले,दादांच्या पश्चात वहिनींनी कर्तव्याच्या भावनेतून धुरा आपल्या हातात घेतली आहे. अजित दादांसोबत सामाजिक, आर्थिक, शिक्षण क्षेत्रात वहिनीनी काम (पान २ वर)

## प.बंगाल, तामिळनाडूत प्रचार थंडावला

■ नवी दिल्ली,ता.२१ –

**पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुकीसाठीचा प्रचार मंगळवारी संध्याकाळी ५ वाजता थांबला.**



**पश्चिम बंगालमधील पहिल्या टप्प्यातील १५२ जागांसाठी तसेच तामिळनाडूमधील सर्व २३४ जागांसाठी गुरुवारी २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.**

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी ५ वाजल्यापासून दोन्ही राज्यांमध्ये निवडणूक प्रचार पूर्णपणे थांबवण्यात आला असून 'सायलेंस पीरियड' लागू करण्यात आला आहे. नियमांनुसार मतदानाच्या ४८ तास आधी प्रचारावर पूर्ण बंदी लागू होते, जेणेकरून मतदार कोणत्याही दबावाशिवाय स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतील. हे तरतूद लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या कलम १२६ अंतर्गत लागू आहे. या काळात रॅली घेता येत नाहीत तसेच टीव्ही, वृत्तपत्रे किंवा सोशल मीडियावर प्रचार (पान २ वर)

## इराणकडे तडजोडीशिवाय पर्याय नाही

### डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा लवकरच मोठा करार

■ वॉशिंग्टन,ता.२१–



**मी इराणमधील सत्ता बदलली असून अमेरिका आणि इराणमध्ये लवकरच एक मोठा करार होऊ शकतो. सध्याच्या परिस्थितीत इराणकडे तडजोड करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरलेला नाही, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे.**

इराणबरोबर करार झाला नाही तर अमेरिकन लष्कर हल्ल्यासाठी पूर्णपणे तयार आहे आणि आदेश मिळताच कारवाई केली जाईल. माझ्याकडे जास्त वेळ नाही. युद्धविरामाच्या काळात अमेरिकेने आपली लष्करी ताकद वाढवली आहे. आमच्याकडे (पान २ वर)

## कोल्हापूर भूमी अभिलेख झाले 'हायटेक'

■ कोल्हापूर,ता.२१ (प्रतिनिधी) –

**जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागाचे कामकाज अधिक अचूक, वेगवान आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने जिल्हा वार्षिक योजनेतून ३ कोटी ६९ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. भूमी अभिलेख विभागाला खऱ्या अर्थाने 'हायटेक' बनवण्याच्या दिशेने हे एक ऐतिहासिक पाऊल असून, या नव्या यंत्रसामग्रीमुळे नागरिकांना मोजणी, फेरफार आणि अभिलेखाच्या सेवांसाठी होणारा**

### तीन कोटी ६९ लाखांची अत्याधुनिक यंत्रसामग्रीची खरेदी ; कामकाज अधिक अचूक, वेगवान,पारदर्शक होणार

**विलंब संपुष्टात येईल.**

या निधीतून खरेदी केलेल्या अत्याधुनिक यंत्रसामग्रीचे वितरण आणि मोजणी कामाचा शुभारंभ सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते झाला.यावेळी रोव्हर, लॅपटॉप आणि स्कॅनर यांसारख्या अत्याधुनिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

भूमी अभिलेख कार्यालयात मोजणीची कामे वेळेत पूर्ण होत नसल्याने नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त होत होत्या. त्यातच अद्ययावत यंत्रसामग्रीची कमतरता असल्याने कर्मचाऱ्यांनाही काम करताना मर्यादा येत होत्या. (पान २ वर)

## मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणांवर हातोडा

### इचलकरंजीतील राजवाडा चौक ते कोल्हापूर नाक्यापर्यंत अतिक्रमणे हटविली

### अधिकारी व कर्मचाऱ्यांशी काही अतिक्रमणधारकांचा वाद

■ इचलकरंजी,ता.२१ –

**महानगरपालिकेच्या वतीने इचलकरंजी शहराला अतिक्रमणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी मंगळवारपासून विशेष मोहिम हाती घेण्यात आली. राजवाडा चौक ते कोल्हापूर नाका या मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणांवर हातोडा चालविण्यात आला. यावेळी काही अतिक्रमणधारकांकडून अधिकारी व कर्मचाऱ्यांशी वादवादीचे प्रकारही घडले. मात्र प्रशासनाने कोणाचाही मुलाहिजा न बाळगता बेकायदेशीरपणे अडथळा निर्माण झालेले अतिक्रमण हटविण्यात आले. यामध्ये दुकानावरील तसेच समोर ठेवण्यात आलेले फलक, गटारीवर केलेले बांधकाम काढण्यात आले.**

इचलकरंजी शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण वाढत चालले आहे. या संदर्भात नागरिकांतून तक्रारी वाढत चालल्या होत्या. या तक्रारींची दखल घेऊन महापौर उदय धातुंडे यांनी २१ एप्रिलपासून शहर अतिक्रमणमुक्त करण्याची मोहिम सुरु करण्यात येणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार अतिक्रमणधारकांना सूचनाही करण्यात आल्या होत्या. मंगळवारी (२१ एप्रिल) सकाळपासून राजवाडा चौकात अतिक्रमण निर्मुलन पथकासह अधिकारी दाखल झाले. तेथून कारवाईला



मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण जेसीबीच्या सहाय्याने काढताना. (छाया.– मयूर चिंदे)

सुरुवात झाली. दुकानसमोर ठेवण्यात आलेले फलक, दुकानावर लावलेले फलक, गटारीवर केलेले बांधकाम, दुकानाच्या छपऱ्या आदी काढत हे पथक मुख्य मार्गावर आले. पथकाने कारवाई केल्याचे समजताच अनेकांनी स्वत:हून आपले अतिक्रमण काढून घेण्यास सुरुवात केली. गोविंदराव हायस्कुलसमोरील झेरॉक्स सेंटरसमोरील सिमेंटचे कट्टे, जुनी नगरपालिका इमारत परिसरातील अतिक्रमणे हटविण्यात आली. (पान २ वर)

### मुख्य रस्त्यावरील हातगाडे गायब

मुख्य रस्त्यावरीलअतिक्रमण विरोधात मंगळवारपासून कारवाई करण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे मुख्य रस्त्यासह विविध चौकातील विविध खाद्यपदार्थांचे हातगाडे बंद ठेवले होते. तर अनेक जणांनी मुख्य रस्त्यावरील आपला व्यवसाय बंद ठेवून अन्य भागात जाऊन सुरू केल्याची चर्चा होती.

## व्यसनाला कंटाळून बापाकडून मुलाचा चाकूने भोसकून खून

### कोल्हापुरातील घटना : पत्रा लागल्याचा बनाव फसला

■ कोल्हापूर ता.२१(प्रतिनिधी)–

**दारू पिऊन सतत कुटुंबाला त्रास देणाऱ्या पोटच्या मुलाचा बापानेच चाकूने भोसकून खून केल्याची धक्कादायक घटना कोल्हापुरातील विक्रम नगर परिसरात घडली. जुनेद गफूर पठाण (वय २१) असे मृताचे नाव असून, याप्रकरणी राजारामपुरी पोलिसांनी**



मयत जुनेद पठाण



संशयित गफूर पठाण

**संशयित गफूर पठाण (वय ३९) याला अटक केली आहे. खुनानंतर पत्रा लागून मृत्यू झाल्याचा बनाव रचणाऱ्या कुटुंबीयांचा खोटेपणा पोलिसी खाक्या दाखवताच उघड झाला.**

विक्रम नगर येथील (पान २)

## कर्जाच्या वसुलीसाठी शरीर सुखाची मागणी

### खासगी सावकारास बेड्या

■ गांधीनगर,ता.२१(वार्ताहर)–



**कर्जाच्या वसुलीसाठी महिलेचा शारिरीक आणि मानसिक छळ करत शरीर सुखाची मागणी केल्याप्रकरणी खासगी सावकार** (पान २ वर)

## जुन्या पेन्शनसाठी सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर

### शासकीय कार्यालयांत शुकशुकाट

■ कोल्हापूर ता. २१(प्रतिनिधी)–

**जुनी पेन्शन योजना लागू करावी, निवृत्तीचे वय ६० वर्षे करावे आणि रिक्त पदे त्वरित भरावीत, या प्रमुख मागण्यांसाठी राज्यातील १७ लाख सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांनी मंगळवारपासून बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे. या संपामुळे महसूल, शिक्षण आणि आरोग्य विभागासह सर्वच शासकीय कार्यालयांतील कामकाज पूर्णपणे ठप्प झालेय सर्वसामान्यांचे हाल झाल्याचे दिसून आले.** (पान २ वर)

आजच्या अंकात

- वाहतूक पोलिसांचा कारभार ढिसाळ
- टोकाचे निर्णय
- रस्ते अपघाताचे प्रमाण चिंताजनक
- २९ हजार कुटुंबाचे घराचे स्वप्न साकार होणार

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १५३२०० रु. | २६०००० रु. |

अंडी ५७५ रुपये शेकडा

हास्यतुषार –सुरेंद्र दास





## पंचगंगा प्रदूषण मुक्तीसाठी व्यापक लढ्याची गरज

### केवळ इचलकरंजीला लक्ष्य ; इतर गावांतील सांडपाण्याचा प्रश्न अनुत्तरीत

■ इचलकरंजी,ता.२१ –

**पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी शिरोळ तालुक्यातील ग्रामस्थांनी आता आरपारची लढाई सुरू केली आहे. पंचगंगा नदी प्रदूषणाचा प्रश्न फक्त इचलकरंजी शहरापुरता मर्यादित नाही तर कोल्हापुरातील जयंती नाल्यापासून याची व्याप्ती दिसून येत आहे.**

पंचगंगा नदीतील प्रदूषित पाण्यामुळे इचलकरंजीसह शिरोळ तालुक्यातील अनेक गावातील नागरिकांना जगणे मुश्किल झाले आहे.पंचगंगा नदीतील पाणी प्यायल्याने नदी काठावरील अनेक गावांना आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याची तीव्रता लक्षात घेऊन शिरोळ तालुक्यातील ग्रामस्थांनी व्यापक लढा उभारला आहे. त्यानुसार पंचगंगा नदीमध्ये इचलकरंजीतील प्रदूषित पाणी ज्या ओढ्यातून मिसळते तो काळा ओढा चार दिवसांपूर्वी बांध



घालून अडवण्यात येवून त्याचा प्रवाह रोखण्यात आला. काळा ओढा अडवून इचलकरंजीचे नाक दाबण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रसंगी १ मे पासून इचलकरंजीचे पाणी रोखण्याचा इशाराही आंदोलकांनी दिला आहे. परंतु पंचगंगा नदी प्रदूषणास फक्त इचलकरंजी जबाबदार आहे का ? याचाही आंदोलकांनी विचार करण्याची गरज आहे.

कोल्हापुरातील जयंती नाला आणि बापट कॅम्पमधून येणाऱ्या पाण्यामुळे खऱ्या अर्थाने पंचगंगा नदीतील प्रदूषणाच्या तीव्रतेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते.त्याबरोबरच नदीकाठच्या लहान-मोठ्या गावांबरोबर विविध औद्योगिक वसाहती, साखर कारखाने तसेच विविध उद्योगांचे सांडपाणीही तितक्याच ताकदीने नदीत मिसळते.एक थेंबही पाण्यावर प्रक्रिया होत नाही. अशा परिस्थितीत कोल्हापूर महानगरपालिका ही तितकीच जबाबदार आहे. फक्त इचलकरंजी पुरते आंदोलन न करता पंचगंगा नदीतील प्रदूषणाचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याची गरज आहे. फक्त इचलकरंजी महानगरपालिका पर्यंत मर्यादित न राहता जिल्हाधिकाऱ्यांच्या पर्यंत धडक देण्याची गरज आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नागरिकांच्या जीवन मरणाचा प्रश्न असल्याने यामध्ये लक्ष घालून हा प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. पंचगंगा नदीतील प्रदूषण नाहीसे करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

#### प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कारवाईबाबत प्रश्नचिन्ह

पंचगंगा नदी प्रदूषणाबाबत कोल्हापूर महानगरपालिका,इचलकरंजी महानगरपालिका,विविध उद्योग,साखर कारखान्यांवर प्रदूषण नियंत्रण मंडळाने यापूर्वी कारवाई केली आहे.मात्र ही कारवाई केवळ कागदोपत्रीच राहिल्याने प्रदूषणाचा प्रश्न कायम राहिला आहे.त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कारवाईबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

#### लोकप्रतिनिधी कोठे आहेत ?

लोकप्रतिनिधींनी मनावर आणले तर कोणतीही गोष्ट शक्य करून दाखवू शकतात. खासदार धैर्यशील माने, आमदार राहुल आवाडे, आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर या लोकप्रतिनिधींनी आता पंचगंगा नदीतील प्रदूषणाकडे लक्ष दिले पाहिजे.प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि शासन दरबारी पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत व तातडीने उपाययोजना करावी, अशीही मागणी नागरिकांतून होत आहे.

#### शुद्ध आणि मुबलक पाणी

इचलकरंजी शहराला शुद्ध आणि मुबलक पाणी देण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून होत आहे. याचा अर्थ इचलकरंजी शहरातील नागरिकांनाही शुद्ध पाणी मिळत नाही हा आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांनी अशा आंदोलनाला बळ दिले पाहिजे. जनतेचा रेटा असल्याशिवाय प्रदूषणाचा प्रश्न निकाली निघणे अशक्य आहे.



इचलकरंजी महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथकाने मंगळवारी मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्याची मोहिम राबविली यावेळी अतिक्रमणधारक व अधिकाऱ्यांमध्ये वाद झाला. (छाया. – छोटुसिंग)

# मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणांवर हातोडा

### महापौर यांच्याकडून कारवाईची पाहणी

शहरातील राजवाडा चौक ते कोल्हापूर नाकापर्यंतचा मुख्य रस्ता आज अतिक्रमणमुक्त करण्यात आला. सदर कारवाईची पाहणी महापौर उदय धातुंडे, उपमहापौर अनिल डाळ्या व स्थायी समितीचे अध्यक्ष सतीश मुळीक यांनी केली.सदरची कारवाई सुरूच राहणार असल्याची माहिती महापौर उदय धातुंडे यांनी दिली.

(पान १ वरून)

मुख्य रस्त्यावरुन कॉ. मलाबादे चौक एकेरी मार्गातून शिवतीर्थकडे हे पथक आले. दरम्यानच्या परिसरातील वाहतूकीला अडचणीची ठरणारी अतिक्रमणे काढण्यात आली.

शिवतीर्थपासून राजर्षि शाहू महाराज पुतळा मार्गावर अतिक्रमण हटविण्यात येत असताना यशवंत प्रोसेस परिसरातील एका विक्रेत्याने त्याचे दुकानसमोरील अतिक्रमण हटवत असताना अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत वाद घातला. मात्र प्रशासनाने बेकायदेशीर असलेले अतिक्रमण हटवले. त्यानंतर दुकानासमोरील छपऱ्या, गटारीवरील सिमेंटचे कट्टे आदी जेसीबीच्या सहाय्याने काढून टाकण्यात आले.

यावेळी प्रशासनाकडून दुजाभाव केला जात असल्याचा आरोपही काहीजणांकडून करण्यात येत होता. मात्र प्रशासनाने ही मोहिम सुरु ठेवली. ही मोहिम अखंडीतपणे सुरु ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

या कारवाईचे नागरिकांतून स्वागत करण्यात येत असून ही मोहिम दिखाव्याची न राहता कायमस्वरुपी अतिक्रमण हटविण्यासाठी असावी, अशी मागणी होत आहे.

या मोहिमेत उपायुक्त नंदु परळकर, रोशनी गोडे, विद्या कदम, सर्व्हेअर सुतार, नगरअभियंता अभय शिरोलीकर, नगर रचनाकार चौगुले, अतिक्रमण निर्मुलन पथकाचे प्रमुख सुभाष आवळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व २ जेसीबी,२ ट्रॅक्टर व अन्य वाहनांचा ताफा सहभागी होता.

### मुख्य रस्त्याने घेतला मोकळा श्वास...

मुख्य रस्त्यावर मिळेल त्या जागेवर अतिक्रमण करून व्यवसाय करणाऱ्या लहान –मोठ्या विक्रेत्यांची मोठी संख्या होती. या प्रकारामुळे पादचाऱ्यांसह वाहनधारकांना तारेवरची कसरत करायला लागते.तसेच वारंवार वाहतूक कोंडी होत होती. मात्र, आजपासून सुरू झालेल्या कारवाईमुळे मुख्य रस्त्याने मोकळा श्वास घेतला.सदरच्या कारवाईमुळे नागरिकांतून तसेच वाहनधारकांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

# व्यसनाला कंटाळून बापाकडून मुलाचा चाकूने भोसकून खून

(पान १ वरून)

स्वामी समर्थ मंदिराजवळ राहणारा गफूर पठाण याचा चिकन विक्रीचा व्यवसाय आहे. त्याचा थोरला मुलगा जुनेद हा भंगार दुकानात काम करत होता, मात्र त्याला दारूचे व्यसन होते. सोमवारी परिसरात शिवजयंतीची मिरवणूक सुरू असताना जुनेद दारूच्या नशेत

नाचत होता. हे पाहून रागावलेल्या गफूरने त्याला ओढत घरी आणले. घरी आल्यावर बाप–लेकात दारूवरून जोरदार वाद झाला. या वादात जुनेदने वडिलांच्या कानशिलात मारली, ज्यामुळे संतापलेल्या गफूरने घरातील चाकू काढून जुनेदच्या बरगडीत भोसकला.

चाकू लागल्याने गंभीर जखमी झालेल्या जुनेदला कुटुंबीयांनी तातडीने सीपीआर रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पोलिसांच्या कारवाईपासून वाचण्यासाठी कुटुंबीयांनी अंगावर पत्र्याचे तुकडे पडल्याने जुनेदचा मृत्यू झाला अशी खोटी माहिती सीपीआर पोलीस चौकीत दिली. राजारामपुरी पोलिसांनी रात्री या प्रकरणाची नोंद घेतली, मात्र मृत्यूचे कारण संशयास्पद वाटल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदन करण्याचा निर्णय घेतला. पोलीस नाईक शाहू तळेकर, अमोल पाटील आणि विशाल शिरगावकर यांनी आज सकाळी गफूर पठाणला ताब्यात घेऊन चौकशी केली. सुरुवातीला त्याने पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, पण पोलिसी खाक्या दाखवताच त्याने आपणच चाकूने भोसकून मुलाचा खून केल्याची कबुली दिली.सहाय्यक पोलीस निरीक्षक रणजीत पाटील यांनी पथकासह विक्रम नगर येथील घरात जाऊन घटनेचा पंचनामा केला. आरोपी गफूर पठाण याला खुनाच्या गुन्ह्याखाली अटक करण्यात आली आहे.

# अकृषिक रुपांतरण अधिमूल्य ऑनलाइन भरण्याची सुविधा

## इमारत परवानगी व्यवस्थापन प्रणालीचे लोकार्पण

■ मुंबई, ता.२१(प्रतिनिधी)–

**राज्यात जमिनीच्या बिगरशेती वापरासाठी आवश्यक असलेल्या अकृषिक (एनए) रुपांतरण प्रक्रियेला आजपासून अधिक सुलभ आणि पारदर्शक बनविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले.**

इमारत परवानगी व्यवस्थापन प्रणाली (बीपीएमएस) या ऑनलाइन प्रणालीमध्ये अकृषिक रुपांतरण अधिमूल्य भरण्याची सुविधा आजपासून उपलब्ध करून देण्यात असून, या नव्या सुविधेचे उद्घाटन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते मंत्रालयात झाले. या प्रणालीमुळे नागरिकांना एका क्लिकवर ऑनलाईन पद्धतीने रूपांतरण अधिमूल्य भरता येणार असून, त्याची नोंद थेट ७/१२ उताऱ्यावर होणार आहे.

**बीपीएमएसच्या धर्तीवरच ऑटो डीसीआर प्रणालीमध्येही आवश्यक सुधारणा करण्याची कार्यवाही युद्धपातळीवर सुरू आहे. पुढील १० दिवसांत हे काम पूर्ण होईल, ज्यामुळे मोठ्या विकास प्रकल्पांच्या मंजुरीची प्रक्रिया अधिक सुलभ होईल.राज्यातील नागरिकांना घरांचे किंवा व्यावसायिक प्रकल्पांचे बांधकाम करताना अकृषिक परवानगीसाठी अनेक महिने वाट पाहावी लागत होती. ही प्रक्रिया डिजिटल केल्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढेल.**

**– चंद्रशेखर बावनकुळे,महसूलमंत्री**

महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत करण्यात आलेल्या सुधारणेनुसार, जमिनीच्या अकृषिक वापराबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. याच निर्णयाला तांत्रिक जोड देण्यासाठी बीपीएमएस प्रणाली गो–लाईव्ह करण्यात आली. यामुळे नागरिकांना जमिनीवर विकास परवानगी किंवा बांधकाम आराखडे मंजूर करून घेतानाच एकरकमी रूपांतरण अधिमूल्य भरण्याची सुविधा एकाच छताखाली उपलब्ध झाली आहे.

या प्रणालीची प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे बिगरशेती वापरासाठी आवश्यक असणारे एकरकमी रूपांतरण अधिमूल्य आता पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने भरता येईल. नागरिकांना सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याची गरज उरणार नाही. अधिमूल्य भरल्यानंतर त्याची माहिती महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीशी जोडली गेली असल्याने, सातबारा उताऱ्यावर त्याची नोंद स्वयंचलित पद्धतीने घेतली जाणार आहे.



मुरगूड येथील जाधव गल्ली समोरील उपद्रवी झाड.

# मुरगूडमधील उपद्रवी झाडाचा बंदोबस्त करा ; अन्यथा आंदोलन

■ मुरगूड ता.२१(प्रतिनिधी)–

**येथील गावभागातील जाधव गल्लीच्या कोपऱ्यावरील नागरी वस्तीतील पिंपळाचे मोठे झाड उपद्रवी ठरत आहे.त्यापासून जीवितहानीचा धोका आहे.त्यामुळे या झाडाचा बंदोबस्त करावा अन्यथा आंदोलन करावे लागेल, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.**

रोहिदासवाडा ते जाधव गल्ली दरम्यान श्री डोंगळे यांच्या घराच्या पाठीमागे पिंपळाचे झाड फार जुन्या काळापासून आहे.त्याचा विस्तार खूप वाढल्याने झाडांची मुळे पसरत आजूबाजूच्या घरापर्यंत जावून भिंतींना तडे गेले आहेत तर झाडांच्या फांद्या उंच वाढून त्या घरांच्या छपरावर वारंवार पडून नुकसान होत आहे. काही फांद्या विद्युतवाहिनीच्या आरपार गेल्याने त्या केबल केव्हाही तुटून पडल्यास कोणत्याही क्षणी जीवितहानी होवू शकते.त्यामुळे स्थानिक नागरिकांना या झाडापासून धोका निर्माण झाल्याने सदरचे झाड काढून अथवा छाटून घेणे काळाची गरज आहे.वीज वाऱ्यासहित वळीव पाऊस पडल्यास मोठा अनर्थ होण्याची भीती वर्तविली जात आहे.त्यामुळे या उपद्रवी झाडाचा नगरपालिका प्रशासनाने वेळीच बंदोबस्त करावा अशी मागणी प्रकाश कापसे, मानसिंग गोधडे,सुदर्शन डोंगळे,धनाजी गोधडे,जयवंत पाटील,रंगराव भोसले,कुषिकेश सोरटे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### बद्रीनाथ धामचे दरवाजे उद्या उघडणार

डेहराडून,ता.२१–

**चारधाम यात्रेतील एक प्रमुख थांबा असलेल्या बद्रीनाथ धामचे दरवाजे २३ एप्रिल रोजी सकाळी ६:१५ वाजता भाविकांसाठी उघडतील. दरवाजे उघडण्याच्या परंपरेनुसार, मंगळवारी नृसिंह मंदिरातील ज्योतिर्मठ येथे पूजा झाल्यानंतर, आदि गुरू शंकराचार्यांचे पवित्र सिंहासन आणि भगवान गरुडाची उत्सवी पालखी वैदिक मंत्रोच्चारांसह बद्रीनाथ धामकडे रवाना झाली.**

आदि गुरू शंकराचार्यांचे पवित्र सिंहासन आणि गरुडाच्या उत्सवी मूर्तीला वैदिक मंत्रोच्चारांच्या गजरात औपचारिकपणे बद्रीनाथ धामकडे रवाना करण्यात आले. २२ एप्रिल रोजी उद्धवजी, कुबेरजी आणि शंकराचार्य गद्दी योग बद्री पांडुकेश्वर येथून बद्रीनाथ धाम येथे पोहोचतील. गरुडजींची डोली आधीच रवाना झाली आहे.

# कोल्हापूर भूमी अभिलेख झाले 'हायटेक'

(पान १ वरून)

याची दखल घेत जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आला.

पालकमंत्री आबिटकर यांनी, केवळ साहित्याचे वितरण करून हे काम थांबणार नाही, तर या साधनांचा प्रत्यक्ष वापर प्रभावीपणे झाला पाहिजे. नागरिकांना या आधुनिकतेचा थेट फायदा मिळणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर १० जून रोजी विशेष आढावा बैठक घेऊन नवीन यंत्रसामग्रीचा किती वापर झाला, मोजणी कामाची गती किती वाढली आणि नागरिकांना त्यातून किती दिलासा मिळाला, याची शहानिशा केली जाईल. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून राबवल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने अधिक जबाबदारीने काम करावे, असे आवाहन केले. यावेळी आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख शिवाजीराव भोसले, उपजिल्हाधिकारी शक्ति कदम, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जयवंत उगले व सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी उपस्थित होते.

**या निधीतून १८ आधुनिक रोव्हर मशीन, २६ लॅपटॉप आणि १४ स्कॅनरची खरेदी करण्यात आली आहे. यापूर्वी साधनांच्या अभावामुळे एकाच रोव्हर मशीनवर तीन–तीन कर्मचाऱ्यांना काम करावे लागत होते, मात्र आता पुरेशा साहित्यामुळे कामकाजाचा वेग वाढणार असून प्रलंबित मोजणी प्रकरणे तातडीने निकाली निघण्यास मदत होणार आहे.**

जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख शिवाजीराव भोसले यांनी सांगितले की, कोल्हापूर जिल्ह्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली ही अत्याधुनिक यंत्रसामग्री संपूर्ण महाराष्ट्रात क्वचितच कुठे पाहायला मिळेल. सध्या जिल्ह्यातील भूमापनाचे १०० टक्के काम हे जीपीएस आधारित रोव्हर तंत्रज्ञानावरच केले जात असून, दरमहा सुमारे ५ हजार मिळकत नोंदी 'ई–पीसीआयएस' प्रणालीद्वारे ऑनलाइन पद्धतीने पूर्ण केल्या जात आहेत. आता नव्याने प्राप्त झालेल्या साधनांमुळे जिल्ह्यातील मोजणी, फेरफार आणि अभिलेखाच्या सर्व सेवा अधिक गतिमान, पारदर्शक आणि कमालीच्या अचूक पद्धतीने नागरिकांना उपलब्ध होतील.

### इराणकडे तडजोडीशिवाय पर्याय नाही

(पान १ वरून)

मोठ्या प्रमाणात दारूगोळा उपलब्ध असून आम्ही या वेळेचा वापर पूर्ण तयारीसाठी केला आहे, असा इशाराही ट्रम्प यांनी दिला.दुसरीकडे, अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी वेंस पाकिस्तानसाठी रवाना होतील. वेंस यांच्यासोबत विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि डोनाल्ड ट्रम्प यांचे जावई जेरेड कुशनर हे देखील पाकिस्तानला पोहोचतील.

दरम्यान,डोनाल्ड ट्रम्प यांनी उपराष्ट्राध्यक्ष जेडी वेंस यांच्या नेतृत्वाखाली वाटाघाटींसाठी एक पथक इस्लामाबादला पाठवण्याची तयारी दाखवली असली, तरी इराणला आता अमेरिकेसोबत शांतता चर्चेत कोणताही रस उरलेला नाही. इराणने वारंवार सांगितले आहे की, धमक्या आणि चर्चा एकाच वेळी होऊ शकत नाहीत. तसेच, जोपर्यंत अमेरिका इराणी बंदरांवरील नाकेबंदी हटवत नाही, तोपर्यंत कोणत्याही प्रकारच्या चर्चा शक्य नाहीत. अमेरिकेसोबत पुढील फेरीची चर्चा करण्याची तेहरानची कोणतीही योजना नाही.जर अमेरिका इस्लामाबादमध्ये कोणतेही पथक पाठवत असेल, तर तो त्यांचा स्वतःचा विषय आहे.असे इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी सांगितले.

# कर्जाच्या वसुलीसाठी शरीर सुखाची मागणी

(पान १ वरून)

अमित कृष्णात सावंत (वय ३५, रा.रोहिदास चौक, गडमुडशिंगी, ता. करवीर) याच्याविरोधात गांधीनगर पोलीसांत गुन्हा दाखल झाला. याप्रकरणी संशयिताला अटक केली असून न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. संबंधित पीडित महिला सामाजिक संस्थेत काम करते. सन २०२३ साली आर्थिक अडचणींमुळे या महिलेने अमित सावंतकडून दोन लाख रुपये १० टक्के व्याजाने घेतले होते. अमित सावंत हा कारवर चालक म्हणून काम करतो. सुरुवातीचे काही महिने नियमित व्याज दिल्यानंतर या महिलेची आर्थिक अडचण वाढत गेली. या महिलेच्या या परिस्थितीचा गैरफायदा घेत पीडितेकडे त्याने शरीरसुखाची मागणी केली. महिला एकटी घरी असताना जबरदस्तीने तिच्यावर अत्याचार केले. त्यानंतर शरीरसंबंधाचे चित्रीकरण केले. दरम्यानच्या काळात पीडित महिलेने कर्जापोटी व्याजासह दोन लाख, दहा हजार रुपये परत केले होते. परंतु उर्वरित पंचवीस हजार रुपयांसाठी त्याने पीडित महिलेवर अत्याचार केले. त्यानंतर हे व्हिडिओ कारमालकाला पाठवले. या प्रकरणाचा जाब विचारण्यासाठी पीडितेचा जावई गेला असता जावयाला बेदम मारहाण केली. बदनामीच्या भीतीने शांत असलेल्या पीडितेने अखेरीस गांधीनगर पोलिसांत धाव घेतली.

# अजित दादांच्या स्मृतीयज्ञात मतरुपी आहुती द्या

(पान १ वरून)

केले आहे. त्यामुळे राजकारण देखील त्यांनी जवळून बघितले आहे. मागील दोन अडीच महिन्यात वहिनींचे काम पाहिले, त्यानंतर मी दाव्याने सांगतो,दादांची सगळी स्वप्न पूर्ण करण्याची क्षमता सुनेत्रा पवार यांच्यामध्ये आहे.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असणारे नेतृत्व म्हणजे अजित पवार, महाराष्ट्राला कुठे न्यायचे आहे याची कल्पना असणारे नेतृत्व म्हणजे अजित पवार होते. आम्ही एकमेकांच्या विरोधात काम केले परंतु वैयक्तिक जिव्हाळा आमचा कधीच संपला नाही. दादांसोबत काम करण्याचा आनंद वेगळा होता, कारण दादांचा स्वभाव रोखठोक होता. अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत अनेकांच्या मनात शंका आहेत, मात्र, या अपघाताचे सत्य बाहेर आल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही, असे बारामतीकरांना उद्देशून सांगितले.

# जुन्या पेन्शनसाठी सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर

(पान १ वरून)

कोल्हापूर जिल्ह्यातील राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी मध्यवर्ती संघटनेचे राज्य संघटक अनिल लवेकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील महावीर उद्यान येथे एकत्र येत जोरदार निदर्शने करण्यात आली. ''एकच मिशन, जुनी पेन्शन'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. यावेळी कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्या मान्य होईपर्यंत माघार घेणार नसल्याचा पवित्रा घेतला आहे.

या संपात केवळ मंत्रालयातील कर्मचारीच नव्हे, तर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि चतुर्थश्रेणी कर्मचारीही मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनीही संपाला पाठिंबा दिल्याने आरोग्य सेवेवर परिणाम झाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कचेरी आणि इतर शासकीय विभागांमध्ये अधिकारी उपस्थित असले तरी कर्मचारी नसल्याने शुकशुकाट पाहायला मिळत होता.

**संपाचा वाढता प्रभाव पाहता, यावर तोडगा काढण्यासाठी मंत्रालय पातळीवर सायंकाळपर्यंत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठका सुरू होत्या. मात्र, ठोस निर्णय होत नाही तोपर्यंत संप सुरूच ठेवण्याचा निर्धार कर्मचारी संघटनांनी व्यक्त केला आहे. या आंदोलनामुळे ग्रामीण भागातील शाळा आणि शासकीय कार्यालयांतील प्रशासकीय चक्र पूर्णपणे थांबले आहे.**

दुसरीकडे, प्रशासनाने संपावर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध कडक भूमिका घेतली आहे. अत्यावश्यक सेवांमध्ये मोडणाऱ्या विभागांनी संपात सहभाग घेतल्यास त्यांच्यावर मेस्मा (अत्यावश्यक सेवा कायदा) अंतर्गत कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. तसेच विभागप्रमुखांना संपकाळात मुख्यालय न सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# प.बंगाल, तामिळनाडूत प्रचार थंडावला

(पान १ वरून)

करणेही प्रतिबंधित आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाईची तरतूद आहे.मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी आणि शंभर टक्के मतदान सुनिश्चित करण्यासाठी निवडणूक आयोगाने व्यापक जनजागृती मोहीम सुरू केली आहे.

तामिळनाडूमध्ये यंदा एकूण ४,०२३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. येथे द्रविड मुनेत्र कळघम (डीएमके) आणि अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघम (एआयएडीएमके) यांच्या आघाडीतील थेट लढत अपेक्षित आहे. तसेच अभिनेता ते राजकारणी बनलेले विजय यांच्या तमिळगा वेट्री कळघम (टीव्हीके) पक्षामुळे अनेक मतदारसंघांमध्ये तिरंगी लढत पाहायला मिळत आहे. पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात १६ जिल्ह्यांतील १५२ जागांवर मतदान होणार आहे. या टप्प्यात १,४७८ उमेदवार रिंगणात असून सुमारे ३.६० कोटी मतदार आपला हक्क बजावतील.मुर्शिदाबाद (२२), कूचबिहार (९), जलपाईगुडी (७), अलिपुरद्वार (५), कालिम्पाँग (१), दार्जिलिंग (५), उत्तर दिनाजपूर (९), दक्षिण दिनाजपूर (६), मालदा (१२), बीरभूम (११), पश्चिम बर्धमान (९), पूर्व मेदिनीपूर (१६), पश्चिम मेदिनीपूर (१५), झारग्राम (४), पुरुलिया (९) आणि बांकुडा (१२) अशा जागांचा समावेश आहे.पहिल्या टप्प्यात १,४७८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. एकूण मतदारसंख्या ३,६०,७७,१७१ इतकी असून त्यात १,८४,९९,४९६ पुरुष, १,७५,७७,२१० महिला आणि ४६५ ट्रान्सजेंडर मतदारांचा समावेश आहे.पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी भवानीपूर मतदारसंघातून तृणमूल काँग्रेसच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवत असून त्यांची थेट लढत भाजपच्या उमेदवाराशी आहे.

**पश्चिम बंगालच्या २९४ सदस्यीय विधानसभेसाठी दोन टप्प्यांत मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यात २३ एप्रिल रोजी १५२ जागांवर आणि दुसऱ्या टप्प्यात २९ एप्रिल रोजी १४२ जागांवर मतदान होईल. तर तामिळनाडूमध्ये सर्व २३४ जागांसाठी एकाच टप्प्यात २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. दोन्ही राज्यांची मतमोजणी ४ मे रोजी होईल.**

॥ दुःखद निधन ॥



श्री. विवेक रावसाहेब पाणदारे

माझा मुलगा श्री. विवेक रावसाहेब पाणदारे याचे मंगळवार, दि. २१/०४/२०२६ रोजी वयाच्या ४५ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

रावसाहेब आप्पासाहेब पाणदारे

▪ पाणदारे परिवार ▪

इचलकरंजी–शिरढोण

माती सावडणे विधी– गुरूवार, दि.२३/०४/२०२६ रोजी सकाळी ८.३० वा. लिंगायत रूद्रभुमी, इचलकरंजी

॥ दुःखद निधन ॥



श्री. भैरू गणपती वेटाळे

यांचे सोमवार, दि. २०/०४/२०२६ रोजी वयाच्या ७३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

वेटाळे परिवार

इचलकरंजी

सेनापती कापशी ✻ नंद्याळ

✻ रक्षाविसर्जन– आज बुधवार, दि. २२/०४/२०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता पंचगंगातिरी, इचलकरंजी



कै. इरगोंडा म्हादगोंडा पाटील

सातवे पुण्यस्मरण!

कबनूर गावचे,माजी सरपंच

कै. इरगोंडा म्हादगोंडा पाटील

यांच्या सातव्या पुण्यस्मरणदिनी आमची भावपूर्ण श्रद्धांजली !

श्रीमती सुमन इरगोंडा पाटील
श्रीमती पार्वती शिवगोंडा पाटील

पी.एम.पाटील, सचिन पाटील, प्रमोद पाटील, आदित्य पाटील
आप्पासो पाटील, मनोज पाटील, अमोल पाटील, हर्षवर्धन पाटील
सुधीर पाटील (माजी सरपंच, कबनूर), रजत पाटील

पाटील परिवार, कबनूर.

# इचलकरंजीत वाहतूक पोलिसांचा कारभार ढिसाळ

## नागरिक संतप्त; अतिक्रमण निमुर्लन मोहिमेत समन्वयाचा अभाव

इचलकरंजी,ता.२१– शहरातील अंतर्गत वाहतूक व्यवस्थेचा अक्षरश: बोजवारा उडाल्याचे चित्र सध्या सर्वत्र दिसून येत आहे. या परिस्थितीस थेट वाहतूक पोलीस विभाग जबाबदार असल्याची तीव्र भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. महानगरपालिकेकडून अतिक्रमणविरोधी जोरदार मोहीम सुरू असताना, वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी असलेल्या विभागाची निष्क्रियता उघडपणे समोर आली आहे. परिणामी, शहरातील सामान्य नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असून प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महापालिकेकडून शहरातील प्रमुख रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेचा उद्देश रस्ते मोकळे करून वाहतूक सुरळीत करणे हा असला, तरी प्रत्यक्षात मात्र, उलट चित्र दिसून येत आहे. अतिक्रमण हटविण्याच्या कारवाई दरम्यान जेसीबी, ट्रक, कर्मचारी आणि मोठ्या प्रमाणावर नागरिकांची उपस्थिति यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. योग्य नियोजनाचा अभाव असल्यामुळे मुख्य मार्गांवर प्रचंड वाहतुकीची कोंडी निर्माण झाली असून वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळते.सर्वात गंभीर बाब म्हणजे, या ठिकाणी वाहतूक नियंत्रणासाठी वाहतूक पोलिसांचा कुठेही मागमूस दिसत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

याउलट, शहराच्या बाहेरील नाक्यांवर मात्र, वाहतूक पोलीस मोठ्या प्रमाणावर वाहनांची तपासणी करताना आणि नियमभंगाच्या पावत्या फाडताना दिसत आहेत. विशेषत: शिवतीर्थ परिसरात येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांवर कारवाई करताना ते दिसून आले. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. जिथे प्रत्यक्षात वाहतूक नियंत्रणाची गरज आहे, तिथे पोलीस नाहीत आणि जिथे परिस्थिती तुलनेने सुरळीत आहे, तिथेच दंड वसुली सुरू आहे,अशी संतप्त प्रतिक्रिया अनेक वाहनचालकांनी दिली.

तेव्हा वाहतूक नियंत्रण कक्षाने संवेदनशील ठिकाणी कायमस्वरूपी वाहतूक नियंत्रणासाठी कर्मचारी तैनात करणे, अतिक्रमण मोहिमेदरम्यान पर्यायी मार्गांची पूर्वसूचना देणे, नागरिकांशी संवाद साधणे आणि तांत्रिक साधनांचा वापर करून वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी करणे ,यावर उपाययोजना राबविण्याचीही गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे.

> शहरातील सांगली रोड, यड्राव फाटा,महासत्ता चौक, झेंडा चौक, मरगुबाई मंदिर चौक,डेक्कन चौक, थोरात चौक, आण्णा भाऊ साठे मैदान परिसर, मेन रोड, शिवतीर्थ परिसर तसेच उत्तम – प्रकाश चित्रमंदिर चौक हे शहरातील सर्वाधिक वर्दळीचे आणि संवेदनशील भाग मानले जातात. या ठिकाणी नेहमीच वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात असतो. त्याठिकाणी वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांनी अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

> वाहतूक पोलिसांचे काम फक्त नाक्यावर उभे राहून पावत्या फाडणे एवढेच राहिले आहे काय? असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरात वाहतूक कोंडीने नागरिक हैराण झालेले असताना वाहतूक पोलीस दिसत नाहीत, मात्र दंड वसुलीमध्ये ते अतिशय तत्पर असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या कारभाराबद्दल नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.




## विवाहितेचा छळ; पतीसह चारजणांवर गुन्हा

**इचलकरंजी,ता.२१– चारित्र्यावर संशय घेण्यासह शिवीगाळ करत माहेरुन पैसे आणण्यासाठी शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह चौघांवर शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

या प्रकरणी सौ. हेमलता उर्फ राणी जुगलकिशोर तापडिया (वय ४२ रा. वसंत कॉलनी तांबेमाळ) हिने फिर्याद दिली आहे.याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, संशयित जुगलकिशोर तापडीया, ओमप्रकाश तापडीया, सत्यनारायण तापडीया व चांदादेवी बंग (सर्व रा. तांबेमाळ) हे हेमलता हिच्यावर चारित्र्याचा संशय घेत होते. त्याचबरोबर तिला माहेरी नेऊन सोडण्यासह नातेवाईकांना तिच्या चारित्र्याबद्दल सांगत शिवीगाळ करत होते. त्याचबरोबर माहेरुन पैसे आणण्यासाठी तिचा शारिरिक व मानसिक छळ केला जात असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## आर्थिक कारणावरून एकास मारहाण

**सांगली,ता.२१(प्रतिनिधी)– उचल म्हणून घेतलेल्या पैशाच्या देवाणघेवाणीतून एकाला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना माधवनगर परिसरात घडली आहे.**

याप्रकरणी जखमी इब्राहिम अलाही शेख (वय ४२, रा. शुक्रवार पेठ, माधवनगर) यांनी संजयनगर पोलीसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी संशयित अनिकेत अनिल कोळी (रा. कॉटन मिल चाळ, माधवनगर ) याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. संशयिताने फिर्यादी शेख यांच्याकडून काही रक्कमेची उचल घेतली होती. पैसे देण्याच्या कारणावरुन कोळी याने शेख यांना मारहाण केली.


### वीरशैव उत्कर्ष मंडळ, इचलकरंजी

**शिक्षक पाहिजेत**

ज्ञानबातात्या दत्तवाडे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज इचलकरंजी स्कूलसाठी संस्था मानधन तत्वावर खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्रं. | शैक्षणिक पात्रता | विषय | पद संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | B.A./M.A.,B.Ed. | सर्व विषय (मराठी,हिंदी,इंग्लिश, सामाजिक शास्त्र) | प्रत्येकी १ |
| ०२ | B.Sc./M.Sc.,B.Ed. | सेमी इंग्लिश, बायोलॉजी/फिजिक्स, केमिस्ट्री/गणित | प्रत्येकी १ |
| ०३ | B.Com./M.Com.,B.Ed. | अकौंटन्सी/वाणिज्य/संघटन/अर्थशास्त्र | प्रत्येकी १ |
| ०४ | MCA / M.Sc.Comp.Sci. | माहिती तंत्रज्ञान /AI तंत्रज्ञान | प्रत्येकी १ |
| ०५ | B.Com. Computer | डेटा एन्ट्री व Tally ऑपरेटर | १ |

अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज शनिवार, दि. ३०/०४/२०२६ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावा.

पत्ता : **ज्ञानबातात्या दत्तवाडे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज**
इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. शिव मंदिर परिसर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी.
संपर्क क्रमांक : ७७०९४९९८३३, ९९७५०६७०२१

सही/–अध्यक्ष

टीप : फक्त निवडलेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलवण्यात येईल



### ।। हार्दिक अभिनंदन ।।



कु. स्नेहल संतोष भरमगोंडा | कु. निखिल संजय कांबळे

मराठा मंडळ संचलित छत्रपती शाहू अभ्यासिका व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राचे विद्यार्थी, कु. स्नेहल संतोष भरमगोंडा व कु. निखिल संजय कांबळे यांची महाराष्ट्र पोलीसमध्ये 'कॉन्स्टेबलपदी' निवड झालेबद्दल हार्दिक अभिनंदन..!

**मराठा मंडळ, इचलकरंजी**



### ।। हार्दिक अभिनंदन ।।



आमचे नेते — मा.श्री. प्रकाशरावजी आवाडे, मा.आमदार व वस्त्रोद्योग मंत्री महाराष्ट्र राज्य

आशिर्वाद — इंटक नेते कै.शामराव श्रीपाद कुलकर्णी

श्री. राजेंद्र दत्तात्रय बचाटे, जॉ. सेक्रेटरी | श्रीमती विजयालक्ष्मी अशोक कुलकर्णी, जनरल सेक्रेटरी

राष्ट्रीय प्रोसेसिंग कामगार संघटना (इंटक) या संस्थेच्या जनरल सेक्रेटरीपदी **श्रीमती विजयालक्ष्मी अशोक कुलकर्णी** व जॉ. सेक्रेटरीपदी **श्री. राजेंद्र दत्तात्रय बचाटे** यांची निवड झालेबद्दल हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा..!

■ प्रकाश शंकर निकम ■ **गुरूमाऊली गारमेंट** | ■ प्रणव प्रकाश निकम ■ **गुरूमाऊली टेक्सफॅब**

■ विजय राजाराम चव्हाण, इचलकरंजी ■





हरित क्रांतीचे प्रणेते

भाजपा

कागल तालुक्याचे भाग्यविधाते,
अन्नपुर्णाचे संस्थापक, चेअरमन,
के.डी.सी.सी. बँकेचे संचालक

**मा. आमदार संजयबाबा घाटगे**

यांना वाढदिवसाच्या

२२ एप्रिल

हार्दिक शुभेच्छा

मा. अंबरिषसिंह घाटगे — संचालक : गोकुळ दुध संघ

सौ.सुयशा अंबरिषसिंह घाटगे — सदस्या : जिल्हा परिषद, कोल्हापूर

**मा.आम.संजयबाबा घाटगे**
संस्थापक चेअरमन : श्री अन्नपूर्णा शुगर केनवडे
तज्ञ संचालक : के. डी. सी. सी. बँक, कोल्हापूर

--* शुभेच्छुक *--

- श्री अन्नपूर्णा शुगर अँण्ड जॅगरी वर्क्स लि., केनवडे
- श्री अन्नपूर्णा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या., व्हनाळी
- श्री अन्नपूर्णा भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्था मर्या.,केनवडे

* टिप : मा. आम. संजयबाबा घाटगे साहेब नियोजित कार्यक्रमानिमित्त बाहेरगावी असल्याने वाढदिवसाच्या शुभेच्छा स्विकारण्यासाठी उपस्थित असणार नाहीत.

महासत्ता

सुविचार :- स्वतःचा विकास करा, लक्षात ठेवा गती आणि वाढ हीच जिवंतपणाची लक्षणे आहेत.



■ संपादकीय ■

# टोकाचे निर्णय

राहुल गांधी यांच्या दुहेरी नागरिकत्वाच्या प्रश्नावर अलाहाबाद उच्च न्यायालयाने चौकशी करण्याचा जो आदेश दिला होता, तो आदेश उच्च न्यायालयाने स्वतःच रोखून धरण्याचा प्रकार घडला आहे. न्यायालयाने स्वतःहून ताबडतोब दुसऱ्या दिवशी स्वतःचा निर्णय फिरवल्याने या प्रकरणाकडे पुन्हा सगळ्यांचे लक्ष गेले. मुळात हे प्रकरण खालच्या न्यायालयात याआधी फेटाळण्यात आले आहे, पण त्याला भारतीय जनता पक्षाच्या एका कार्यकर्त्याने उच्च न्यायालयात आव्हान दिले. न्यायालयाने याप्रकरणी गुन्हा दाखल करून सीबीआय चौकशीचा आदेशही दिला होता. त्यामुळे राहुल गांधी यांच्या पुढील अडचणी वाढणार होत्या. पण स्वतःच न्यायालयाने आपला आदेश रोखून धरल्याने त्याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे. न्यायालयाने स्वतः हून हा निर्णय कशाच्या आधारावर घेतला असेल याविषयी अनेक तर्कवितर्क केले जात आहेत. असेच एक प्रकरण आसामात घडले आहे तेथे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नीकडे तीन पासपोर्ट असल्याचा दावा काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा यांनी एका पत्रकार परिषदेत केला होता. त्यावेळी त्यांनी या तीनही पासपोर्ट संबंधात काही कागदपत्रे आणि प्रत्यक्ष पासपोर्टचे फोटो सादर केले होते. आसामातील ऐन निवडणूक काळात काँग्रेसने हा विषय पुढे आणल्यामुळे मुख्यमंत्री यांच्या गोटात धास्तीचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर लगेच मुख्यमंत्री ॲक्टिव्ह झाले आणि त्यांनी काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा यांना अटक करण्यासाठी दिल्लीत पोलीस पाठवले. त्यांच्या पत्नीच्या तक्रारीवरून आसाम पोलिसात गुन्हा दाखल केला गेला. याप्रकरणी आपल्याला अटक होण्याची शक्यता आहे हे लक्षात घेऊन पवन खेरा यांनी तेलंगणा येथून तात्पुरता अटकपूर्व जामीन मिळवला. या जामिनाला आसाम सरकारने सुप्रीम कोर्टात आव्हान दिल्यानंतर त्यांचा अटकपूर्व जामीन रद्द करण्यात आला किंवा त्याला मुदतवाढ द्यायला सुप्रीम कोर्टाने नकार दिला. वास्तविक राहुल गांधी यांच्याकडे दोन पासपोर्ट आहेत म्हणजे दुहेरी नागरिकत्व आहे असे एका खटल्यात एका याचिकाकर्त्याचे म्हणणे होते त्या प्रकरणात मात्र या देशातील एक उच्च न्यायालय तातडीने गुन्हा दाखल करून सीबीआयला चौकशीचा आदेश देते,पण अशाच स्वरूपाचा आरोप आसामच्या मुख्यमंत्र्यांच्या पत्नीवर असताना तिथे तिच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. उलट आरोप करणाऱ्यालाच अटक करण्यासाठी पोलीस पाठवले जातात आणि त्याच्या अटकपूर्व जामिनाला मुदतवाढ देण्यास सर्वोच्च न्यायालय नकार देते.हा न्यायव्यवस्थेतील दुहेरी मापदंड नाही काय,असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो.ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर आपण राहुल गांधी यांच्या संबंधात जो आदेश दिला आहे त्याच आदेशाचा वापर करून आसामच्या मुख्यमंत्र्यांच्या प्रकरणातही दाद मागितली जाण्याची शक्यता निर्माण झाली होती, पण आता स्वतः न्यायालयाने आपला निर्णय रोखून धरल्याने तो मुद्दा तूर्तास तरी उपस्थित होताना दिसत नाही.पण मूळ प्रश्न कायम राहतो,तो हा की एकच पार्श्वभूमी असलेल्या प्रकरणात देशातील तपास यंत्रणा किंवा न्यायालय अशी वेगवेगळी भूमिका कशी घेऊ शकतात किंबहुना अशा भूमिका घेताना त्याला नेमके काय निकष लावले जातात हे जर तपासले तर त्यात मनमानीपणाचा मुद्दा प्रकर्षाने ध्वनीत होतो. न्यायव्यवस्थांच्या निकालावर अलीकडच्या काळात बरेच आक्षेप नोंदवले गेले आहेत. न्यायव्यवस्थेवर सत्ताधाऱ्यांचा दबाव किंवा हस्तक्षेप वाढत चालल्याचे वातावरण आहे. हा दबाव थेट सर्वोच्च न्यायालयाच्या पातळीवरही कार्यरत असतो हे खूप पूर्वी पाच विद्यमान न्यायाधीशांनी प्रथमच एक जाहीर पत्रकार परिषद घेऊन निदर्शनास आणले होते.त्यामुळे देशभर खळबळ उडाली होती.त्यामुळे सत्ताधारी पक्षाचे लोक जरा जबाबदारीने वागतील अशी अपेक्षा होती, पण सध्या मात्र त्याच्या विपरीतच होताना दिसते आहे. राहुल गांधी यांच्याकडे दुहेरी नागरिकत्व असेल तर त्याची रीतसर चौकशी करून योग्य ती कारवाई व्हायलाच हवी,पण हाच न्याय आसामचे मुख्यमंत्री हिमंता सरमा यांच्या पत्नीलाही लावायला हवा आणि त्यांच्यावरही अशीच ठोस कारवाई करून सीबीआय चौकशीचे आदेश द्यायला हवेत.आसामच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या पत्नीच्या आडनावात स्पेलिंगची चूक झाल्याचे नमूद करून पवन खेरा यांनी सादर केलेले तीन पासपोर्ट आपल्या पत्नीचेच नाहीत अशी भूमिका घेतली होती. पण काँग्रेसने पुन्हा पलटवार करीत ही स्पेलिंग मिस्टेक नसून मुख्यमंत्र्यांच्या पत्नीने अधिकृत सरकारी कागदपत्रात स्वतःचे आडनाव ज्या स्पेलिंगने दिले आहे त्याच स्पेलिंगच्या आधारे हे बनावट पासपोर्ट तयार झालेले आहेत असे स्पष्टीकरण दिले होते. आता हे सगळे तपशील न्यायालयापुढे गेल्यानंतर न्यायालयाने तो सगळा मामला तपासायचा आहे आणि त्यावर निवाडा द्यायचा आहे. पण एकाच मुद्यावर एकाच प्रकरणात कारवाईचा आदेश आणि दुसऱ्या प्रकरणात तक्रारदारावरच अटकेची कारवाई असे दोन टोकाचे निर्णय आले आहेत. एकाच मुद्यावरून दोन वेगवेगळे न्याय किंवा भूमिका घेतल्या जाऊ नयेत अशीच सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा असणार.

# सामरिक सज्जतेला नवी बळकटी

**भारताच्या संरक्षण इतिहासात एप्रिल २०२६ हा महिना सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाणारा ठरला आहे. एका बाजूला समुद्राच्या अथांग खोलीत शांतपणे वावरणारी 'आयएनएस अरिधमन' ही अजेय अण्वस्त्रधारी दुसरी पाणबुडी सज्ज झाली आहे,तर दुसरीकडे आकाशात ३० हजार फूट उंचीवर शत्रूच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवणारा 'हायड्रोजन एअरशिप' प्रकल्प आकाराला येत आहे. या दोन्ही घडामोडी भारताच्या संरक्षण सिद्धतेमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या आहेत.**



जागतिक राजकारणाच्या बदलत्या समीकरणांमध्ये, विशेषतः हिंदी महासागर आणि हिमालयीन सीमांच्या सुरक्षेसाठी भारताने उचलेली ही पावले अत्यंत दूरगामी परिणामांची ठरणार आहेत. समुद्राच्या तळाशी कार्यरत होणारी 'आयएनएस अरिधमन' ही भारताची तिसरी स्वदेशी अणुपाणबुडी आहे. नौदलाच्या 'अरिहंत' श्रेणीतील ही पाणबुडी 'एसएसबीएन' म्हणजेच अण्वस्त्रधारी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागण्याची क्षमता असणारी युद्धनौका आहे. या क्षेपणास्त्रांचा पल्ला साधारणपणे साडेतीन हजार किलोमीटर इतका असून, यामुळे भारत समुद्रातून दूरवरच्या लक्ष्यांवर अचूक मारा करू शकतो.भविष्यात यावर 'के-पाच'सारखी अधिक लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे तैनात करण्याची योजना आहे. यामुळे भारताची सामरिक पोहोच केवळ दक्षिण आशियापुरती मर्यादित न राहता ती विस्तीर्ण प्रदेशावर प्रभाव पाडू शकेल.या क्षेपणास्त्रांची अचूकता आणि अण्वस्त्रे वाहून नेण्याची क्षमता भारताला आशिया-पॅसिफिक क्षेत्रात एक निर्णायक शक्ती बनवण्यास आधार देणारी आहे.अरिधमनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची अदृश्य राहण्याची क्षमता. अणुऊर्जेवर चालत असल्याने या पाणबुडीला वारंवार इंधन भरण्यासाठी किंवा बॅटरी चार्ज करण्यासाठीसमुद्राच्या पृष्ठभागावर येण्याची गरज नसते. ती सलग कित्येक आठवडे पाण्याखाली राहू शकते. शत्रूच्या रडार यंत्रणेला चकवा देऊन शांतपणे वावरणारे हे ब्रह्मास्त्र भारताच्या 'नो फर्स्ट स्ट्राईक' म्हणजेच 'आम्ही पहिला हल्ला करणार नाही'या अणुधोरणाचा कणा आहे. जर शत्रूने भारतावर पहिला अण्वस्त्र हल्ला केलाच, तर जमिनीवरचे आणि हवेतील अण्वस्त्र तळ कदाचित नष्ट होऊ शकतात,पण समुद्राच्या खोल तळाशी लपलेली अरिधमन सुरक्षित राहून शत्रूवर विनाशकारी प्रतिहल्ला करण्याची क्षमता राखते.अरिधमनच्या ताफ्यात समावेश झाल्यामुळे भारत आता समुद्रात २४ तास 'न्यूक्लियर पेट्रोलिंग' म्हणजेच अणुगस्त घालण्यास सक्षम असणाऱ्या जगातील मोजक्या देशांच्या पंक्तीत जाऊन बसला आहे. याला लष्करी भाषेत 'कंटिन्युअस ॲट-सी डिटरंट' असे म्हणतात. याचाच अर्थ असा की, वर्षाचे ३६५ दिवस भारताची किमान एक अणुपाणबुडी पूर्ण क्षमतेनिशी समुद्रात सज्ज असेल. यामुळे शत्रूच्या मनात एक कायमस्वरूपी धाक निर्माण होणार आहे. भारताचा हा 'सायलेंट किलर' केवळ युद्धासाठी नसून तो या क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्यासाठी एक प्रभावी साधन ठरणार आहे. विशेषतःहिंदी महासागरात ज्या प्रकारे परकीय शक्तींचे हस्तक्षेप वाढत आहेत, त्या पार्श्वभूमीवर अरिधमन ही भारताची एक अभेद्य तटबंदी ठरली आहे.

दुसरीकडे, भारतीय वायूदलाने आकाशात आपली पकड अधिक मजबूत करण्यासाठी 'मेक इन इंडिया'अंतर्गत हायड्रोजनवर चालणाऱ्या एअरशिपचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. ३० हजार फूट उंचीवर राहून सलग १० ते ३० दिवसांपर्यंत हवेत तरंगत राहणारे हे एअरशिप म्हणजे 'आकाशातील डोळा' आहे. आजच्या काळात ड्रोन आणि क्रूझ क्षेपणास्त्रांचा धोका वाढला आहे. अशा वेळी पारंपारिक रडार यंत्रणांना काही मर्यादा येतात. मात्र, हे हायड्रोजन एअरशिप एकाच ठिकाणी स्थिर राहून कित्येक किलोमीटरचा परिसर आपल्या निगराणीखाली ठेवू शकते. हिमालयासारख्या दुर्गम

## दैनंदिनी

आणि उंच पर्वतरांगांमध्ये,जिथे रडार बसवणे किंवा मानवी गस्त घालणे कठीण असते, तिथे हे तंत्रज्ञान अत्यंत प्रभावी ठरेल. या एअरशिपमध्ये हायड्रोजनचा वापर करणे हा एक क्रांतिकारी निर्णय आहे. हायड्रोजन हा वायू वजनाने हलका असल्याने तो एअरशिपला हवेत उचलण्यासाठी प्रचंड ताकद देतो. तसेच, हेलियमच्या तुलनेत हायड्रोजन स्वस्त आणि सहज उपलब्ध आहे. हे एअरशिप केवळ टेहळणीसाठी नसून ते ५ हजार किलोपर्यंतचे जड वजन वाहून नेण्यास सक्षम असेल. यामध्ये अत्याधुनिक सेन्सर्स, कॅमेरे आणि प्रसंगी शत्रूवर हल्ला करण्यासाठी क्षेपणास्त्रे किंवा ड्रोन्सचा संचही तैनात केला जाऊ शकतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हे एअरशिप सौर ऊर्जा आणि हायड्रोजनच्या मिश्रणावर चालणार असल्याने ते पर्यावरणासाठीही पूरक आहे. पारंपारिक टेहळणी विमानांच्या तुलनेत याचा खर्च अत्यंत कमी असल्याने वायूदलासाठी हा एक शाश्वत आणि किफायतशीर पर्याय ठरणार आहे.

संरक्षण संपादन प्रक्रिया (डीएपी) २०२० च्या 'मेक-१' उपश्रेणी अंतर्गत या एअरशिपची निर्मिती केली जाणार आहे. यामध्ये ५० टक्क्यांहून अधिक साहित्य आणि उपकरणे स्वदेशी असणे अनिवार्य करण्यात आले आहे. या एअरशिपला 'मिडियम अल्टिट्यूड हेवी लिफ्ट एअरशिप'असे संबोधले जाते. हे केवळ एक हवेत तरंगणारे साधन नसून, ते २,००० ते ५,००० किलोपर्यंतचे जड पेलोड वाहून नेण्यास सक्षम असेल. वायूदलाचे मुख्य लक्ष हे पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आहे. भारतीय कंपन्यांना तांत्रिक सहकार्यासाठी विदेशी भागीदारांची मदत घेता येईल, परंतु मूळ तंत्रज्ञान आणि उत्पादन हे भारतातच होणे आवश्यक आहे. या प्रकल्पामुळे भारतीय खाजगी कंपन्यांना संरक्षण उत्पादनाच्या मुख्य प्रवाहात येण्याची मोठी संधी प्राप्त झाली आहे.

# आत्मनिर्भरतेतून साधलेली क्रिटिकॉलिटी

भारतात या घडीला वीस पेक्षा अधिक अणु वीज निर्मिती केंद्र आहेत. तरीही आपण आपल्याला लागणारी केवळ चार ते पाच टक्के ऊर्जा आण्विक प्रकाराने प्राप्त करतो. देशातील विजेचा घरगुती आणि औद्योगिक कारणासाठीचा वापर झपाट्याने वाढत आहे. वर्ष २०२२ मध्ये आपले परकॅपिटा (दरडोई) विजेचा वापर १.३ मेगावॅट प्रति घंटा होता.हाच वापर अमेरिकेसारख्या प्रगत देशात १२.७०२ मेगावॅट प्रतिघंटा तर संयुक्त अरब अमिरातीमध्ये १६.३९० मेगावॅट प्रति घंटा होता. याचाच अर्थ आपण प्रगती पथावर वाटचाल करत असताना देशाची विजेची आवश्यकता प्रचंड प्रमाणात वाढणार आहे.



आज आपण ऊर्जा प्रामुख्याने तेल आणि कोळसा यापासून प्राप्त करतो.त्यासाठी आपल्याला तेल आणि कोळसा मोठ्या प्रमाणात आयात करावा लागतो त्यामुळे प्रदूषणही होते.सौर माध्यमातून ऊर्जा प्राप्त करायला मर्यादा आहे.अशा परिस्थितीत अणुऊर्जा हा एक उत्तम पर्याय आहे.४ मार्च २०२४ या दिवशी तामिळनाडूतील कल्पक्कम येथे भारताचा पहिला स्वदेशी प्रोटोटाईप फास्ट ब्रिडर रिॲक्टरमध्ये इंधन भरण्याची प्रक्रिया चालू झाली आणि ६ एप्रिल २०२६ या दिवशी यशस्वीपणे तो कार्यान्वित झाला आहे त्याने क्रिटिकॉलिटी साध्य केली आहे.

प्रोटोटाईप फास्ट ब्रीडर रिॲक्टर म्हणजे इंधन निर्माण करणारी आणि भविष्यातील ऊर्जा सुरक्षित करणारी प्रगत प्रणाली आहे.जेव्हा एखादी अणु भट्टी क्रिटिकल होते तेव्हा त्यातील साखळी प्रक्रिया स्वयंचलित आणि स्थिर झाली आहे असे समजले जाते.म्हणजे जिथे इंधनापासून मिळणारी आणि वापरली जाणारी ऊर्जा यांचा समतोल साधला जातो यामुळे अणुभट्टी स्थिरपणे वीज निर्मिती करू शकते. भारताकडे (अणु इंधन) युरेनियमचे साठे पुष्कळ कमी आहेत त्याचा वापर वीज आणि औषध निर्मिती क्षेत्रासाठी अत्यावश्यक आहे. युरेनियमचा साठा कमी असल्याने तो आपल्याला आयात करावा

## अणुऊर्जानिर्मितीत भारताचे दमदार पाऊल

लागतो.असे असले तरी भारतात आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर मुबलक प्रमाणात थेरियम उपलब्ध आहे. सामान्य अणु भट्ट्यांमध्ये थेरियमचा थेट वापर करता येत नाही. क्रिटिकॉलिटी प्रक्रिया साध्य करणे म्हणजे नवीन अणु प्रकल्पात थेरियम वापरण्याच्या दिशेने टाकलेले सर्वात मोठे पाऊल आहे. एकदा थेरियम वापरायला आरंभ केला की, वीज निर्मितीसाठी दुसऱ्या कोणत्याही देशावर अवलंबून राहावे लागणार नाही.या प्रक्रियेत जितके इंधन अणु भट्ट्यांमध्ये वापरले जाईल त्यापेक्षा अधिक इंधन या प्रकल्पात निर्माण होणार असल्याने आपल्याला स्वस्त आणि स्वच्छ वीज मिळेल.

आतापर्यंत केवळ रशियाने अणु कार्यक्रम राबवून क्रिटिकॉलिटी साध्य केली आहे यावरून आपले शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांनी या क्षेत्रात गरुड झेप घेतली आहे असेच म्हणावे लागेल. हे यश पाहण्यासाठी भारताच्या अणु कार्यक्रमाचे जनक डॉ.होमी भाभा हवे होते. युरेनियमचा तुटवडा आणि थेरियमचा मुबलक साठा हे कोडे त्यांनी १९५४ मध्ये सोडवले होते.ऊर्जा निर्मिती क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्यासाठी तीन टप्प्यांचा अणू ऊर्जा कार्यक्रम राबवला होता. कल्पक्कम प्रकल्पात जे साध्य झाले आहे तो अणु कार्यक्रमाचा दुसरा टप्पा आहे.

हे यश सहजासहजी प्राप्त झालेले नाही. अमेरिका आणि इतर देशांनी अनेक निर्बंध घातले आणि एक प्रकारे पिळवणूक केली, अनेक अडथळे आणले गेले.या निर्बंधामुळे स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करायला वेळ लागला मात्र संघटितपणे केलेले अपार कष्ट, संयम, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या आधारावर सर्व देशांच्या नाकावर टिच्चून भारताने हे यश मिळवलेले आहे.हे यश शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, अभियंता यांचा योग्य समन्वय आणि अनेक खाजगी आस्थापनांनी दिलेली साथ. यात लार्सन अँड टूब्रो,वालचंद नगर इंडस्ट्री,गोदरेज या आस्थापनाने दिलेले योगदान विसरून चालणार नाही.ध्येय साध्य करताना अनेक अडथळे आले,अपयश आले मात्र ते पचवून हताश न होता पुन्हा नव्याने कामाचा प्रारंभ करून यश मिळवले.भारताला उच्च शिखरावर नेऊन ठेवायचे आहे या ध्येयाने प्रेरित झाले, तर असाध्य काहीही नाही.

■ लीना गाडगीळ


**राज्यातील अनेक शाळांच्या वार्षिक परीक्षा संपून मुलांना आता उन्हाळी सुट्टी पडली आहे,शहरी भागांत लहान मुलांना एरव्ही शाळेत सोडले की गृहिणींना घरातील कामे करण्यास मोकळा वेळ मिळतो. सुट्टीच्या दिवसांत मात्र संपूर्ण दिवस मुले घरी असल्याने त्यांना काय हवे आणि काय नको याची पूर्तता करण्यामध्ये महिलांची पुरती दमछाक होते.ज्यांची गावाला घरे आहेत ती कुटुंबे दरवर्षी गावाला जातात; मात्र ज्यांची नाहीत त्यांना मात्र या दिवसांत मुलांचे लाड पुरवण्याखेरीज अन्य पर्याय नसतो.**

# मुलांच्या सुट्टीचे योग्य नियोजन करा

यंदा उन्हाचा तडाखा खूपच असल्याने दुपारी मुलांना घराबाहेर खेळायलाही पाठवता येत नाही अशावेळी घरी त्यांचे हट्ट पुरवण्याचा त्रास नको म्हणून काही गृहिणी आपले मोबाईल मुलांच्या स्वाधीन करतात किंवा घरातील टीव्ही चालू करून देतात. त्यावर ही मुले दिवसदिवसभर गेम्स खेळत असतात किंवा रिल्स बघत असतात.मुलांची ग्रहणक्षमता अधिक असल्याने ते जे पाहतात त्याचा परिणाम त्यांच्या कोवळ्या मनावर पटकन होतो. इंटरनेट विश्वात अनेक हिंसक गेम्सही आहेत. हे गेम्स पाहून तशा कृती ही मुले करण्याचा प्रयत्न करतात,गेम्समधील आभासी पात्रांना ते आपले आदर्श मानू लागतात. सातत्याने गेम्स पाहणारी मुले अधिक हिंसक किंवा भित्री होत असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांनी संशोधनातून सिद्ध केले आहे. सुट्टीच्या दिवसांत अनेक राष्ट्रप्रेमी संघटना, मंडळे शालेय मुलांसाठी विविध शिबिरांचे आयोजन करतात. यापैकी बरीच शिबिरे ही विनामूल्य किंवा नाममात्र मूल्य घेऊन भरवली जातात. सुट्टीच्या दिवसांत मुलांना मोबाईल किंवा टीव्हीचा नाद लावण्याऐवजी त्यांना अशा संस्कार, क्रीडा किंवा शौर्य शिबिरांना पाठवायला हवे. त्यासोबतच पालकांनी मुलांसाठी वेळ काढून त्यांच्याकडून श्लोक, स्तोत्र पाठांतर करून घ्यायला हवेत. देवतांचे अवतार,क्रांतिकारक, समाज सुधारक यांच्या कथा आणि जीवन चरित्रे त्यांना सांगायला हवीत. एरव्ही शाळा, शिकवण्या आणि अभ्यासात गुंतलेल्या मुलांवर चांगले संस्कार करण्यासाठी पालकांकडे हाच कालावधी असतो. हा वेळ मुलांना द्या, मुलांच्या सुट्टीचा सदुपयोग करा.

■ जगन घाणेकर

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**बुधवार,ता.२२.४.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५२, शालिवहन शके १९४८,परामवनाम संवत्सरे, उत्तरायणे, वसंत ऋतो, वैशाख मासे,शुक्ल पक्षे,षष्ठी तिथी, २२.५१ नंतर सप्तमी तिथी, आर्द्रा नक्षत्र २२.१४ नंतर पुनर्वसुनक्षत्र, मिथून रास, अतिगंड योग, ०९.०९ नंतर सुकर्मा योग,कौलव करण १२.०३ नंतर तैतिल करण २२.५१ पर्यंत, दिनमान १२.२९, सुर्योदय ०६.१७, सुर्यास्त १८.४६ (कोल्हापूरचे) राहूकाळ दुपारी १२ ते १.३०, वामन पंडीत पु.दि. शेगाव, घबाड २२.१४ पर्यंत, तृणकाष्ट संग्रह,विप्लारंभ.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष-** आज तुम्ही ऊर्जेने भरपूर असाल.तुम्ही जे काही कराल त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा निम्माच वेळ लागेल. कमिशन-लाभांश किंवा मानधन याद्वारे फायदे मिळतील.सहकुटूंब सामाजिक कार्य केल्याने आनंदी वातावरण राहील.

**वृषभ-** एखाद्या धार्मिक स्थळी किंवा एखाद्या नातेवाईकाच्या घरी जाण्याचा विचार पुढे येईल. आज तुम्ही मेहनत केलीत तर यश निश्चित मिळेल कारण आजचा दिवस तुमचाच आहे.कामातील प्रगतीमुळे जुजबी तणाव संभवतो.

**मिथून-**सामाजिक आयुष्यापेक्षा आरोग्याला प्राथमिकता द्यावी लागेल.नव्या तंत्राचा आणि कौशल्यांचा वापर करीअरमधील प्रगतीसाठी गरजेचा आहे.

**कर्क-** देणगी आणि धर्मादाय कामामध्ये स्वत:ला गुंतवा, त्यातून तुम्हाला मन:शांती लाभेल.सातत्याने सकारात्मक विचार करण्याची प्रवृत्ती फलदायी ठरेल.

**सिंह-** काही अटकळी आणि अनपेक्षित लाभांमुळे आर्थिक परिस्थिती सुधारू शकेल.आजच्या दिवशी मुलं आणि कुटुंबावर लक्ष केंद्रीत करा.

**कन्या-**कलात्मक आनंद देणाऱ्या कामात स्वत:ला गुंतवून घ्याल. तुमच्याजवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मन शांती असेल.

**तुळ-** व्यावसायिक आज अनुभवी लोकांसोबत व्यवसायाला पुढे वाढवण्याचा सल्ला घेऊ शकतात. सरकारी कामात वडिलधाऱ्यांचा सल्ला घ्या.

**वृश्चिक-** तुमची देण्याची वृत्ती म्हणजे अप्रत्यक्ष मदत करण्याची वृत्ती होय. त्यामुळे शंका, निरुत्साह, मत्सर, हेवा, गर्व यापासून तुम्ही मुक्त व्हाल.

**धनु-** दिवस उत्तम आहे. आजच्या दिवशी स्वतः साठी वेळ काढा आणि आपल्या कमतरता आणि गुण याचे आत्म चिंतन करा.नातेवाईकांच्या येण्याने आनंदी वातावरण राहील.

**मकर-**आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. आरोग्याची काळजी घ्या. रागावर नियंत्रण ठेवा.

**कुंभ-** स्वत:मध्ये प्रगती करणारे प्रकल्प हाती घेतलेत तर त्याचा दुहेरी फायदा होईल. तुम्हाला चांगले वाटेल आणि तुम्ही अधिक आत्मविश्वास बाळगू शकाल.

**मीन-** निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो.तुमच्या नवीन योजना तुमच्या पालकांना विश्वासात घेऊन सांगण्यासाठी काळ उत्तम आहे.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### संपापेक्षा मराठी भाषा शिकून घ्या

महाराष्ट्रात १ मे २०२६ पासून मराठी न येणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांचे परवाने रद्द करण्याच्या निर्णयाविरुद्ध चालक संघटनांनी दिलेला संपाचा इशारा हा प्रवाशांना वेठीस धरण्याचाच प्रकार आहे. सार्वजनिक सेवा देणाऱ्या या क्षेत्राने जबाबदारीची जाणीव ठेवणे अपेक्षित असताना, संपाचा मार्ग स्वीकारणे हा प्रश्न सोडवण्याऐवजी तो अधिक गुंतागुंतीचा करणारा आहे. महाराष्ट्रात रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी येणे ही अपेक्षा अन्यायकारक नाही. उलट, प्रवाशांशी सुसंवाद साधण्यासाठी ती अत्यावश्यकच आहे. तरीही मराठी येत नसली तरी व्यवहारात अडचण येत नाही असे विधान या संघटनेचे अध्यक्ष शशांक राव यांनी करणे हे वास्तवाशी विसंगत आहे.महत्त्वाचा मुद्दा असा की, मराठी शिकण्याबाबतचे परिपत्रक नवे नाही. ते आधीपासून अस्तित्वात असताना त्याकडे दुर्लक्ष का करण्यात आले, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.आता त्याची अंमलबजावणी होत असताना त्याला विरोध करणे म्हणजे स्वतःच्या दुर्लक्षाचे समर्थन करण्यासारखे आहे. खरंतर, संघटनांनी पुढाकार घेत आपल्या सदस्यांना मराठी शिकण्यासाठी प्रवृत्त केले असते, तर हा वाद उद्भवलाच नसता.एकवेळ शासनाकडे मुदतवाढ मागणे समजू शकते ; परंतु थेट संपाची धमकी देणे हे योग्य नाही. महाराष्ट्रात राहून मराठी शिकली नाही तरी चालते, हा गैरसमज आता मोडीत काढण्याची वेळ आली आहे.

■ दीपक गुंडये

### इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराबाबत जनजागृती करणे गरजेचे

अक्षयतृतीया नुकतीच पार पडली. त्या दिवशी अनेकांनी शुभ मुहूर्तावर वाहने खरेदी केली. एकट्या पुणे शहरात अक्षय तृतीया या दिवशी तब्बल सात हजार ८८५ वाहने नोंद झाली.यामध्ये चार चाकी वाहने चार हजार ९९२ वाहने होती तर इलेक्ट्रिक वाहनांची संख्या केवळ ३०६ एवढी होती. यातील विशेष बाब म्हणजे इलेक्ट्रिक वाहने फारच कमी विकली गेली. असे का व्हावे ? यामध्ये त्रुटींचा विचार केला असता चार्जिंग स्टेशनची कमतरता,किमती जास्त असणे या व अशा अनेक कारणामुळे इलेक्ट्रिकल वाहनांची संख्या कमी होते. ग्राहक प्रथम पेट्रोल व डिझेल वरची वाहने पसंत करतात कारण या प्रकारच्या वाहनाकडे ग्राहकांचा असलेला पारंपरिक ओढा हे सुद्धा आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वर काही सवलती देऊन ग्राहकांना आकर्षित करणे,चार्जिंग स्टेशनचे जाळे तयार करणे,ग्राहकांना इलेक्ट्रिक वाहनांचे फायदे पर्यायांनी सांगणे ही कामे करावयास हवीत. इलेक्ट्रिक वाहनांमुळे पर्यावरणाला मदत होते. दूषित हवा,आवाज तयार होत नाहीत. सरकार व वाहने तयार करणाऱ्यांनी इलेक्ट्रिक वाहनांचे फायदे लोकांना पटवून दिले पाहिजेत. वाहन तयार करणाऱ्या कंपन्यांनी विविध शिबिरांचे आयोजने करणे जरूरीचे आहे . त्यामुळे लोकांच्यात जागृती निर्माण होईल व खप वाढेल.

■ शांताराम वाघ

### यंत्रांवरचे अवलंबित्व

गेल्या वर्षी जुलै महिन्यात एक दिवस काही तास जगभरात मायक्रोसॉफ्ट सर्व्हर डाऊन होऊन अनेक सेवा बंद पडल्या. यामुळे सगळीकडेच गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. यासंदर्भात एकमेकांना फोन करून विचारणा होऊ लागली विमानसेवा, बँक, रेल्वे, रेडिओ, अर्थव्यवहार,ऑनलाईन शॉपिंग यांना फटका बसला.सद्य स्थितीत इंटरनेट केवळ मेसेज पाठवण्यासाठी नसून त्यावर अनेक महत्वाचे व्यवहार होतात. व्यावसायिक गोष्टींसाठी याचा वापर होत असल्याने काही तास जरी सेवा बंद पडली तरी मोठे नुकसान होते.

काही तासांनी सारे काही सुरळीत झाले पण आता आपण या गोष्टीवर किती अवलंबून आहोत याची जाणीव झाली.आधुनिक काळात तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असून मानव हा या गोष्टीवर संपूर्णपणे विसंबून आहे. आता सारे काही ऑनलाइन,कॉम्प्युटरवर अनेक प्रकारचे व्यवहार होतात. सर्व्हर डाऊन असेल तर काम होऊ शकत नाही.वाढती यांत्रिकता आणि यंत्रकांवर अवलंबून असणे यामुळे भावी काळात समस्या निर्माण होऊ नयेत हीच अपेक्षा!

■ प्रफुल्लचंद्र काळे

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय: 'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६०, पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# मुरगूड परिसरात रस्ते अपघाताचे प्रमाण चिंताजनक

## रस्त्यांचा दोष कि वाहनधारक दोषी?;कायद्याचा धाक वाढविण्याची गरज

मुरगूड,ता.२१(प्रतिनिधी)–

**मुरगूड पोलीस ठाण्याच्या ५४ गावच्या कार्यक्षेत्रात दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण चिंताजनक वाढत चालले आहे. या अपघातापाठीमागे रस्ते दोषी की वाहनधारक दोषी ? हा संशोधनाचा विषय राहिला आहे. याबाबत प्रबोधन आणि कायद्याचा धाक वाढवण्याची गरज निर्माण झाली आहे.**

मुरगूड परिसरातील ग्रामीण भागाशी जोडलेले डांबरी रस्ते नवीन झाले आहेत त्याशिवाय निपाणी ते मुदाळतिट्टा हा आंतरराज्य मार्ग, निढोरी ते कागल हा राज्यमार्ग व नव्याने काँक्रीटीकरण सुरु असलेला गडहिंग्लज ते मुरगूड अशा प्रमुख मार्गांचे रस्ते चांगले झाल्याने या मार्गांनी वाहने सुसाट वेगाने चालविली जात आहेत तसेच वाहनांच्या अमर्याद संख्येमुळे रस्ते अपूरे पडत आहेत. रस्त्यावर २४ तास वाहनांची मालिका सुरु असते त्यातूनच किरकोळ व भीषण अपघात घडत आहेत.

मुरगूड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात या वर्षभरात पोलिसांत १०७ अपघाताची नोंद झाली आहे. याशिवाय नोंद न झालेले शेकड्याने अपघात आहेत त्यामुळे वर्षात दोनशेहून अपघात व या अपघातातून शेकडो जणांना जीव गमवावे लागले आहेत तर अनेकांना हात पाय गमावून कायमचे अपंगत्व आले आहे ही खरोखरच चिंतेची बाब आहे.




अपघात प्रवणक्षेत्रातसुद्धा बेजबाबदारपणे भरधाव वेगाने वाहने चालविण्याच्या रिवाजामुळे अपघाताला एक प्रकारे निमंत्रणच दिले जाते. उत्साही तरुणाईच्या हायस्पीड बाईकमुळे तर अपघाताच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. याला आवर कोण घालणार? वाहनांच्या गतीवर नियंत्रण कोण ठेवणार? धावपळीच्या युगात आता थांबायला कोण तयार नाही त्यामुळे कशाचीही परवा न करता सुसाट जाण्यातच व जलदरित्या लवकरात लवकर इप्सित स्थळी पोहचण्याची प्रत्येकाला घाई अपघातापासून वाचणे नडत आहे. रस्त्यावर एखादा अपघात झाला तरी तो ओव्हरटेक करून वेगाने पुढे जाण्याची जीवघेणी स्पर्धा पहायला मिळत आहे. अपघात पहायला व जखमींना हॉस्पीटल नेण्यासाठीसुद्धा आता कोणाकडे वेळ नाही.

आदमापूर बाळूमामा दर्शनासाठीची मोठी वाहतूक ऊस वाहतूक, बॉक्साईड वाहतूक यासारख्या अवजड वाहतूकी बरोबरच यात्रा-जत्रामुळे होणारी वाहनांची रस्त्यावरील वाढती गर्दी,बेशिस्त पार्किंग व वाहनांचा अमर्याद वेग यामुळे दिवसेंदिवस वाहनांचे वाढते अपघात यावर नियंत्रण कोण व कसे ठेवणार? याबाबत चिंता व्यक्त केली जात असून पोलिस व आर.टी.ओ. विभागाने ॲक्शन मोडवर येवून धडक कारवाया केल्या पाहिजेत तरच या सुसाट धावणाऱ्या वाहन चालकांवर नियंत्रण येवू शकेल,अशी चर्चा आहे.

# एनएसएस शिबिरामुळे समाजात सकारात्मक बदल

### आम.शशिकला जोल्ले

बोरगाव,ता.२१(प्रतिनिधी)–

**बोरगाव येथे जोल्ले शिक्षण संस्थेच्यावतीने आयोजित एनएसएस शिबिरातून विद्यार्थ्यांनी नेतृत्व, शिस्त आणि जबाबदारी यांचे धडे आत्मसात केले.**



**बोरगाव येथे शिबिराच्या सांगता समारंभात बोलताना आमदार शशिकला जोल्ले, शेजारी अण्णासाहेब जोल्ले,यशस्विनी जोल्ले.**

विद्यार्थ्यांनी गाव स्वच्छता, वृक्षारोपण, आरोग्य शिबिरे आणि जनजागृती मोहिमा राबवून समाज सेवा केले.उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडवून आणता येतो, असे मत आम.शशिकला जोल्ले यांनी व्यक्त केले.बोरगाव येथे जोल्ले शिक्षण संस्थेच्या छ.शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांगनूर निपाणी व मौलाना अब्दुल कलाम आझाद बीएसडब्ल्यू एमएसडब्ल्यू महाविद्यालय नणदी यांच्या संयुक्त विद्यमानाने पाच दिवसीय विशेष वार्षिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराचे सांगता समारंभ झाला.

यावेळी निवृत्त शिक्षक एस.आर.डोंगरे यांनी अंधश्रद्धा निर्मूलन व्याख्यान देऊन प्रात्यक्षिक दाखवले.श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा असूनही नागरिकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून जीवनाची वाटचाल करावी, असे सांगितले. शिबिरा दरम्यान राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला.कार्यक्रमाच्या शेवटी शिबिरात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी ज्योतीप्रसाद जोल्ले, शरद जंगटे, प्रिया जोल्ले,यशस्विनी जोल्ले, सुधाकर इंडी, विनोदिनी आलासे, प्रा.आप्पासाहेब अकोळे, राजेशशेखर हिरेमठ, जितेंद्र भोजे, अजित तेरदाळे, बी.के.महाजन, बंडू माळी यांच्यासह कॉलेजचे पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## खंडित वीजपुरवठ्यामुळे पिके धोक्यात

कोगनोळी,ता.२१(प्रतिनिधी)–

**आप्पाचीवाडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट असलेल्या आप्पाची वाडीसह सुळगाव, मत्तीवडे, हदनाळ परिसरातील कृषी पंपांच्या विजेचा लपंडाव सध्या शेतकऱ्यांच्या मुळावर आला आहे. त्यामुळे या भागातील शेतकरी हतबल झाले आहेत.**

सतत होत असलेल्या खंडित वीजपुरवठ्याचा कृषी पंपांना फटका बसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक अडचण वाढल्याने तो विवंचनेत सापडला आहे. तसेच विजेच्या लपंडावामुळे उन्हाळी पिके धोक्यात आल्याने येथील शेतकरी हवालदिल झाला आहे.

# चिकोडीतील रामनगर सर्वाधिक विकसित नगर होईल

## आम.गणेश हुक्केरी; रामनगर येथे मंजूर निधीचे आदेशपत्र वाटप

चिकोडी,ता.२१(प्रतिनिधी)–

**भटक्या जाती जमाती व आर्थिकदृष्ट्या मागास लोक अधिक राहत असलेल्या चिकोडी शहरातील रामनगर व संजय गांधी नगर येणाऱ्या काळात चिकोडीतील सर्वाधिक विकसित नगर होईल, असे आमदार गणेश हुक्केरी यांनी सांगितले.**

शहरातील रामनगर येथे विविध विकासकामांना मंजूर निधीचे आदेश पत्र देऊन ते बोलत होते.पुढे ते म्हणाले, पुढील ६ महिन्यात २० कोटी रुपयांचा निधी आणून चिकोडी शहराचा विकास केला जाईल.रामनगर येथील लोकांना लवकरच अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हक्कपत्र वाटप करू, असे सांगितले.माजी नगराध्यक्ष रामा माने म्हणाले, रामनगर वसाहत आमदार गणेश हुक्केरी व विधान परिषद सदस्य प्रकाश हुक्केरी यांनी अधिक निधी देऊन विकास केले.



**चिकोडी शहरातील मुस्लिम समुदाय भवनासाठी निधी मंजूर आदेश पत्र देताना आम.गणेश हुक्केरी, रामा माने व इतर प्रमुख मान्यवर.**

येथील लोकांना आवश्यक असलेला वीज पुरवठा केला जाईल. घरावर वरून जाणारे हाय टेन्शन वीज तारा अन्यत्र हलविण्यात येतील. गटार रस्ते पिण्याच्या पाण्याच्या समस्या सह.विविध सोयी सुविधा पुरविण्यात येतील, असे सांगितले. त्यावेळी मुस्लिम समाजाच्या कब्रस्थान निर्मितीसाठी १० लाख रुपये, हनुमान मंदिराजवळ समुदाय भवन निर्मितीसाठी पाच लाख रुपये, अनुदान मंजूर झाले असून आमदार गणेश हुक्केरी यांनी आदेश पत्र संबंधितांना वाटप केले. यावेळी उपनलिका खोदाईला देखील आमदार गणेश हुक्केरी यांनी चालना दिले. यावेळी ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष सतीश कुलकर्णी, माजी नगरसेवक अनिल माने, इरफान बेपारी, रमेश हीतलमनी, संदीप शेरखाने, गुलाब बागवान, साबीर जमादार, महावीर दांडगे, हेस्कामचे अधिकारी सुखसारे नगर परिषदेचे मुख्याधिकारी जगदीश इट्टी आदी उपस्थित होते.

## संकेश्वरात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

संकेश्वर,ता.२१(वार्ताहर)–

**संकेश्वरात विश्वगुरु श्री बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.**

संकेश्वर बसवाण गल्ली, कुंभार गल्ली, पाटील गल्ली, अंकले रस्ता येथील बसवप्रेमींनी चिकोडी घटगी बसवेश्वर देवस्थान,केळेगांव बसवण्णा, कुडलसंगम आणि अंजनयबेट्ट येथून आणलेल्या बसवज्योतीचे डॉ.शिवलिंगेश्वर महास्वामीजी, संकेश्वर सच्चिदानंद अभिनव विद्यानृसिंह भारती महास्वामीजी, अप्पासाहेब शिरकोळी,पवन कत्ती, राजेंद्र पाटील, गजानन क्वळी, अमर नलवडे, श्रीकांत हतनुरी, मुक्तार नदाफसह अनेक मान्यवरांनी, बसवप्रेमींनी भक्तीपूर्वक स्वागत केले.संकेश्वर पालिका, बसवेश्वर सर्कल,राणी चन्नम्मा सर्कल, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, क्रांतीवीर संगोळी रायण्णा सर्कल, चनगौडा गल्ली बसवाण गल्ली तसेच गावात ठिकठिकाणी बसवज्योतीचे बसवप्रेमींनी महिलांनी जल्लोषात स्वागत केले.यावेळी संजय शिरकोळी, हुक्केरी विद्युत संघाचे संचालक शिवानंद मुडशी, सुभाष कासारकर, माजी नगरसेवक बसनगौडा पाटील,सुनील पर्वतराव, चिदानंद कर्देण्णावर, रोहण नेसरी, दिलीप होसमनी, महेश हट्टीहोळी, गंगाराम भूसगोळ, अविनाश नलवडे,सचिन भोपळे,उमेश कांबळे, ॲड विक्रम कर्निंग, ॲड प्रमोद होसमनी, परमानंद मन्नोळी, कुमार बस्तवाडी, संतोष सत्यनाईक, विजय जरळीसह अनेक मान्यवर सहभागी झाले होते.

## निढोरीत शिवजयंती साजरी

निढोरी,ता.२१(वार्ताहर)–

**येथील ईलेव्हन फायटर मंडळाच्यावतीने पारंपारिक शिवजयंती उत्साहात पार पडली. सिंधुदुर्गवरुन आणलेल्या शिवज्योतीचे पुजन सौ.निताराणी सुर्यवंशी, मनिषा सुर्यवंशी, सरपंच शुभांगी सुतार यांच्या हस्ते करण्यात आले. शिवप्रतिमा पुजन एकनाथ कळमकर, भैरवनाथ रंडे, के.बी.पाटील, ध्वजपुजन प्रविण भाकरे, ध्वजारोहण प्रा.विजय पाटील यांनी केले.**

सिंधुदुर्ग ते निढोरी शिवज्योत दौडीतील सहभागी युवकांचा शाल, श्रीफळ व मानाचा फेटा देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये विनायक मगदुम, अनिकेत मगदूम, अनंत पावले,गब्बर कळमकर, गुरुनाथ लोहार, अनिल मगदुम, सातापा कांबळे,गोटुआण्णा चितळेआदींचा सत्कार या प्रसंगी करण्यात आला. शिवजन्मोत्सवप्रसंगी पाळणागीत महिलांनी सादर केले.याप्रसंगी बिद्रीचे संचालक सुनिलराज सुर्यवंशी, जेष्ठ नेते सुरेशराव सुर्यवंशी, बाजीराव मगदुम, बाळ भोसले, संपत मगदूम, बाळासो मगदुम, रणजितसिंह सुर्यवंशी, संग्राम सुर्यवंशी, सुरेश बिल्ले, अजित सुतार, आनंदा लोकरे उपस्थित होते. आभार सुनिल भाकरे यांनी मानले.

## बेडकिहाळात शिवजन्मोत्सव उत्साहात

बेडकिहाळ,ता.२१(वार्ताहर)–

**येथील छत्रपती शिवाजी तरुण मंडळाच्या व समस्त शिवप्रेमी यांच्या वतीने पारंपारिक पद्धतीने शिव जन्मोत्सव उत्साहाने साजरा करण्यात आला.**

राजेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली पन्हाळगडावरून श्रीधर कोळी, सयाजी घाटगे, प्रेम कोळी, प्रवीण देसाई, सुमित खरात व गणेश गडकरी या धावपटूंनी शिवजोत आणली.शिवजोतीचे स्वागत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शिवज्योत मिरवणुकीत सजविलेल्या लहान पालखीतील छत्रपती शिवाजींची प्रतिमा आकर्षक ठरली.यावेळी राजेंद्र पवार वड्डर,इंद्रजीत पाटील, सुनील नारे, प्रकाश धनगर, दत्तकुमार पाटील, अशोक आरगे, मलगौडा पाटील, जनगौडा धड्डु पाटील, रावसाहेब हनबरहट्टी, अजित पाटील यांच्यासह सर्व कार्यकर्ते व युवक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. महिलांच्यावतीने पाळणा गीत गायन झाल्यानंतर सुंठवडा वाटप करण्यात आला.रात्री हरिसेवा भजनी मंडळाच्यावतीने भजन भक्ती गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला.

# बाळूमामा देवस्थानची रुग्णवाहिका मोफत पुरवणार

### विश्वस्त मंडळाच्या बैठकीत निर्णय

गारगोटी,ता.२१(प्रतिनिधी)–

**भुदरगड तालुक्यातील आदमापूर येथील सद्गुरू बाळूमामा देवस्थानची रुग्णवाहिका गरजू रुग्णांसाठी मोफत पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला.देवस्थान समितीच्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे कार्याध्यक्ष पुंडलिक होसमणी हे होते.**

या निर्णयामुळे गोरगरीब, गरजू रुग्णांची सोय झाली आहे. भाविकांना चांगल्या सोई सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समितीचे प्रयत्न सुरु असून प्रलंबित प्रश्न लवकरच मार्गी लागतील, असे मंडळाचे मानद अध्यक्ष धैर्यशील भोसले यांनी सांगितले.तसेच बाळूमामा देवालयाचा विकास आराखडा अंतिम करण्यासाठी पालकमंत्री ना प्रकाश आबिटकर यांच्यासोबत बैठक लवकरच घेऊन हा विकास आराखडा निश्चित करण्याचे ठरले. या बैठकीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी संचित कदम व व्यवस्थापक दत्तात्रय पाटील यांनी देवालयाची रुग्णवाहिका रुग्णासाठी मोफत सुरु करावी, अशी मागणी केली होती.या मागणीवर ही सेवा मोफत पुरवण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. यशवंत पाटील व संभाजी पाटील यांनी या निर्णयाचे स्वागत केले. बैठकीस दत्तात्रय पाटील, दिनकरराव कांबळे, संदिप मगदूम, दिलीप पाटील, सचिव रावसाहेब कोणेकरी, रामन्ना मरेगुदरी, इंद्रजित खर्डेकर, विनायक शिंदे आदी उपस्थित होते. तम्माना मसरेडी यांनी आभार मानले.

# निसर्गाला कृतघ्नपणे ओरबडू नका-सुर्यवंशी

मुरगूड,ता.२१(प्रतिनीधी)–

**निसर्गाकडे चला, निसर्ग भरभरून देतो.विद्यार्थ्यांनो निसर्गमित्र बना, कृतघ्नपणे निसर्गाला ओरबडू नका,असे प्रतिपादन वृक्षमित्र प्रविण सुर्यवंशी यांनी केले. पी.एम. श्री केंद्रशाळा केनवडे (ता.कागल) येथे 'पर्यावरण संवर्धन आपले कर्तव्य' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विजयकुमार पाटील हे होते.**

वृक्षमित्र सुर्यवंशी पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या शालेयजीवना पासूनच स्वतःमध्ये निसर्गप्रेम जोपासावे. शाळांनी फटाकेमुक्त दिवाळी अभियान, पर्यावरण पूरक गणेशोत्सव, वृक्षरक्षाबंधन, बीज संकलन,संकलित बियांची हवाई पेरणी, शाळेतून रोपवाटिका निर्मिती, रोपांचे वाटप व वृक्षारोपण यासारखे कृतिशील कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये सहशालेय उपक्रमाच्या माध्यमातून राबवावेत. शालेय जीवनातूनच विद्यार्थ्यांच्या मध्ये वृक्ष,पक्षी,प्राणी निसर्ग यांचे विषयी भूतदया निर्माण करणे गरजेचे आहे. कार्यक्रम प्रसंगी वृक्षमित्र प्रवीण सुर्यवंशी लिखित झाडमाया कवितांची हिरवाई या कवितासंग्रहाच्या प्रती व वृक्षांची रोपे वृक्षमित्र सुर्यवंशी यांचे कडून शाळेस भेट देण्यात आली.

यावेळी श्रीमती शरावती कोरवी, कृष्णात पाटील, श्रीमती श्रावणी देवेकर,श्रीमती वनिता पाटील,रामकृष्ण कांबळे,प्रतीक शिंगे, आदी शिक्षक वृंदासह विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक युवराज पवार यांनी तर आभार प्रदीप जाधव यांनी मानले.

## निधन वार्ता

### सुरेश स्वामी

मिरज,ता.२१(प्रतिनिधी)–



माळी गल्ली, मंगळवार पेठ, मिरज येथील रहिवासी व ज्येष्ठ ज्योतिषाचार्य सुरेश बाबुराव स्वामी (वय ७६) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, पुतणे, मुलगी,जावई व नातवंडे असा परिवार आहे.

### जनाबाई नंदीकुरळे

घोसरवाड,ता.२१–



घोसरवाड (ता.शिरोळ) येथील प्रतिष्ठित महिला जनाबाई दत्तात्रय नंदीकुरळे (वय८५) यांचे निधन झाले.त्या घोसरवाड येथील वृत्तपत्र एजंट बजरंग नंदीकुरळे यांच्या मातोश्री होत्या.त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### आकुबाई धनगर



कागल,ता.२१(प्रतिनिधी)–

करनूर (ता.कागल) येथील ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या सौ.आकुबाई मायाप्पा धनगर (वय ७६) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# शिंगाडे ट्रस्टच्यावतीने सामुदायिक विवाह सोहळा संपन्न

बेडकिहाळ,ता.२१(वार्ताहर)–

**कै.बसवंत नागू शिंगाडे चॅरिटेबल ट्रस्टकडून छ. शिवाजी महाराज व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात संपन्न झाला.**

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. विक्रमसिंह जाधव-ब्रेन स्पेशालिस्ट मानसोपचार तज्ञ मिरज,डॉ.शर्वरी विक्रमसिंह जाधव-भारती विद्यापीठ प्रमुख मिरज यांच्या हस्ते करण्यात आले.प्रतिमेचे पूजन अशोक जंगम,अशोक नरुटे, डॉ. प्रकाश कदम,डॉ.युयुत्सु आर्ते, बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.स्वागत व प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.विक्रम शिंगाडे यांनी केले.यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.सविता आहिरे उद्योजिका मुंबई, ॲड.निरंजन कांबळे नेज, ग्रामविकास अधिकारी प्रकाश धनगर, शेतकरी संघटना अध्यक्ष तात्यासाहेब केस्ते उपस्थित होते.



**बेडकिहाळः सामुदायिक विवाह सोहळ्याप्रसंगी उपस्थित वधू-वर,बाजूला विक्रम शिंगाडे, डॉ.विक्रमसिंह जाधव व इतर.**

डॉ.प्रकाश कदम म्हणाले, शिंगाडे चॅरिटेबल ट्रस्ट ही संस्था गेली अनेक वर्षांपासून सामाजिक शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत आहे.यावेळी बाळासाहेब शिंदे,डॉ.विक्रमसिंह जाधव, प्रा.डॉ.अमर कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. सामुदायिक विवाह सोहळ्यात वधु वरांचे हिंदू विवाह पद्धतीने विधीवत कन्यादान करुन विवाह सोहळ्यामध्ये मंगळसूत्र, जोडवी, शालु वराला ड्रेस, उपरणी संसार सट देवून थाटामाटात विवाह सोहळा संपन्न झाला.

यावेळी तात्यासाहेब केस्ते, संपत बोरगल, आस्मा कलावंत, अरुण यादव,तुषार कांबळे, सुधाकर माने, नेताजी गोरे, निलेश सनदी, अरुण कांबळे,सुशिल कांबळे, दिलिप कांबळे आदी उपस्थित होते. आभार ॲड.सुदर्शन तम्मन्नवर यांनी मानले.

# कोगनोळीत भव्य शोभायात्रेने शिवजयंती सोहळा साजरा

## लोककलाकार ठरले मिरवणुकीचे आकर्षण

कोगनोळी,ता.२१(प्रतिनिधी)–

**येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळ व समस्त बहुजन समाजातर्फे युगपुरुष छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा उत्साहात व भक्तीभावाने साजरा करण्यात आला. त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

रविवारी सकाळी ७ वाजता किल्ले रांगणा येथून आणलेल्या शिवज्योतीचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. त्यानंतर शिवज्योत गावातील प्रमुख मार्गावरुन अंबिका मंदिरात आणण्यात आली. १० वाजता सुरदास गायकवाड महाराज यांचे शिव जन्मकाळ आख्यानावर किर्तन झाले.दुपारी १२ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी शिवरायांचा जयजयकार करण्यात आला.त्यानंतर भाविकांतर्फे पुष्पवृष्टी करण्यात आली. जन्मोत्सवानंतर फटाक्यांची जोरदार आतषबाजी करण्यात आली. महिलांनी पाळणा गायल्यानंतर सुंठवड्याचे वाटप करण्यात आले.



**कोगनोळी येथे शिवजयंतीनिमित्त मिरवणूकीच्या उद्घाटनप्रसंगी वीरकुमार पाटील, उत्तम पाटील, पंकज पाटील, सुजय पाटील, प्रकाश गायकवाड व इतर प्रमुख मान्यवर.**

सायंकाळी ६ वाजता माजी ऊर्जामंत्री वीरकुमार पाटील, निपाणी मतदार संघाचे युवा नेते उत्तम पाटील, माजी जिल्हापंचायत उपाध्यक्ष पंकज पाटील, युवा नेते सुजय पाटील व मान्यवरांच्या हस्ते मिरवणूकीचे उदघाटन करण्यात आले. ही सवाद्य मिरवणूक गावातील प्रमुख मार्गावरुन काढण्यात आली. ही मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्याच्या दुर्तफावर शिवभक्तांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी सैनिक टाकळी येथील राजमाता जिजाऊ फौंडेशन व लेझीम ग्रुप यांनी विविध प्रात्यक्षिके सादर केल्यामुळे ही मिरवणूक आकर्षक ठरली. ही मिरवणूक तब्बल तीन तास चालली होती.

या मिरवणूकीमध्ये मानाची बैलगाडी, अश्व, पालखी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत साकारलेला तरुण यामुळे ही मिरवणूक लक्षवेधी ठरली.

याप्रसंगी उत्तम पाटील व मान्यवरांच्या हस्ते शिवस्मारक सांस्कृतिक भवनामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जयकिसान पीकेपीएस संघाचे चेअरमन प्रविण पाटील,सल्लागार प्रकाश गायकवाड,अशोक हेंगाडे, शिवजयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष संदीप डोंगळे, दिलीप पाटील, सतिश पाटील, किरण पाटील, मराठा मंडळ ट्रस्टचे उपाध्यक्ष उमेश पाटील, के.डी.पाटील,युवराज कोळी, तात्यासाहेब कागले,झाकीर नाईकवाडे,बाळासो पाटील, विनायक गायकवाड,अनिल पाटील, अभिजीत देसाई, दिनेश पाटील, रोहित माणकापूरे, सुरेश पाटील-कापशीकर, महेश पाटील, धनाजी भिवाजी-पाटील, अविनाश पाटील,संतोष पाटील-बद्री यांच्यासह शिवजयंती उत्सव मंडळाचे पदाधिकारी,गावातील तरुण मंडळांचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## सीबीएसई दहावी निकालात सीटीई इंटरनॅशनल स्कूलची बाजी

चिकोडी,ता.२१(वार्ताहर)–

**नवी दिल्ली येथील केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने घोषित केलेल्या दहावीच्या निकालात चिकोडी येथील सीटीई संस्थेच्या इंटरनॅशनल पब्लिक स्कूलने दैदीप्यमान यश संपादन केले आहे.**

महाविद्यालयाने सलग ११ व्या वर्षी १०० टक्के निकालाची आपली गौरवशाली परंपरा कायम राखली असल्याची माहिती संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. मिथुन एस. देशपांडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.सन २०२५-२६ च्या शैक्षणिक सत्रात या विद्यालयातून एकूण ६७ विद्यार्थी परिक्षेला बसले होते आणि सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे विशेष श्रेणी ४० विद्यार्थी, प्रथम श्रेणी १४ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये विहान संकेत मांजरेकर याने ९३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, प्रतीक व्ही. चौरासिया याने ८९.४ टक्के गुणांसह द्वितीय तर पद्मप्रिया आर. टिक्के आणि तनिषा ई. अंसारी यांनी प्रत्येकी ८८ टक्के गुण मिळवून संयुक्तपणे तृतीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सीटीई संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व संचालक मंडळ,मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंदाने विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

### * खरेदी विक्री *

**स्टॉकचे चांगल्या क्वालिटी** प्लायवुड स्वस्तात विकणे आहे. संपर्क- ९७६३२७७५९८.

**कबनूर येथे दिड गुंठा** १४ मागाचे रिकामे आरसीसी शेड ५८ बाय २६ एन.ए. प्लॉट व १ बीएचके राहणेस उपयुक्त विकणे आहे. संपर्क- ८७८८०३३७९२.

**२ बीएचके ३ फ्लॅट रेडीपोसीशन,** लिफ्ट, कर्ज सुविधा उपलब्ध, श्री स्वामी समर्थ प्लाझा, जवाहरनगर, ९८९०११६१६१.

**प्लॉट विकणे आहे** सांगली नाका ते टाकवडे रोडवर एसआयटी पॉलीटेक्निक कॉलेज शेजारी, एन.ए. ५०'बाय ७०' क्षेत्र. संपर्क- ८८८८९४१२९२.

**विकणे आहे २६.६३ गुंठे जागा** १२ हजार फुट बांधकाम लाईट,बोअरसह ६० फुट/३०फुट रोडटच विकणे आहे. संपर्क- ९४२२६२२६०८.

**अर्जंट प्लॉट विकणे** हातकणंगले येथील हातकणंगले-कुंभोज रस्ता ५ प्लॉट, प्रति प्लॉट क्षेत्रफळ- १७२२ स्क्वे.फूट. कलेक्टर एनए. संपर्क- ८७६७८६७२८६, ९५४५३२९१०८.

**जुने व नवीन पॉवरलूम** घेऊ व देऊ, तसेच फवारा कांडीमशिन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क- ८३१७२९१००८

### * शैक्षणिक विषयक *

**फिनिक्स इन्फोवे कॉम्प्युटर क्लास** ३ महिन्याचा कोर्स करा आणि मोफत चांगली नोकरी, पत्ता- हिरकणी हॉटेलसमोर, राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. फोन-९३५६७७००३७, ९८९००६२०१७

**Home Tuition** 5 th to 10 th- Maths Science, 11 th & 12 th- Chemistry, State board, CBSE, Ilt Foundation Course, Mob no. 8668802050.

### * आरोग्य विषयक *

**मानसिक आ**जार- व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्रचाळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैगिंक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क- ८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

**इचलकरंजीमध्ये** मिथून क्लिनिक- ९५+ वर्षे मुळव्याध, भगेंदर फिशर ऑपरेशन न करता खात्रीशीर उपचार. स्पेशालिस्ट व अनुभवी डॉ. मिथून बिस्वास. पत्ता- १) सौरभ इलेक्ट्रॉनिक्ससमोर, आवळे मैदानजवळ, शहापूर रोड, इचलकरंजी. पत्ता-२) जे.के. नगर, जगदंबा/मलाबादे चौक, शहापूर रोड, इचलकरंजी. मो. ७२५९४४२५४४, ९८९०५०९२३४

### * बोअरवेल *

**राज बोअरवेल-** आमच्याकडे ४।।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात काम मिळेल. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७

**श्री सिध्देश्वर बोअरवेल** आमचेकडे ६।। इंची बोअर योग्य दरात मारून मिळेल तसेच घरगुती अडचणीच्या ठिकाणी ४।। इंची बोअर मारून मिळेल. संपर्क- ७७७५९३७५७२, ८५५४९८४५६३

**छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद**

### * नोकरी विषयक *

**आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये** कामगार गरजू मुलगा व मुलगी पाहिजे. अट- शिक्षण-१२ वी, टू व्हिलर चालवता येणे आवश्यक. वयोमर्यादा- १८ ते ३० वर्षे. संपर्क-८८८८५११५२२

**मार्केटिंग ऑर्डर व** डिलीव्हरीसाठी इचलकरंजी व हातकणंगले तालुक्यासाठी एक सेल्समन पाहिजे आहे. गरजूंनी संपर्क करावा. ९९२३२९२५५८

**पाहिजेत.** CNC, VMC ऑपरेटर, हेल्पर, प्रोग्रॅमर, प्रोडक्शन सुपरवायझर व मशिन क्लिनिंगसाठी मुले पाहिजेत. संपर्क- ९६८९५८३४९५

**हॉस्पिटलमध्ये** साफसफाई कामासाठी डे/नाईट मावशी पाहिजे. संपर्क-७६२०८८६९११

**फायनान्स ऑफिस कामासाठी** मुलगी पाहिजे. कॉम्प्युटर नॉलेज आवश्यक. ऑफिस टाईम ९ ते ६ राहिल. मो. ९१३०६९००१०, ९५९५९१९६२५

**कबनूर व जवळच परिसरातील** वेल्डर किंवा हेल्पर पाहिजेत. संपर्क-गुरूकृपा फॅब्रिकेटर, कबनूर. फोन-९९२२८०९८०३

**महिला सेल्सगर्ल पाहिजे.** संपर्क- पार्थ ऑप्टिकल, विरशैव बँकेसमोर, इचलकरंजी. फोन- ९५४५०७९९०२

**कामगार पाहिजेत.** लेडिज कलेक्शन दुकानात शिकाऊ व गरजू ३ ते ५ मुली व लेडीज कामगार पाहिजेत. पत्ता- जनता चौकजवळ, फोन-७७७३९९७६३४, ९८६०८०७३८६

**ऑफिसमध्ये कॉम्प्युटर** ऑपरेटींगसाठी तसेच सॅम्पल कटींगसाठी लेडीज स्टाफ पाहिजे. संपर्क-९४२२४१६४२३, गरजूंनी भेटावे.

**नामांकित कंपनीमध्ये** CNC, VMC ऑपरेटर, लाईन इन्स्पेक्टर, फायनल इन्स्पेक्टर, १०वी/१२ वी ITI/DME शिकाऊ, अनुभवी कामगार पाहिजेत. आकर्षक पगार. पीएफ+इएसआय सुविधा उपलब्ध. संपर्क-८८३०२६७३३०

**अर्जंट पाहिजे.** इचलकरंजी येथील पेट्रोल पंप कामासाठी महिला/पुरूष कामगार पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क-८८३०२६७३३०

**ज्वेलर्स शोरूममध्ये** कॉम्प्युटर ऑपरेटर, कौंटर सेल्समन+सेल्सगर्ल पाहिजेत सुशिक्षित, शिक्षण बी.कॉम, आकर्षक पगार+बोनस आपल्या संपूर्ण माहितीसह त्वरीत संपर्क करावे. श्री जिनेंद्र ज्वेलर्स, इचलकरंजी. ९४२१२०३९५१

**ऑफिस क्लार्क-** मुलगा/मुलगी १२ वी पास, स्थानिक, संगणकीय ज्ञान व अनुभवी. संपर्क-आनंदी एजन्सीज, मंगलमुर्ती टॉकीजसमोर, इचलकरंजी.

**URGENT REQUIRMENT-** लक्ष्मी सल्फेटस् टाकवडे कंपनीमध्ये खालील पदे भरणेचे आहे. १) एच.आर. (HR) अनुभव ३ वर्षे. २) ज्युनियर अकौंटंट अनुभव २ वर्षे. ३) प्रोडक्शन कामगार. आकर्षक पगार, पीएफ+ ईएसआय सुविधा. संपर्क- ८०८७३३६५७९, ९४०४८४५४५९

**कलर दुकानात** काऊंटरवर कामगार पाहिजेत. संपर्क- नवभारत पेंटस कॉंग्रेस कमिटीशेजारी, बंगला रोड, इचलकरंजी. ९८२३१८१४४८

**गॅस एजन्सी ऑफिसमध्ये** सिनिअर स्टाफ महिला पाहिजेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. अकाऊंटींग, टॅली येणाऱ्यास प्राधान्य. शहापूर-डेक्कन रोड, खणीजवळ, एच.पी. गॅस गोडावून. फोन-९५४५२२०१८९

**इचलकरंजीतील** नामांकित कॅफेमध्ये कामासाठी मुले व मुली पाहिजेत. पार्ट टाईम/फूल टाईम शिकाऊंना प्राधान्य. संपर्क- ९५७९५८२१९५

**पावडर कोटींग कामासाठी** गरजू ऑपरेटर/हेल्पर पाहिजे आहेत. श्री पार्श्व इंटरप्राईजेस, पार्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, यड्राव- ९८२३०१५१०८. कायम डे शिफ्ट

**होलसेल औषध दुकानात** १०/१२ वी झालेली मुले/मुली पाहिजेत. पत्ता- सुशिल फार्मा एलएलपी, नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. मो. ९०९६२६१२७२. संपर्क-११ ते १

**पाहिजे.** १० वी, १२ वी पास/ नापास मुलगा पाहिजे. स्वत:ची टू व्हीलर आवश्यक. बिग बझारजवळ, इचलकरंजी. फोन- ८३७८९१२५२५

**ब्रॅन्डेड मेन्सवेअर** शोरूममध्ये अनुभवी सेल्सगर्ल पाहिजे. आकर्षक पगार+कमिशन मिळेल. संपर्क- ९६११८९५९८८

**पाहिजेत.** शिकाऊ/अनुभवी मुले व वायरमन, टॅली इआरपी मध्ये काम करणेसाठी अनुभवी अकौंटंट पाहिजे. जीएसटी पोर्टल व ऑफिस ज्ञान आवश्यक. संपर्क- ९४२११००५५५

**१२ माग ८ तास** तसेच १२ माग १२ तास माग चालवण्याकरिता कामगार पाहिजेत. तसेच ३२/४० मागासाठी जॉबर पाहिजे व ८ माग चालविण्यासाठी फिक्स कामगार पाहिजे. ९०११०९९०२७, ७०२००८१६७१

**पाहिजेत.** शिकाऊ/अनुभवी मुले व वायरमन, टॅली इआरपी मध्ये काम करणेसाठी अनुभवी अकौंटंट पाहिजे. एम.एस. ऑफिस ज्ञान आवश्यक. संपर्क- सोसायटी इलेक्ट्रीक-९४२११००५५५, ९९२२९४२४२४

**पॅकींगसाठी लेडीज पाहिजे** कामासाठी मुलगा पाहिजे., गारमेंटचे शिलाईचे काम घरी देऊ. संपर्क- ८२०८०२७९३४, ९४०४२८२५४.

**पेट्रोल पंपावर** काम करण्यासाठी कामगार पाहिजेत. मो. ९३५६६७०७४६, ९५४५४८४३१७

**पाहिजे.** सांगली रोड, आईस्क्रीम पार्लरमध्ये पार्टटाईम, फूलटाईम कामगार पाहिजे. फोन- ९५०३७०४०३०

**ऑटो कॅड व मराठी,** इंग्रजी टायपिंग येणारे कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. संपर्क-७२७६९४२५०८

**सिक्युरिटी गार्ड पाहिजे.** ड्युटी ८ तास, आवाडे पार्क, लक्ष्मी इंडस्ट्रिज, खंजिरे इंडस्ट्रिज, कोरोची या ठिकाणी तीनही शिफ्टमध्ये काम करणारा पाहिजे. ८३२०९५५१२५

**आईस्क्रीम फॅक्टरीमध्ये** लेडीज स्टाफ पाहिजे आहे. ७८८८२७१०२७, इचलकरंजी.

**गारमेंट कामासाठी** पॅकिंगसाठी जेंटस/लेडीज पाहिजे. संपर्क- ९२८४८१०८२९, इचलकरंजी.

**Required-** B.Com Candidates P.R. Loya and Co. (Tax Consultant) kagwade Mala, Ichalkaranji. Phone-9850061800

**पाहिजे.** ऑफिस+गोडाऊन किपर पाहिजे. १२ वी पास, कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. प्रामाणिक, हुशार, पगार-१६ हजार. संपर्क- ९७९२७२७१७१

**अर्जंट सिक्युरीटी गार्ड भरणे-** ड्युटी ८ तास, सर्व सुविधा उपलब्ध. लक्ष्मी इंडस्ट्रिज, हातकणंगले. संपर्क- ९६०४६३९१०३

**वर्कशॉपमध्ये** कामगार पाहिजेत. लेथ मशिन ऑपरेटर, वेल्डर व हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क-९२८४८०१९१९

**टेक्स्टाईल फॅक्टरी** ऑफिस कामासाठी कामगार पाहिजे. संपर्क-हर्षित-९५१८७२७३०४, प्राईड इंडिया, तारदाळ.

**वॉचमन सुपरवायझर पाहिजेत.** २६ दिवस-१८००० पगार. श्री लक्ष्मी इंडस्ट्रिज इस्टेट, हातकणंगले. संपर्क- ७२७६४७५९५२, ९८८१९७८४८८

**टू व्हिलर पार्किंगसाठी** कामगार पाहिजे. संपर्क-८२३७७४४४४४, इचलकरंजी.

**पाहिजेत.** Autocad Draftman-1, Helpers, शिकाऊ, कामगार भरणे आहे. भेटा- परफेक्ट स्टिल्स, कोरोची. संपर्क- ८७९३५४४४९७, ९३२६१०७६४४

**मोबाईल शॉपीमध्ये-** अनुभवी अकौंटंट व मॅनेजर पाहिजेत. मोबाईल क्षेत्रातला १ वर्षाचा अनुभव आवश्यक. प्रमोटर असेल तरी चालेल. पगार- १८०००+इन्सेंटिव्ह व अकौंटंट पगार-१२०००. संपर्क-आकाश मोबाईल-८२०८८६३००९

**Wanted Teachers.** For English med Ichalkaranji. B.P. Ed Teacher (Physical Teacher Required) Class- 5th to 10th. English, Hindi, SST (B.A./M.A./B.Ed) Maths (B.Sc/M.Sc B.Ed) English Fluency is Must. Contact- 9518904050, 8087218675

**आंतरराष्ट्रीय कंपनी** शोरूम एचपी वर्ल्डमध्ये Marketing Executive (ISP) करिता जागा भरणे. अनुभवींना प्राधान्य. वय-२१ ते ३०, मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व. IT Hardware/ Software ज्ञान व ग्रॅज्युएट, पगार-कमीत कमी २१०००/- पासून अनलिमिटेड अधिक माहितीसाठी. संपर्क- ९३२५८११९०४, ८३७८९८११०४

**प्लंबिंग हार्डवेअर व** सॅनिटरी दुकानात कामगार पाहिजे व लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर, मार्केटिंगसाठी सेल्स पर्सन पाहिजे. संपर्क- ९५०४१११७७१- शहापूर

**पाहिजे.** वॉटर पुफिंग कामाकरिता शिकाऊ/अनुभवी कामगार पाहिजेत. आकर्षक पगार, ऑफिस कामाकरीता लेडीज पाहिजे. संपर्क-९५४५१५९९११

**कोंडिग्रे येथे** बांधकाम साईटसाठी वॉचमन पाहिजे. देखरेख, पाणी मारणे व साफसफाईचे काम. संपर्क-९४२२४१६३७०

**हॉटेल लॉजिंगसाठी** साफसफाई हाऊस किपींगसाठी महिला, पुरूष पाहिजेत. फूलटाईम, पार्टटाईम. संपर्क-९४०३१३६६६९, ८४८४९८१३०१

**शिकाऊ लेडीज** कामगार भरती सुरू आहे. नेण्याची आणण्याची सोय यड्राव, शहापूर, कोरोची मार्गे लक्ष्मी इंडस्ट्रिज, हातकणंगले. कोअर शॉपी लक्ष्मी इंडस्ट्रिज इस्टेट, हातकणंगले. संपर्क- ७७४५८८४८९६, ९८९०८८७१९६

**इचलकरंजी शहरातील** नामांकित अजब फर्निचर मॉलमध्ये लेडीज/जेंटस सेल्समन व कॉम्प्युटर अकौंटंट पाहिजेत. संपर्क- ९४२३८६०१३८, स्टेशन रोड, इचलकरंजी.

**ड्रायव्हर पाहिजे.** छोटा हत्ती गाडीवर ट्रान्सपोर्ट लायसनधारक ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ७५१७५०६६८२

**अनुभवी/शिकाऊ** कामगार पाहिजे. संपर्क- न्यु. बालाजी शु वर्ल्ड, पुरवठा कार्यालयासमोर, गांधी पुतळा, इचलकरंजी. मो. ८७८८६४०५६०, ९०७५७४२९१७

**किराणा दुकानामध्ये** कामासाठी शिकाऊ/अनुभवी कामगार पाहिजे. संपर्क-९८८१३७७०५८, इचलकरंजी.

**दिवाणजी पाहिजे.** ॲटोलूम ट्रेडिंग कंपनीमध्ये जॉबवर्क कामाचा अनुभव असलेला दिवाणजी पाहिजे. संपर्क-९३२६०३९०८७

**ऑपरेटर पाहिजे.** कापड ट्रेडिंग कंपनीमध्ये आर.जी.के. सॉफ्टवेअर वर डाटा इन्ट्री करणारा फूल टाईम पाहिजे. संपर्क-९३२६०३९०८७

**कामगार पाहिजे.** मिलींग मशिन व सरफेस ग्रायडिंग मशिनवर हुशार व अनुभवी कामगार पाहिजे. संपर्क- ९८९०४१८२४८, ९०६७२३१७७३

**नामांकित कंपनीमध्ये** पाहिजेत. पद स्टोअर व परचेस इन्चार्ज, अनुभव संबंधित क्षेत्रातील १ ते २ वर्षांचा, वेतन-अनुभवानुसार, आकर्षक पगार दिला जाईल. संपर्क-९७६६७२७८१६

**अकाऊंटींगसाठी** गरजू मुले पाहिजेत. टॅली येणे आवश्यक. ओल्ड मुंबई आईस्क्रीमजवळ, स्टेशन रोड, इचलकरंजी. ९७७१७३७९५५

**Required** 1) Office Assistant 2) Sales/ Marketing Executilve 3) Payment Recovery Agent. Contact- 9922123499

**Required** 1) Compurter Hardware and Net Woking Engineer 2) CCTV Engineer. Contact- 9822421416.

**नामांकित कंपनीमध्ये कामगार** व वेल्डर, प्लंबर पाहिजेत. आकर्षक पगार, पीएफ+ईएसआय सुविधा. शिक्षणाची अट नाही. संपर्क- ९६५७१४१०५८.

**सीएनसी व एचएनसी ऑपरेटर पाहिजेत.** जागा-६, जॉब पेटींगसाठी कामगार पाहिजे-१. आकर्षक पगार, ईएसआय सुविधा. संपर्क- ७८४१९११२९६, ९८५०८७१४८१.

**कामगार पाहिजे** फॅक्टरीसाठी हेल्पर कामगार पाहिजे. आकर्षक पगार, पत्ता-पार्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, यड्राव. संपर्क- ९६०४२४८९२५, ९५४५९०८०००.

**इचलकरंजीमध्ये नामवंत** कॅफेसाठी अनुभवी व शिकाऊ शेफ शिफ्टनुसार पाहिजेत. टाईम- स.१० ते ४ आणि दु. ४ ते १०, आकर्षक पेमेंट दिले जाईल. मुले- मुली चालतील. संपर्क- ७९७२६०६८३७.

**शिकाऊ/अनुभवी सीएनसी/** व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत. भेटा- इंदू सीएनसी शॉप, सुंदर बागे जवळ, हॉटेल थाळी हाऊसमागे. मो. ९३७०१४३०३५.

**Required** Maths Faculty For reputed Commerce Academy For 11 th and 12 th in Ichalkaranji. Qualification: Msc. B.ed Contact 9075650996.

**इलेक्ट्रीक दुकानात** सेल्समन हवे आहेत. शिकाऊ/अनुभवी. दोघांना प्राधान्य. संपर्क-९५४५८४१३१४

**CNC/VMC** ऑपरेटर पाहिजेत. पत्ता- श्री लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, हातकणंगले. संपर्क- ९८५००५७५६३

**जॉकी एक्सक्लुझिव्ह** इचलकरंजी आकर्षक पगारासह खालील जागांची भरती करत आहे. १) पुरूष सेल्समन-२ जागा. २) महिला सेल्सगर्ल-२ जागा. संपर्क- ९५०३५२१००४, ७२४९८४३२५६

**कापड दुकानात** कामासाठी हेल्पर मुले, शिकाऊ/अनुभवी मुले पाहिजेत (पुरूष) आकर्षक पगार दिला जाईल. श्रीराम टेरिन सेंटर, इचलकरंजी. सकाळी-९.३० ते रात्री-९.००.संपर्क-९८२३५८११८८

**लॅबमध्ये ब्लड कलेक्शनसाठी** शिकाऊ/अनुभवी मुली पाहिजेत. श्री बालाजी लॅब, पाटील अर्थोपेडिक हॉस्पिटल, चांदणी चौक, श्रीपाद नगर, इचलकरंजी. ९६७३९७९९९५

**सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** पार्वती इंडिस्ट्रिज इस्टेट, यड्राव-१२ तास. संपर्क-८७९९९५००३३, ८७६७२३३१३४

**प्लॅस्टिक कंपनीमध्ये** रॉ मटेरियलच्या मार्केटिंगसाठी कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगलीसाठी शिकाऊ/अनुभवी उमेदवार पाहिजेत. संपर्क- ९४०४४२७८८०

**CA** फर्ममध्ये संगणक व टॅली ज्ञान असणाऱ्या मुली पाहिजेत. संपर्क- ८०८८२३५३२४

**व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत.** बस स्टॅंडजवळ स्टेशन रोड, आलासे कंपौंड पासून पेट्रोल पंपासमोर, इचलकरंजी. फोन-९८२२७६६७६२

**ड्रायव्हर पाहिजे.** घरगुती कामासाठी अनुभवी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ९०९६१९१०७१, ८९९९०५७७२९

**कोरोचीमधील नामांकित अकॅडमीमध्ये** ५ वी ते १० वी वर्गासाठी सर्व विषयासाठी शिक्षक भरणेचे आहे. संपर्क- ७०२०४६९०२५

### * भाड्याने देणे/घेणे *

**सांगली रोड,** नारायण मळा परिसरातील तळमजल्यावर २ बीएचके सर्व सोयीनियुक्त फुल्ली फर्निश्ड स्वतंत्र बंगला भाड्याने देणे आहे. (एजंट क्षमस्व) संपर्क- ९८९०१५९०२३

**घर भाड्याने देणे.** शाकाहारी फॅमिलीसाठी वर्धमान चौक येथे सर्व सोयीनियुक्त घर भाड्याने देणे आहे. अकिवाटे- ९५९५०८८७८८

**२५०० स्क्वे. फूटाचा हॉल** भाडेतत्त्वावर देणे आहे. बँक, फायनान्स, गोल्ड शोरूम व इतर व्यवसायासाठी राणी बागेसमोर, इचलकरंजी. फोन-९२५६५७२७२७

**सर्व सोयीनियुक्त जागा** हॉस्पिटल ऑफिससाठी भाड्याने देणे. के.पी. कॉप्लेक्स, राणी बागेजवळ, इचलकरंजी. फोन- ९४२२०४३६७६, ८८५५८९३९९८

**फ्लॅट भाड्याने देणे.** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त दुसरा मजला, सांगली रोड, पाटील मळा, हनुमान मंदिरजवळ, इचलकरंजी. फोन- ९४२१८४९२६९

**१ बीएचके खोली** भाड्याने देणे आहे. पत्ता- जनता चौक, पल्लवी हॉटेल रोड, साखरपे हॉस्पिटलमागे, इचलकरंजी. मो. ९०२१३२१३३३

**१ बीएचके** सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. (सेप्रेट वरचा मजला) पाणी २४ तास. धुमाळ डॉक्टर समोरील बाजूस, केटकाळे नगर. संपर्क-९८६०१९८३८४

**खाऊ गल्ली येथील** गाळा भाड्याने देणे. मोक्याच्या ठिकाणी, बिग बझार झुडीओ शोरूम परिसरात.संपर्क-९२७३२२३७३८

**भाड्याने देणे.** आरसीसी सिंगल रूम सर्व सोयीनियुक्त छोट्या कुटूंबासाठी पहिला मजला गुरूकृपा रेडिमेडस, नदी रोड, इचलकरंजी. भोसले-९५१८५४३६९५

**सांगली रोड, नारायण मळा,** परिसरातील तळमजल्यावर २ बीएचके सर्व सोयीनीयुक्त फुल्ली फर्निश्ड स्वतंत्र बंगला भाड्याने देणे आहे. (एजंट क्षमस्व) संपर्क- ९८९०१५९०२३.

**घर भाड्याने देणे** शाकाहारी फॅमिलीसाठी वर्धमान चौक येथे सर्व सोयीनीयुक्त घर भाड्याने देणे. अकिवाटे- ९५९५०८८७८८.

**२५०० स्क्वे.फुटाचा हॉल** भाडेतत्वावर देणे आहे. बँक, फायनान्स,गोल्ड शोरूम व इतर व्यवसायासाठी राणी बागेसमोर, इचलकरंजी. फोन- ९२५६५७२७२७.

**सर्व सोयीनीयुक्त जागा हॉस्पिटल,** ऑफिससाठी भाड्याने देणे. के. पी. कॉम्प्लेक्स, राणी बागेजवळ, इचलकरंजी. फोन- ९४२२०४३६७६, ८८५५८९३९९८.

**फ्लॅट भाड्याने देणे १ बीएचके** सर्व सोयीनीयुक्त, दुसरा मजला, सांगली रोड, पाटील मळा, हनुमान मंदिरजवळ, इचलकरंजी. फोन- ९४२१८४९२६९.

**१ बीएचके खोली भाड्याने देणे** आहे. पत्ता- जनता चौक, पल्लवी हॉटेल रोड, साखरपे हॉस्पिटलमागे, इचलकरंजी. मो. ९०२१३२१३३३.

**१ बीएचके** सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. (सेप्रेट वरचा मजला) पाणी २४ तास. धुमाळ डॉक्टर समोरील बाजूस, केटकाळे नगर. संपर्क-९८६०१९८३८४

**खाऊ गल्ली येथील** गाळा भाड्याने देणे. मोक्याच्या ठिकाणी, बिग बझार, झुडिओ शोरूम परिसरात. संपर्क-९२७३२२३७३८

**भाड्याने देणे.** आरसीसी सिंगल रूम सर्व सोयीनियुक्त छोट्या कुटुंबासाठी पहिला मजला, गुरूकृपा रेडिमेडस, नदी रोड, इचलकरंजी. भोसले- ९५१८५४३६९५

**शिरदवाड येथे** मेन रोडला १००० स्क्वे. फूट गाळा भाड्याने देणे तसेच ३ बीएचके सर्व सोयीनियुक्त घर शाकाहारी कुटुंबासाठी भाड्याने देणे. संपर्क-९८९०६७५३८८, ९९७०६४७९२४

**अक्षय तृतीयानिमित्त-** गॅलेक्सी हाईटस् चांदणी चौकजवळ, इचलकरंजी येथे सुसज्ज प्रशस्त वास्तुशास्त्रानुसार १,२,३ बीएचके फ्लॅटस बुकिंग सुरू. संपर्क- ९०२८७३१६१२

**ऑफिस किंवा फॅमिलीसाठी** भाड्याने देणे. पहिला मजला २ बीएचके पूर्ण फिनिशिंग व २ दुकानगाळे भाड्याने देणे आहेत. नवीन बांधकाम बाल्कनीसह. पत्ता- सांगली रोड, आर.के. प्लायवुड, ऋतुराज कॉलनी, वडगाव बाजार समितीसमोर, इचलकरंजी. संपर्क- शिराजुद्दीन-९१००१६३४३६, राजू-८८८८४२०३९१

**२७ बाय ३०** मोकळी शेड सर्व सोयीनीयुक्त भाड्याने देणेचे आहे. पत्ता- गुरू कन्ननगर, संपर्क- ९८२३३२३२०३, ९०२१०९०२०७.

**शेड भाड्याने देणे आहे.** १७०० फुट, १००० फुट, ५०० फुट एकत्र/वेगवेगळी मध्यवस्तीत, साखरपे हॉस्पिटलसमोर, इचलकरंजी. संपर्क- ७९७२९३४८२१.

**१ बीएचके भाड्याने देणे आहे.** सर्व सोयीनियुक्त पत्ता- आरटीओ ऑफिससमोर, भोईनगर, शहापूर, इचलकरंजी. संपर्क- ८०५५१५५२११

### * व्यवसायविषयक *

**हर्बल बाथ सोप** विक्रीसाठी ग्रामीण भागात विक्रेते नेमणे आहेत. संपर्क-९५९५२८७२२८

### * कर्ज विषयक *

**असेसमेंट उतारा व** घरफाळा पावतीवर तारण कर्ज किंवा होमलोन करून मिळेल. पत्ता- रजिस्टर ऑफिससमोर, गाळा नं. ८, संपर्क- ९१४५७५३८१०

**जागा घेऊन,** घर बांधणेसाठी तसेच रिकाम्या जागेवर कर्ज मिळेल. पत्ता- रजिस्टर ऑफिससमोर, गाळा नं. ८. संपर्क- ९१४५७५३८१०

### * विवाह विषयक *

**गुरूपुष्यामृतच्या शुभ मुहूर्तावर** मिळवा आपल्या स्वप्नातील जोडीदार. श्री महालक्ष्मी वधू वर ऑनलाईन ॲपलाईन सेवा मो.९९७०२७३११२.

### * हॉटेल विषयक *

**परमीट, बारसाठी** मॅनेजर व वेटर पाहिजेत. संपर्क- ९८५०३१०५०५, ७५८८६२०५०५, इचलकरंजी.

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

# सीईटी परीक्षार्थीसाठी मोफत बसची सुविधा:डॉ पाटील

**निपाणी,ता.२१(वार्ताहर)-**

**२३ आणि २४ एप्रिल रोजी चिक्कोडी येथे होणाऱ्या सीईटी परीक्षेला बसणाऱ्या निप्पाणी शहर आणि ग्रामीण भागातील व संकेश्वर आणि हुक्केरी येथील विद्यार्थ्यांसाठी व्हीएसएम सोमशेखर आर. कोठीवाले अभियांत्रिकी महाविद्यालय (व्हीएसएमएसआरकेआयटी ) कडून मोफत बस सेवा सुविधा पुरविल्या जातील. दोन्ही दिवशी सकाळी निपाणीहुन ८.२० व., हुक्केरीहून ७.४५ व. व संकेश्वरहुन ८.१५ वाजता बसेस सुटतील असे डॉ. उमेश पाटील यांनी सांगितले.**

''विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी बस सेवा मोफत दिल्या जातील.परीक्षा संपल्यानंतर, पुन्हा दुपारी संध्याकाळी ४.३० वाजता चिक्कोडीहून निपाणी, हुक्केरी व संकेश्वर बस स्टँड पर्यंत बस सोडले जाईल. या संधीचा विद्यार्थांनी लाभ घ्यावा'' असे प्राचार्यानी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.अधिक माहितीसाठी सीईओ डॉ. सिद्धगौडा पाटील किंवा प्रो. प्रवीण परमकर(९५९०३५७१७२) किंवा प्रो.अनुप गंजी (८९७१०१६८०१), प्रो.कैलास पठाडे (७९७५२६८४०२) (९६२०१३११४६) यांच्याशी संपर्क साधावा.



छ.शिवाजी महाराजांना अभिवादन करताना राजेंद्र पवार-वड्डुर यांच्यासह इतर मान्यवर.

# शिवरायांची विचारसरणी हीच आमच्या कार्याची प्रेरणा : वड्डुर

**निपाणी,ता.२१(प्रतिनिधी)-**

**छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेतून स्वाभिमान ,शौर्य आणि जनकल्याणकारी अमूल्य शिकवण दिली.त्यांची विचारसरणी हीच आमच्या कार्याची प्रेरणा आहे.त्यांच्या आदर्शांवर चालत विकासासाठी आम्ही सदैव कटिबद्ध असून हीच आमच्या कार्याची प्रेरणा आहे असे मत जि. पं. सदस्य व कर्नाटक राज्य ओसीसीआय डायरेक्टर राजेंद्र पवार-वड्डुर यांनी व्यक्त केले.**

निपाणी मतदारसंघातील गळतगा या गावांमध्ये आराध्य दैवत छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी नेताजी घोटणे,बाबासाहेब जाधव,कृष्णा घोटणे,कृष्णा कागले,राजू कागले,दगडू वड्डुर उपस्थित होते.

# डॉ. दिगंबर टोणपे निलंबित

**पन्हाळा,ता.२१(प्रतिनिधी)-**

**मद्यप्राशन करून रुग्णसेवेत अक्षम्य दुर्लक्ष आणि गैरवर्तणूक केल्याप्रकरणी पन्हाळा ग्रामीण रुग्णालयातीलवैद्यकीय अधिकारी डॉ. दिगंबर शिवाजी टोणपे यांना राज्य शासनाने निलंबित केले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने २० एप्रिल रोजी या कारवाईचा आदेश निर्गमित केला आहे.**

काही दिवसांपूर्वी डॉ. टोणपे हे कर्तव्यावर असताना मद्यधुंद अवस्थेत असल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. त्यावेळी रुग्णालयात आलेल्या एका रुग्णाला वेळेवर उपचार न मिळाल्याने प्रकृती खालावली होती आणि त्याला तातडीने कोल्हापूरला हलवावे लागले होते. या गंभीर घटनेची दखल घेत जिल्हा शल्यचिकित्सकांनी नेमलेल्या त्रिस्तरीय समितीने सखोल चौकशी केली होती.

या चौकशीत डॉ. टोणपे यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे उल्लंघन केल्याचे आणि रुग्णसेवेसारख्या अत्यावश्यक कामात कसूर केल्याचे स्पष्ट झाले.निलंबन काळात त्यांना नियमानुसार निर्वाह भत्ता दिला जाणार असला, तरी त्यांच्याविरुद्ध आता स्वतंत्रपणे विभागीय चौकशीही सुरू करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाचे कार्यासन अधिकारी अनिल कुमेरिये यांच्या स्वाक्षरीने हा आदेश काढण्यात आला आहे.

**निलंबन कालावधीत डॉ. टोणपे यांचे मुख्यालय पन्हाळ्यावरून बदलून सोलापूर जिल्हा रुग्णालय येथे करण्यात आले आहे. सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्यांना हे मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच, या काळात त्यांना कोणतीही खाजगी नोकरी, व्यापार किंवा व्यवसाय करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. जर या नियमांचे उल्लंघन झाले, तर ते अधिक कठोर कारवाईस पात्र ठरतील, असेही आदेशात म्हटले आहे.**

# कस्टम अधिकारी असल्याचे भासवून साडेतीन लाखांच्या दागिन्यांची लूट

**कुरुंदवाड,ता.२१(प्रतिनिधी)-**

**कस्टम अधिकारी असल्याची बतावणी करून एका ज्येष्ठ नागरिकाला विश्वासात घेत अज्ञात इसमाने सुमारे ३ लाख ३३ हजार रुपयांच्या सोन्याच्या दागिन्यांची लूट केल्याची घटना कुरुंदवाड येथे घडली.**

तात्यासो यलाप्पा कोळी (वय ७०, रा.विद्यानगर, माळभाग अकिवाट, ता. शिरोळ) असे फिर्यादीचे नाव आहे. माहितीनुसार, २१ एप्रिल रोजी दुपारी सुमारे १.१० वाजण्याच्या सुमारास कोळी हे कुरुंदवाडहून अकिवाटकडे बस्तवाड रोडने घरी जात होते. यावेळी इचलकरंजी पाणीपुरवठा पुलाजवळ एका अनोळखी इसमाने त्यांना अडवले. सदर इसमाने स्वतःला 'कस्टम अधिकारी' असल्याचे भासवून कोळी यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने पाठीमागून येणाऱ्या दुसऱ्या इसमाकडील सोन्याची अंगठी रुमालात गुंडाळून दाखवली व ती परत दिल्याचा बनाव करून कोळी यांना भुलवले. यानंतर कोळी यांच्या गळ्यातील सुमारे १८ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन (अंदाजे किंमत २ लाख ४३ हजार रुपये) व ७ ग्रॅम वजनाची अंगठी (अंदाजे किंमत ९० हजार रुपये) असा एकूण सुमारे ३ लाख ३३ हजार रुपयांचा ऐवज घेऊन आरोपी मोटारसायकलवरून पसार झाला.या प्रकरणी कुरुंदवाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# विनोद खोत यांचे निधन



**पेठवडगाव,ता.२१(वार्ताहर)**
मंगरायाचीवाडी येथील विनोद विठ्ठल खोत (वय ४७) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी,दोन मुले,भाऊ, बहीण असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# कै.रामभाऊ राशिनकर स्मृती व्याख्यानमाला शुक्रवारपासून

**इचलकरंजी,ता.२१–**

**येथील चाणक्य प्रतिष्ठान आणि श्री आर्य चाणक्य नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कै. रामभाऊ राशिनकर स्मृती व्याख्यानमाला दि. २४ ते २७ एप्रिल या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. विविध विषयांवर तज्ञ वक्ते मार्गदर्शन करणार आहेत.**

व्याख्यानमालेची सुरुवात शुक्रवार, २४ एप्रिल रोजी होणार असून पुणे येथील डॉ. भूषण केळकर हे 'एआय संधी आणि आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. शनिवार, २५ रोजी कराड येथील विजयराव जोशी 'रा. स्व. संघाची १०० वर्षांची वाटचाल' या विषयावर भाष्य करणार आहेत. रविवार, २६ रोजी नाशिकचे डॉ. विनायक गोविलकर 'डॉलरची दादागिरी का आणि किती काळ?' या विषयावर आर्थिक घडामोडींचा ऊहापोह करणार आहेत.

सोमवार, दि. २७ एप्रिल रोजी जळगाव येथील यजुर्वेंद्र महाजन 'चांगला माणूस घडताना' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दररोज सायंकाळी ६.३० वाजता येथील लायन्स क्लब हॉल, दाते मळा येथे ही व्याख्यानमाला होणार आहे. नागरिकांनी या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अशोकनगर जागेच्या मोजणीस निपाणी नगरपालिकेचा आक्षेप



निपाणी: भूमापन अधिकाऱ्यांना पत्र देताना पालिका अधिकारी.

**निपाणी,ता.२१(प्रतिनिधी)–**

**नगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रात येणारी अशोक नगरमधील ५१,८०० चौरस फूट जमीन ही नगरपालिकेची जमीन असून, सदर जमीन ही वरिष्ठ जे.एम.एफ.सी. दिवाणी न्यायालय,निपाणी यांच्या मालकीची आहे.**

त्यांच्याकडे ओएस क्र. १११/२०१७ या प्रकरणात आणि माननीय उच्च न्यायालय, बंगळूर येथे डब्ल्यूपी क्र.२३२३३/२०२५ (जनहित याचिका) मार्फत दाखल केलेल्या प्रकरणांमध्ये ही जमीन नमूद आहे. शिवाय, सदर जमीन निपाणी नगरच्या मास्टर प्लॅनमध्ये हिरव्या रंगाने पडीक जमीन म्हणून चिन्हांकित केली आहे. त्यामुळे, सदर जमिनीचे सर्वेक्षण करू नये असे पत्र निपाणी पालिकेने सहायक भूमी अभिलेख संचालक कार्यालय, चिक्कोडी यांना दिले.यावेळी पालिका अधिकारी विवेक जोशी,सुनिल कांबळे यांनी हे पत्र सर्वे अधिकाऱ्यांना सुपूर्द केले. त्यानंतर सदर जागेची मोजणी थांबविली.

# भंडाऱ्याच्या उधळणीत बुर्लीचा 'परडी सोहळा' भक्तीमय वातावरणात संपन्न

**भिलवडी,ता.२१ (वार्ताहर)–**

**महाराष्ट्रासह कर्नाटकच्या भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या पलूस तालुक्यातील बुर्ली येथील श्री बंच्याप्पा बनात, धनगरी ढोलांच्या कडकडाटात आणि 'बंच्याप्पा–मायाप्पा–बिरोबा'च्या जयघोषात परडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. दर तीन वर्षांनी होणारा हा परडी सोहळा अक्षय तृतीयेच्या दुसऱ्या दिवशी संपन्न होतो.या सोहळ्यासाठी महाराष्ट्र आणि कर्नाटकातील धनगर बांधवांचा मोठ्या प्रमाणात सहभाग पाहायला मिळाला.**



उत्सवाच्या दरम्यान पुरुष भाविकांकडून पुरण पोळ्यांचा नैवेद्य तयार केला जातो.पहाटे दोन वाजता देवाचे लग्न लावले जाते, ज्यानंतर परडी बांधण्याच्या मुख्य प्रक्रियेला सुरुवात होते. या सोहळ्यासाठी यमगरवाडीतून आलेली बंच्याप्पाची पालखी, किर्लोस्करवाडीची मायाप्पा पालखी आणि स्थानिक बुर्लीची बंच्याप्पा पालखी अशा तीन प्रमुख पालख्या सजवण्यात आल्या होत्या.

पहाटेच्या सुमारास फटाक्यांची आतषबाजी आणि ढोल–कैताळाच्या निनादात या पालख्या आणि परड्या कृष्णा नदीकडे प्रस्थान करतात. विशेष म्हणजे, पहाटे सूर्योदयापूर्वी तांबडे फुटताना ही परडी कृष्णा नदीच्या पात्रात सोडली जाते. हा विलोभनीय सोहळा पाहण्यासाठी बुर्ली, आमणापूर, कुंडल, रामानंदनगर, येळावी यासह विविध गावांतील भाविकांनी नदीकाठी मोठी गर्दी केली होती.

नदीकाठी पोहोचल्यानंतर कृष्णामाईला परडी अर्पण करण्याचा सोहळा संपन्न झाला. बुर्ली येथील समस्त धनगर बांधवांनी गेल्या तीन दिवसांपासून या भव्य कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले होते, ज्यामुळे हा सोहळा शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

# यमगर्णीत आजपासून ग्रामदैवत शमनापीर यात्रा

**यमगर्णी,ता.२१(वार्ताहर)–**

**येथे बुधवारी (ता. २२) ते शुक्रवारी (ता. २४) अखेर शमनापीर उरुस व ग्रामदैवत यात्रा होणार आहे.**

बुधवारी (ता. २२) रात्री गंध चढविणे, गुरुवारी (ता.२३) शमनापीर उरुस, रात्री कव्वालीचा जुगलबंदी कार्यक्रम होणार आहे. पहाटे यात्रा कमिटीकडून गलिफ चढविला जाणार आहे.

शुक्रवारी (ता. २४) सकाळी विविध शर्यतींचे आयोजन केले आहे. जनरल बैलगाडी शर्यतीसाठी अनुक्रमे ११००१, ७००१, ५०००, जनरल घोडागाडी शर्यतीसाठी १०,०००, ७०००, ५०००, जनरल घोडाबैल गाडी शर्यतीसाठी १०,०००, ७०००, ५०००, एक ओपन नवतर व जनरल घोडागाडी शर्यतीसाठी ५०००, ३०००, २०००, जनरल व नवीन घोडागाडी शर्यतीसाठी ३०००, २०००, १०००, बिनदाती घोडा बैलगाडी शर्यतीसाठी ३००१, २००१, १००१, बसून घोडा शर्यतीसाठी ३०००, २०००, १०००, एक्का घोडा शर्यत (टांगा) ३००१, २००१, १००१ रुपयांची बक्षीसे आहेत. सायंकाळी भव्य पालखी मिरवणूक सोहळा व आतषबाजी होणार आहे. रात्री मनोरंजनाचा कार्यक्रम होणार आहे.

✻ **लातूर,ता.२१**–लातूर जिल्ह्यातील निसर्गाचा कोप आणि वाढत्या तापमानाचा फटका आता सर्वसामान्य,बळीराजाच्या जीवावर बेतू लागला आहे.

निलंगा तालुक्यात आणि परिसरातील गावांमध्ये उन्हाच्या तीव्र झळांनी कहर माजवला असून, वाढत्या उष्माघाताने शेतकऱ्याचा बळी घेतला आहे.

## जाहीर इशारा नोटीस

तमाम लोकांना कळविणे करीता जाहीर इशारा प्रसिध्द करणेत येतो की, मिळकतीचे वर्णन :– क।। इचलकरंजी म.न.पा. हद्दीतील रि.स.नं.५१४/१२ पैकी गुंठेवारी बिगरशेती झालेली घर व खुली जागा मिळकत त्याचे क्षेत्र ५९१.२५ चौ. फुट यासी चतुः सिमा पुर्वेस २० फुटी रस्ता, पश्चिमेस – सलीम अत्तार – यांची मिळकत, दक्षिणेस – बालेचाँद शेख यांची मिळकत व उत्तरेस – २० फुटी रस्ता येणेप्रमाणे चतुः सिमेतील घर मिळकत ही आमचे अशिल सौ. सुरैय्या तय्यब शेख, रा. बाळनगर, कुडचे मळा, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचे मालकी वहिवाटीची असून सदर मिळकत आमचे अशिलांचे कब्जे वहिवाटीत आहे. तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा मिळकत खरेदी–विक्रीचा अगर तबदिलीचा व्यवहार करु नये, तसा व्यवहार केलेस तो आमचे अशिलांचे वर बंधनकारक राहणार नाही. म्हणून दिला जाहीर इशारा.

ता.२१/०४/२०२६.

**ॲड.एम.यु. जमखंडी**

**ज्ञानदीप भवन, जवाहरनगर, इचलकरंजी.**
**मो. ९८५००६७९८६**

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नं. ७७४ पैकी क्षेत्र हे ०.३६–५० आर शेती मिळकत यासी चतुःसिमा पुर्वेस–ओढा, पश्चिमेस फकिर यांची मिळकत, दक्षिणेस–पंचगंगा कारखाना यांची मिळकत, उत्तरेस–चौगुले यांची मिळकत.येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही मुस्ताक शरिफ बेपारी रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची असून त्यांनी आमचे अशिलांशी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगून संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणुन दिली नोटीस सही.

ता.२१/०४/२०२६

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने,**

**पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,**
**मो. ७८२०९०९७०५**

## जाहीर नोटीस

ता.हातकणंगले पैकी मौजे कबनूर येथील गट नंबर ८११ पैकी भुखंड क्रमांक ९ व १० चे एकत्रीत क्षेत्र १८३८–६६ चौरस फुट यासि एकत्रीत चतुः सिमा पुर्वेस–भुखंड क्रमांक ११, पश्चिमेस भुखंड क्रमांक ८. दक्षिणेस–ओघळ व केटकाळे यांची मिळकत, उत्तरेस–२० फुट रुंदीचा रस्ता. सदरची मिळकत १)साहीरा नजरुद्दीन मुजावर २)समीर नजरूद्दीन मुजावर ३) जमीर नजरूद्दीन मुजावर व ४) अंजूम आयाज मुल्ला रा. इचलकरंजी यांचे स्वतंत्र मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकतीचा खरेदीपूर्व करारपत्र विनायक विलासराव इंगवले वगैरे यांना करून दिलेला आहे व त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना तोंडी करार करून दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी.म्हणून दिली नोटीस सही.

ता.२१/०४/२०२६.

**ॲड. शिवकुमार सुखदेव लकडे**

**रा.३/१५३, देवमोरे वाडा, राणा प्रताप चौक, टाकवडे वेस, इचलकरंजी**
**मो.९८८१०१४७२५,**

## जाहीर नोटीस

मौजे यड्राव येथील गट नं. ३८५ / १ पैकी प्लॉट नं. ३० चे क्षेत्र १२३.८१ चौ. मीटर ची मिळकत, यासी चतुःसिमा– पुर्वेस – २० फुट रस्ता पश्चिमेस – बाळासो कोळी यांची मिळकत, दक्षिणेस – प्लॉट नं. २९, उत्तरेस – प्लॉट नं. ३१, सदरची मिळकत ही राजश्री अरविंद कुरडे, अरविंद भूपाल कुरडे वगैरे यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र विपुल विजय चौगुले २) महेश प्रकाश भिसे रा. इचलकरंजी यांना करून दिलेले असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता.१८/०४/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

मौजे कबनूर येथील क. ग.नं. २३ याचे एकुण क्षेत्र हे १.२९.४० आर आकार रु. ४.३७ पैसे यापैकी गुंठेवारी नियमाधिन झालेला भुखंड क्रं. १५ ब याचे क्षेत्र ७२.८१ चौ.मी. याचे ७८३.४३ चौ. फुटाची जागा व त्यावरील घर मिळकत सर्व. यांसी चतुः सिमा – पूर्वेस – क.ग. नं.४६ ची मिळकत, पश्चिमेस – ५.४८ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस– भुखंड क्रं. १५ए ची मिळकत, उत्तरेस– भुखंड क्रं. १६ ची मिळकत. येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही श्री. विनायक कृष्णा हुंदळेकर यांचे स्वकष्टार्जित मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची मिळकत असून सदर मिळकतीबाबत श्री. विनायक हुंदळेकर यांनी आमचे अशिलांकडून भरीव संचकार रक्कम स्विकारुन आमचे अशिलांचे लाभात खरेदीपुर्व करारपत्र करुन दिलेले आहे. सदर मिळकतीवर कोणाचा हक्क, करार, दावा, आरक्षण, शासकीय देणे, पोटगी, इजमेंट इ. वैगेरे असलेस सदर नोटीस प्रसिद्धीपासुन ०७ (सात) दिवसाचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी.

तारीख.२१/०४/२०२६

**ॲड.राहुल मानसिंग महाजन**

**राधाकृष्ण टॉकीज चौक, कापड मार्केट हौसिंग सोसा. रोड, इचलकरंजी**
**माबो.नं. ९८८१८१७९८८**

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ६०८ व ६०९ पैकी प्लॉट नं. ०३ चे क्षेत्र–१५१–०२ चौ. मी. खुली मिळकत यासी चतुः सिमा पुर्वेस–२० फुट रस्ता, पश्चिमेस शिंदे यांची मिळकत, दक्षिणेस पटेल यांची मिळकत, उत्तरेस–प्लॉट नं.०२ बी ची मिळकत येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत ही सुभद्रा शशिकांत गोंदकर तर्फे व. मु– रहिम आप्पालाल मुजावर रा. शहापुर यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचरारपत्र केले आहे तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणून दिली नोटीस सही. ता.२१/०४/२०२६.

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने,**

**पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,**
**मो. ७८२०९०९७०५**

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नं. ७७४ पैकी क्षेत्र हे. ०.१८.२४ आर शेती मिळकत यासी चतुःसिमा पुर्वेस–ओढा, पश्चिमेस फकिर यांची मिळकत, दक्षिणेस–वेपारी यांची मिळकत, उत्तरेस सरकारी रस्ता येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत ही कुमार महादेव चौगुले व शिवगोंडा महादेव चौगुले रा. तारदाळ यांचे कब्जे मालकी ची असुन त्यांनी आमचे अशिलांशी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणुन दिली नोटीस सही.

ता.२१/०४/२०२६

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने,**

**पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,**
**मो. ७८२०९०९७०५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळणेकरिता,

इचलकरंजी महानगपालिका हद्दीतील शहापूर येथील गट नं. ५६७, यामधील गुंठेवारी भूखंड क्र.सि.स.नं.२०१०७, क्षेत्र ९२.२० चौ.मि. ची खुली प्लॉट मिळकत, ७/१२ प्रमाणे क्षेत्र हे ०.००.९० आर व यामधील कौलारू घर मिळकत, यासी चतु:सीमा : पूर्वेस श्री. बळवंत शेडशाळे यांची मिळकत, पश्चिमेस २० फूट रूंदीचा रस्ता, दक्षिणेस रत्नाप्पा कांदेकर यांची मिळकत व उत्तरेस पांडुरंग ज्वारे यांची मिळकत.

येणेप्रमाणे चतु:सीमेतील मिळकत ही श्री. प्रमोद रामचंद्र मगदूम, रा. इचलकरंजी यांच्या मालकीची आहे. त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून भरीव संचकार रक्कम स्विकारली आहे. वर नमूद मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेची हमी वरील मिळकत मालकांनी आमचे अशिलांना दिली आहे. तथापि, सदर मिळकतीबाबत कोणाचाही खरेदी विक्री, करार, दावा, कब्जा, कूळ, तारणगहाण, बक्षीस, वाटणी, वारसा, वहिवाट, पोटगी, आरक्षण, संपादन, अन्य कोणाचा कर्ज, देणी अगर अन्य कोणत्याही स्वरूपाचे हक्कसंबंध असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काच्या कागदपत्राच्या अस्सल प्रतिसह लेखी हरकत आमचे खालील पत्त्यावर द्यावी. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही

तारीख २१/०४/२०२६ इ. रोजी.

**ॲड.सुनिल जे.विभुते**

**१३/११२७/२, महर्षि वाल्मिकी सोसायटी, इचलकरंजी.**
**मो. नं. ९८८१७०३८३८**

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन : जि. कोल्हापूर ता. हातकणंगले पैकी मौजे चंदूर ग्राम पंचायत हद्दीतील:– क.ग.नं.४८० पैकी संगणकीय ७/१२ प्रमाणे क्षेत्र हे.आर.पॉ.०.०९.४६ आ.रूपये ०.१२ ची खुली पडसर जागा सर्व. याचे क्षेत्र १०१७४.५ चौ. फुट याचेच ९४५.५८ चौ. मिटरची खुली जागा सर्व. यासी चतुःसिमा पूर्वेस–३६ फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस–कदम यांची मिळकत,पश्चिमेस–बाळासाो जाधव यांची मिळकत उत्तरेस–२० फुट रुंदीचा रस्ता येणे प्रमाणे चतुःसिमेतील खुली जागा आतील तदंगभुत वस्तुसह व इजमेंटरी हक्कासह सर्व. सदर मिळकत १) अश्विनी राकेश सव्वाशे व २) मंजिरी पूर्णानंद सव्वाशे दोघींही रा. श्रीरामनगर इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची असून त्यांनी आमचे आशिलांकडून भरघोस संचकार रक्कम स्विकारून खरेदीपूर्व करारपत्र लिहून दिले आहे. सदर मिळकत निर्वेध निर्जोखमी असलेचा निर्वाळा मिळकतीचे मालकानी दिलेला आहे. तथापि सदर मिळकती संदर्भात कोणाचा कसलाही हक्क, दावा, पोटगी, लिज, बक्षिसपत्र, तारण आरक्षण, वहीवाटी बाबत हरकत असलेस सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून दहा (१०) दिवसात खालील पत्त्यावर कागदपत्राच्या अस्सल प्रतिसह लेखी तक्रार नोंदवावी.मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे आशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूरा करतील याची समज असावी. म्हणून दिली जाहीर नोटीस दिनांक २१/०४/२०२६.

**ॲड.बाबासो एम.पाटील**

**नोटरी (भारत सरकार)**
**१७/७७, स्वामी विवेकानंद कॉलनी, इचलकरंजी.**
**मो. ९२२६८८७००१**

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन : जि.व तुकडी कोल्हापूर पोट तुकडी इचलकरंजी कसबा इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील कबनूर येथील गट नं. ७४ /७१ याचा सि.स.नं. २३३५३ क्षेत्र ७५०.०० चौ. फुट याचे ६९.७० चौ.मी.ची मिळकत तसेच यावरील अंदाजे ६६ वर्षापूर्वीचे इ निकृष्ठ प्रतिचे बांधकामातील क्षेत्र ३९.३८ चौ.मी. व बाकीची खुली जागा मिळकत याचा इ.म.न.पा.मि नं. २१/१५८१ ( नविन २१३००२४१९) ने नोंद असलेली घर व खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा – पुर्वेस.. श्री सुनिल पवार यांची मिळकत, पश्चिमेस सामाईक वहिवाटीचा ३ फुटाचा रस्ता, दक्षिणेस–अंतु गोविंद पाटील यांची मिळकत, उत्तरेस–संजीवनी अजय घोरपडे यांची मिळकत, येणेप्रमाणे चतुः सिमेतील घर व जागा मिळकतीमध्ये असले पाणी कनेक्शनसह ही मिळकत श्री. बसगोंडा थळू कांबळे, रा.अ.लाट यांचेकडून आमच्या अशिलांनी खरेदी घेणेचे पक्के करून संचकार दाखल रक्कम दिली आहे. सबब, सदर मिळकत ही पुर्णतः निर्वेध, निष्कर्जी आहे. तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, हितसंबंध, तारणगहाण, दान, बोजा, लिज, चालू दावा, आरक्षित, हिस्सा, कुळ,अ‍ॅटेचमेंट,इजमेंट,सावकारी पोटगी तसेच मृत्युपत्र चालविणार वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाले तारखेपासून ७ दिवसाचे आत खालील पत्यावर सर्व अस्सल कागदपत्रासह लेखी कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीपत्राचा व्यवहार पूर्ण करतील. म्हणून दिली जाहीर नोटीस सही

ता.२०/०४/२०२६.

**श्री.अमित पारीसा वाटेगांवे**

**४/२३७, मोठे तळे बुरूड गल्ली, इचलकरंजी मो.नं.९९७५४३७१४९**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की मौजे कोरोची येथील गट नं. ६१६ यापैकी बिगरशेती प्लॉट नं.५ याचे क्षेत्र ३६०० चौ.फु याची मापे ४५ फुट ८० फुट यांसी चतुः सिमा पु बाजूस–रस्ता प. बाजूस गट नं. ६१५ ची मिळकत द.बाजूस–प्लॉट नं.७ उ.बाजूस– प्लॉट नं.४ येणेप्रमाणे चतु:सिमेतील जागा ही जरीना इकबाल मुल्ला, रिझवान अहमद इकबाल मुल्ला व अनुजा अभय जाधव सर्व रा. इचलकरंजी यांचे मालकीची आहे. मिळकत मालक यांनी आमचे अशिलांना दि.१८/०२/२०२६ इ.रोजी मिळकत खरेदी देणेचा खरेदीपुर्व करार करुन दिलेला आहे व करार तारखे दिवशी मिळकत मालक यांनी भरीव रक्कम आमचे आशिलाकडून स्विकारली आहे. मिळकत निर्वेध निर्जोखीम असल्याचा निर्वाळा मिळकत मालक यांनी आमचे आशिलांना दिलेला आहे. ठरले प्रमाणे लवकरच खरेदीचा व्यवहार पुरा केला जाणार आहे.

सबब सदर जाहीर नोटीसीने कळवणेत येते की, वरील मिळकतीवर कोणाचा काहीही कायदेशीर हक्क संबंध, दावा, अतिक्रमण, पोटगी, बक्षीसपत्र, करारपत्र इ. काही असलेस सदर जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासून ७ दिवसात खाली सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे लेखी कागदपत्रांसह कळवावे. मुदतीत कोणाचीही काही तक्रार न आलेस वरील मिळकतीवर ज्याचा कोणाचा हक्क होता तो त्यांनी सोडून दिला आहे असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूरा करतील त्यानंतर कोणाची तक्रार आलेस त्याचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिलली जाहीर नोटीस

आज दि.२१/०४/२०२६

**ॲड.दत्ताजीराव के.कंदले**

**१८/५७७/१, ''कौस्तुभ '' शाहूनगर, गल्ली नं. १, इचलकरंजी फोन नं. ९८९०५८२९९६**

## जाहीर नोटीस

**सर्व लोकांना कळविणेत येत की,**

१) मिळकतीचे वर्णन –जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले पैकी कोरोची येथील गट नं. ८५८/२ यापैकी भुखंड क्र. २/२ चे पश्चिमेकडील बाजूचे क्षेत्र ११९.२० चौ.मी. (म्हणजेच १२९७ चौ. फुट) ची मिळकत यांसी चतु:सिमा– पुर्वेस – सुरेश राजाराम कुडाळकर यांची मिळकत,पश्चिमेस–साळी समाज, दक्षिणेस–शितल भाऊसो पाटील यांची मिळकत व उत्तरेस–रस्ता. येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत त्यातील तदंगभूत वस्तूसह आणि इझमेंटरी इक्कांसह सर्व.

२) वरील कलमी वर्णन केलेली मिळकत जहिदा अल्लाउद्दिन मुतवल्ली यांचे मालकी वहिवाटीची आहे. त्यांनी सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांसोबत खरेदी देणेचा तोंडी करार केला आहे. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा मिळकतीचे मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे. सदर मिळकतीत अन्य कोणाचेही हक्क वा हितसंबंध नसून सदर मिळकत विक्री करणेचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याचे तसेच सदर मिळकतीबाबत कोणताही वाद, दावा सुरू नसल्याचे त्यांनी आमचे अशिलांना सांगितले आहे. तथापि सदर मिळकतीवर कोणाचा करार, वारसा, तारण, पोटगी, बोजा, कुळ, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, दावा, वाटणी, इझमेंट अगर अन्य कोणताही हक्क अगर हितसंबंध असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खाली नमूद वकिलांचे पत्त्यावर कागदपत्रांसहीत संपर्क साधून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस आज मुक्काम इचलकरंजी

ता.२१/०४/२०२६.

**ॲड.राहुल विलास जाधव**

**रा.२०/९९५/१, स्वामी माळ, साईनाथ नगर, गल्ली नं. १, इचलकरंजी. मो.नं. ९१५६७७८४४५.**

## जाहीर नोटीस

**तमाम लोकांचे माहिती करिता कळविणेत येते की,**

१) मिळकतीचे वर्णन– साजणी ता. हातकणंगले, जि. कोल्हापुर या ग्रामपंचायत हद्दीतील गटक्रमांक व उपविभाग २३६/८, क्षेत्र हे. १.४६.०० आर, आकार रु. १२८ पै. ची भोगवटदार वर्ग–२ या भुधारणा पद्धतीची शेतजमिन मिळकत, यांसी चतु:सिमा पूर्वेस – प्रविण पांडुरंग पाटील यांची मिळकत, पश्चिमेस–३५ फुटी रस्ता, दक्षिणेस – अब्बास मुलाजी आवळे यांची मिळकत, उत्तरेस – शहाजी विलास आवळे.२) वर नमुद मिळकत ही आमचे अशिल जयकुमार भुपाल कमलाकर, व. व.५५, धंदा–शेती, रा.रुई, ता.हातकणंगले, जि. कोल्हापुर यांना तसेच सौ. वत्सला भुपाल कमलाकर,सौ.संगीता भाऊसो आडसुळे, सौ. सुरेखा विजयकुमार कमलाकर व श्री. चेतनकुमार विजयकुमार कमलाकर यांना आमचे अशीलांचे मयत वडील भुपाल कृष्णा कमलाकर यांचे मृत्युपश्चात कायदेशीर व सरळ वारस म्हणुन मिळाली असून, मिळकतीचे सातबारा पत्रकी नमुद सर्व वारसांची नोंद आहे. सदरची मिळकत ही आमचे अशिलांचे कब्जात असुन आमचे अशिल ती वषार्नुवर्षे कसत आहेत. अशी परिस्थिती असताना नमुद मिळकतीचे कोणत्याही प्रकारे सरस निरस मानाने कायदेशीर वाटप झालेले नसताना, सौ. वत्सला भुपाल कमलाकर, सौ.संगिता भाऊसो आडसुळे या सदरची मिळकत बेकायदेशीरपणे विक्री/हस्तांतरण/तबदील करणेच्या प्रयत्नात असलेबाबत आमचे अशिलांना खात्रीशीरपणे समजुन आले आहे.३) सबब सदर नोटीसीद्वारे तमाम लोकांचे माहिती करिता कळिवणेत येते की, वर कलम १ मध्ये नमुद मिळकती संदर्भात सौ.वत्सला भुपाल कमलाकर, सौ. संगिता भाऊसो आडसुळे यांचेसोबत नमुद मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा असलेला हक्क व अधिकार डावलून कोणीही, कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये, तसे केलेस तो आमचे अशिलांचेवर बंधनकारक राहणार नाही त्याचप्रमाणे सदर गैरप्रकाराकरिता आमचे अशिल करत असले कायदेशीर प्रक्रीयेमध्ये नमुद मिळकती संदर्भात व्यवहार करणार यांना देखील पक्षकार करणे भाग पडेल याची नोंद घ्यावी.

दिनांक २२/०४/२०२६. इचलकरंजी.

**ॲड.रियाज रफीक बाणदार**

**३/४५७, स्वामी समर्थ मंदिर समोर, महासत्ता चौक, इचलकरंजी, मोबा. ९८२३६३६३२२**

# विहिरी,नदी,तलावात पोहण्यासाठी गर्दी

## पालकांनी मुलांवर लक्ष ठेवण्याची गरज

बोरपाडळे,ता.२१(वार्ताहर)–

**सध्या शाळांना सुट्ट्या लागल्या आहेत. त्यातच उन्हाचा तडका वाढल्याने अंगाची लाही लाही होत असल्याने मुलांची विहिरी व नदीकाठी पोहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.**

दिवसभरामध्ये पाण्यामध्ये डूबण्यासाठी मुले आनंदाने शिवारामध्ये जाताना दिसत आहेत. गावोगावी नदी तीरावर मुलांची गर्दी दिसत आहे.परंतु यातून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून पालकांची जबाबदारी वाढली आहे. पहिली ते नववीच्या मुलांची सकाळी शाळा व दहावी बारावीच्या परीक्षा संपल्याने सुट्ट्या लागल्या आहेत.

शहरात राहणाऱ्या मुलांचा मोर्चा गावाकडे वळला आहे. सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी काही मुलांच्या पालकांनी पर्यटनाचा बेतही आखला आहे तर उर्वरित मुले रानावनात



भटकत असून रानमेव्यांचा आनंद लुटत आहे. उन्हाचा वाढता पारा लक्षात घेता मुलांची पावले नदी, तलाव, विहिरीकडे पालकांचा डोळा चुकवून वळली आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी गर्दी वाढत असून ज्या मुलांना पोहता येत नाही, त्यांच्या बाबतीत अशा ठिकाणी दुर्घटना घडण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यावर बारीक नजर ठेवणे गरजेचे आहे. दरवर्षी तलाव, विहिरी, नदीपात्रात बुडून मृत्यू पावलेल्या मुलांची आकडेवारी मोठी आहे.

### वेळीच सावध होण्याची गरज

''खेळाचा, पोहायचा मनमुराद आनंद लुटणाऱ्या मुलांकडे अनेकदा पालकांचे लक्ष नसते.त्यातून अनेकदा मुलांना दुखापतीचा सामना करावा लागतो. इथपर्यंत ठीक ; पण एखाद्या दुर्दैवी घटनेत निष्पाप जीव जेव्हा बळी जातो तेव्हा केलेल्या दुर्लक्षाचा पालकांना पश्चात्ताप होतो. मात्र, तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. त्यामुळे पालकांनी वेळीच सावध होण्याची गरज निर्माण झाली आहे. खबरदारीचे उपाय म्हणून पालकांसोबत राहावे.''

# आधुनिक यंत्रसामुग्रीमुळे भूमी अभिलेखची कामे गतीने होतील

## ना.प्रकाश आबिटकर

कोल्हापूर,ता.२१(प्रतिनिधी)–

**जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागाचे कामकाज अधिक अचूक, वेगवान आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने जिल्हा वार्षिक योजनेतून ३ कोटी ६९ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.**

या निधीतून खरेदी केलेल्या अत्याधुनिक यंत्रसामुग्रीचे वितरण आणि मोजणी कामाचा शुभारंभ राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी रोव्हर, लॅपटॉप आणि स्कॅनर यांसारख्या अत्याधुनिक साहित्याचे वाटप केले. भूमी अभिलेख विभागाला खऱ्या



**खरेदी केलेल्या अत्याधुनिक यंत्रसामुग्रीचे वितरण करताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर व इतर प्रमुख मान्यवर.**

अर्थाने 'हायटेक' बनवण्याच्या दिशेने हे एक ऐतिहासिक पाऊल असून, या नव्या यंत्रसामुग्रीमुळे नागरिकांना मोजणी, फेरफार आणि अभिलेखाच्या सेवांसाठी होणारा विलंब आता संपुष्टात येईल, असा विश्वास पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी आम.राजेंद्र पाटील यड्रावकर, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख शिवाजीराव भोसले, शक्ती कदम, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जयवंत उगले व सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी उपस्थित होते.

भूमी अभिलेख कार्यालयात मोजणीची कामे वेळेत पूर्ण होत नसल्याने नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे सातत्याने प्राप्त होत होत्या. त्यातच अद्ययावत यंत्रसामुग्रीची कमतरता असल्याने कर्मचाऱ्यांनाही काम करताना मर्यादा येत होत्या. या गंभीर बाबीची दखल घेत जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आला. या निधीतून १८ आधुनिक रोव्हर मशीन, २६ लॅपटॉप आणि १४ स्कॅनरची खरेदी करण्यात आली आहे.

जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख शिवाजीराव भोसले यांनी माहिती देताना सांगितले की, कोल्हापूर जिल्ह्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली ही अत्याधुनिक यंत्रसामुग्री संपूर्ण महाराष्ट्रात क्वचितच कुठे पाहायला मिळेल.आता नव्याने प्राप्त झालेल्या साधनांमुळे जिल्ह्यातील मोजणी,फेरफार आणि अभिलेखाच्या सर्व सेवा अधिक गतिमान,पारदर्शक आणि कमालीच्या अचूक पद्धतीने नागरिकांना उपलब्ध होतील, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

## थोडक्यात



शिवशाही सांस्कृतिक मंडळाच्यावतीने छ.शिवाजी महाराजांच्या प्रतिमापूजनप्रसंगी श्रीकांत पाटील, सचिन तळेकर, सुरेश काळे, ईदायत अत्तार व इतर प्रमुख मान्यवर.

### शिवशाही सांस्कृतिक क्रीडा मंडळाच्यावतीने शिवजयंती उत्साहात

इचलकरंजी,ता.२१–

**येथील मोठे तळे मेनरोड येथे शिवशाही सांस्कृतिक, कला, क्रीडा मंडळाच्यावतीने शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.**

प्रथम हिंदवी स्वराज्य संस्थापक राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पुजन सचिन तळेकर यांच्यावतीने करण्यात आले. मोठे तळे खोकी धारक संघटनेच्यावतीने पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर सामुदायिक श्रींची आरती व प्रार्थना म्हणण्यात आली. त्यानंतर संजय तेलनाडे ग्रुपच्यावतीने ८० लीटर थंडगार ताक वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीकांत पाटील हे होते. यावेळी सर्व शिवभक्तांच्यावतीने पुष्पवृष्टी करण्यात आली. सदर कार्यक्रमप्रसंगी ओमकार पाटील, विनायक कोळी, संजय खोंद्रे, सुनिल मुदगल, विजय कांबळे,अब्दुल पठाण, सौ.प्रतिभा पाटील, सौ.मंगल महाजन, ईदायत अत्तार, अमोल महाजन, सुरेश काळे, रामभाऊ शिंदे, गोपी राधवानी तसेच मोठे तेळे खोकीधारक संघटनेचे सदस्य व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पुलाची शिरोलीत छ.शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करताना आम.अमल महाडिक, सरपंच पद्मजा करपे आदी.

### पुलाची शिरोलीत शिवजयंती साजरी

हेरले,ता.२१(प्रतिनिधी)–

**छ.शिवाजी महाराज जयंती निमित्त आम.अमल महाडिक यांच्या हस्ते शिरोली ग्रामपंचायत कार्यालयासमोरील छ.शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच सौ. पद्मजा करपे, उपसरपंच विजय जाधव, राजेश पाटील, सतीश पाटील आदी प्रमुख उपस्थित होते.**

अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छ.शिवाजी महाराज जयंती हिंदूत्ववादी संघटना व समाजाच्यावतीने विविध कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.शिवजन्माचा पाळणा म्हणत लोकनियुक्त सरपंच पद्मजा करपे यांच्यासह माता-भगिनींनी जन्मकाळ साजरा केला. यावेळी बाजीराव पाटील, ग्रामपंचायत सदस्या सुजाता पाटील, मनिषा संकपाळ, योगेश खवरे, माजी उपसरपंच कृष्णात करपे,सागर कौंदाडे, दिपक यादव,सागर मोरे,संपत संकपाळ, महादेव सुतार,बाळासाहेब पाटील आदींसह विविध संस्थांचे पदाधिकारी,ग्रामस्थ व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुरुंदवाडातील गणेश सहकारी बँकेचे नामकरण

कुरुंदवाड,ता.२१(प्रतिनिधी)–

**येथील गणेश सहकारी बँकेचे सखाराम उर्फ दादा जोशी गणेश सहकारी बँक असे नामकरण करण्यात आल्याची माहिती बँकेचे चेअरमन अरुण जोशी यांनी आयोजित पत्रकार बैठकीत दिली.**

याबाबत माहिती देताना ते म्हणाले, ६० वर्षापूर्वी वकील दादा जोशी यांनी लहान, मोठे, शेतकरी, व्यापारी यांना मोठ्या बँका कर्ज देत नाहीत त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत नाही यासाठी दि गणेश सहकारी बँकेची स्थापना केली व खास करून शेतकऱ्यांसाठी अल्पदरात कर्जपुरवठा केला. याशिवाय त्यांचे गणेश बँक व अन्य सामाजिक कामात व शहराच्या जडणघडणीत मोठे योगदान होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन आमच्या बँकेच्या संचालक मंडळाच्या सूचनेनुसार दोन वर्षापूर्वी रिझर्व्ह बँकेकडे याबाबत प्रस्ताव पाठवण्यात आला होता.

याबाबत संचालक डॉ.नितीन घोरपडे म्हणाले, या बँकेने साठ वर्षात अनेक शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करून त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावले. योगदान दिलेल्या संस्थापकांचे नाव बँकेला द्यावे, अशी धारणा सर्वांची होते.त्याप्रमाणे प्रस्ताव पाठवला व रिझर्व्ह बँकेने आम्हाला बँकेचे नाव बदलण्यास परवानगी दिली. त्यानुसार आता बँकेचे नाव सखाराम ऊर्फ दादा जोशी गणेश सहकारी बँक असे नामांतरण करण्यात आले असून या नावाने सर्व बँकेचे व्यवहार आता सुरू झाले आहेत.

यावेळी व्हा.चेअरमन रामचंद्र मोहिते, संचालक अरविंद जोशी, योगेश जोशी, यशराज जोशी, मनोहर जोशी, दिगंबर पुजारी,श्रीवल्लभ पुजारी, बाळासाहेब दिवटे, उमेश जोशी, प्रभू चौगुले, नेमांना ऐनापुरे, चिन्मय कागलकर, रामचंद्र मोरे, जयवंत कांबळे, त्रिशला चौगुले, रेखा पुजारी, दत्तात्रय सुतार, मंदार धर्माधिकारी सीईओ नीता खलाटे, सहाय्यक व्यवस्थापक महेश परीट उपस्थित होते.

# आळतेत पारंपारिक पद्धतीने शिवजयंती साजरी

हातकणंगले,ता.२१(प्रतिनिधी)–

**आळते (ता.हातकणंगले) येथील शिवजयंती उत्सवात यंदा डॉल्बी सारख्या गोष्टींना फाटा देऊन अत्यंत पारंपारिक पद्धतीने छ.शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.तीन दिवस चाललेल्या या सोहळ्याने आळते परिसरातील वातावरण पूर्णपणे शिवमय झाले होते.**

उत्सवाचा प्रारंभ ता.१७एप्रिल रोजी शाहीर रंगराव पाटील यांच्या पहाडी आवाजातील पोवाड्याने झाला. त्यांनी सादर केलेल्या मुद्रा भद्राय राजते' या ऐतिहासिक पोवाड्याने उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले. त्यानंतर ता.१८ एप्रिल रोजी समस्त ग्रामस्थांसाठी



भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

ता.१९ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजल्यापासूनच गावात मंगलमय वातावरण होते. पन्हाळगडावरून मोठ्या उत्साहात शिवज्योतीचे गावात आगमन झाले. मिरवणुकीमध्ये सर्व शिवभक्त पारंपारिक वेशभूषा आणि डोक्यावर भगवे फेटे परिधान करून सहभागी झाले होते. जिल्हा परिषदेचे ज्येष्ठ सदस्य अरुणराव इंगवले, सरपंच अजिंक्य इंगवले यांच्या हस्ते मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला.ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवत मिरवणुकीत सजवलेल्या बैलगाड्या सहभागी झाल्या होत्या. मिरवणुकीचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे अघोरी नृत्य. या पथकाने सादर केलेल्या उत्कृष्ट सादरीकरणा मुळे ही मिरवणूक जिल्हाभरात चर्चेचा विषय ठरली.

# पैजारवाडीत चिले महाराज भंडारा महोत्सवाची उत्साहात सांगता

बोरपाडळे,ता.२१(प्रतिनिधी)–

**!! ओम दत्त चिले ओम !! आणि दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराच्या नामघोषात श्री क्षेत्र पैजारवाडी (ता.पन्हाळा) येथील चिले मंदिरात श्री.सद्गुरु चिले महाराज भंडारा महोत्सव पार पडला.यावेळी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यासह अनेक राज्यातील हजारो भाविकांनी श्री दर्शनांचा लाभ घेतला.**

परमपूज्य श्री.सद्गुरु चिले महाराज कासवाकृती समाधी मंदिरात चिले महाराज यांची ४१ वी पुण्यतिथी व भंडारा महोत्सवाची सुरूवात शुक्रवार ता.१० एप्रिल रोजी अखंड नामविना, हरिपाठ व ग्रंथ ज्ञानेश्वरी पारायणाने झाली.

भंडारा उत्सव गुरुवार ता.१६ रोजी सकाळी 'श्री'ना अभिषेक व विधिवत पूजा करण्यात आली. तसेच महाआरती नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.सायंकाळी टाळ मृदंग,धनगरी ढोल,लेझीम हलगी अशा पारंपारिक वाद्यांसह हजारो भक्तांच्या उपस्थितीत रथासह भव्य ग्रामप्रदक्षिणा पालखी सोहळा संपन्न झाला.यावेळी पैजारवाडी ग्रामस्थांनी पालखीचे स्वागत, पूजा करून शुक्रवार ता.१७रोजी सकाळी नामदेव महाराजांचे १७ वे वंशज कीर्तनकार ह.भ.प. एकनाथ नामदास महाराज (पंढरपूर ) यांचे काल्याचे कीर्तन झाले. दुपारी बालगोपाळाच्या हस्ते हंडी फोडून गोपालकाला पार पडला. महाआरती नंतर भक्तांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.सायंकाळी ध्वजारोहणाबरोबरच या भंडारा महोत्सवाची सांगता झाली.

या भंडारा महोत्सव सप्ताह कालावधीत दररोज पहाटे काकड आरती,सकाळी श्री.ना अभिषेक, त्रिकाल आरती, रात्री भजन, कीर्तन प्रवचनाचे कार्यक्रम झाले व आयोजित रक्तदान शिबिरात शेकडो भाविकांनी रक्तदान केले.यावेळी यशवंत आयुर्वेदिक हॉस्पिटल तसेच बोरपाडळे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनिया कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सेवा पुरवली.परिसरातील सर्व सार्वजनिक संस्था, मंडळे, ग्रामस्थ व भक्तगणांचे या महोत्सवासाठी सहकार्य लाभले. यावेळी परमपूज्य सद्गुरु चिले महाराज समाधी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बाबासाहेब चव्हाण, व्यवस्थापक बाबुराव गराडे, विश्वस्त जयसिंग पारखे, बळवंत घोसाळकर, चंद्रप्रकाश पाटील, सचिव विनायक जाधव, पुजारी बापूजी यादव आदी उपस्थित होते.

# समीर देशपांडे यांना पुरस्कार जाहीर

कोल्हापूर,ता.२१(प्रतिनिधी)–

**येथील वरिष्ठ पत्रकार समीर सुधाकर देशपांडे यांना सरपंच परिषद महाराष्ट्र यांच्यावतीने समाजभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सरपंच परिषदेचे राज्य अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी या पुरस्काराची घोषणा केली.**



गुरूवार,ता.३० एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता पुणे येथील यशदा प्रशिक्षण संस्थेमध्ये विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार श्रीकांत भारतीय आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्या उपस्थितीमध्ये या पुरस्काराचे वितरण होणार आहे. देशपांडे हे गेली ३० वर्षे पत्रकारितेमध्ये असून त्यांनी ग्रामविकासाबाबत सातत्याने लेखन केले आहे. ते मुळचे आजरा तालुक्यातील चिमणे येथील असून सध्या ते कोल्हापूरमध्ये कार्यरत आहेत.

श्रीहरी
शुक्रवार, ता. १७/०४/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दुपारी १ वाजता
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
आदत
जबदस्त रोमँटीक हिंदी चित्र
दुपारी ४ व ७ वा.
A बदन की खुशबू प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १७ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
लो वेट निको
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी
DOLBY DIGITAL PLUS 7.1
शुक्रवार दि. १७ पासून
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
bookmyshow
पंचवटी वॉटसॲप ग्रुप
संपर्क : 9623150103
रोज ४ खेळ *१२ *३ *६ *९ वा.




५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गर्दीचा ५ वा आठवडा
११.१५ - ३.१५ - ७.१५ वा.
खास कमी केलेल्या दरात ति.दर रु. ५०




कल्पना
लेजर प्रोजेक्टरसहीत
शुक्रवार ता.१७ पा
१२, ३, ६, ९ वा
सुपरहिट फुल्ल कॉमेडी चित्रपट




गुरु
शुक्रवार ता.१७ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.३०*३.३०*६.३० व ९.३० वा.
डायरेक्टर प्रियदर्शन व अक्षयकुमारची
सुपरक्रेझी हॉरर कॉमेडी



भुत बंगला
(हिंदी)

RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX



" भूत बंगला "- हिंदी
10:15 AM, 01:15 PM
04:15 PM, 07:15 PM
10:15 PM
" द मम्मी " - हिंदी
10:45 AM, 10:30 PM
" धुरंधर 2 " - हिंदी
11:30 AM, 01:30 PM
06:00 PM, 09:30 PM
" सालबर्डी " - मराठी
07:00 PM
" सुपर डुपर " - मराठी
04:00 PM
7447440070
bookmyshow
आता मूवी सोबत वेन्स्डे फूड कॉम्बोचा लाभ घ्या आणि कोणताही शो पहा 100/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11



भूत बंगला (HIN) (U/A)
11.00am, 01.30, 04.30, 07.30, 10.30pm
धुरंधर २ (HIN) (A)
01.00, 05.30, 10.00pm
सुपर डुपर (MAR) (U/A)
02.00, 07.30pm
सालबर्डी (MAR) (A)
04.30pm
बुधवार धमाका कोणताही शो पहा फक्त 100 रु.

# लोकांच्या मनातील जिल्हा परिषद अध्यक्ष हा शिवसेनेचाच

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे : साताऱ्यातील गांधी मैदानावर जाहीर सभा

सातारा,ता.२१(प्रतिनिधी)–

**सातारा जिल्हा परिषदेत अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीच्यावेळी झालेले राजकारण खालच्या पातळीवरील होते. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष कोणीही होऊ द्यात पण लोकांच्या मनातला जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा शिवसेनेचाच आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर सभेत बोलताना ठासून सांगितले.**



सातारा: येथील सभेत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,व्यासपीठावर मान्यवर.

सातारा जिल्हा परिषद,पंचायत समितीमधील मोठ्या यशानंतर सातारा गांधी मैदानावरील झालेल्या पहिल्या जाहीर सभेत ते बोलत होते.दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्ह्यात एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता आता शिवसेनेचा बालेकिल्ला बनविण्यासाठी प्रयत्न करण्याचा शिवसेनेचा यशस्वी प्रयत्न मोठ्या संख्येने विजयी उमेदवारातून दिसून आला असे सांगून विजयी शिवसैनिकांना शुभेच्छा व आशीर्वाद देत सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठाम राहणार असल्याचे सांगितले. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार सुहास बाबर,संजीवराजे नाईक निंबाळकर, चंद्रहार पाटील,रवींद्र धंगेकर, शरद कणसे, चंद्रकांत जाधव,रेश्मा ताई जगताप,हनुमंतराव जगदाळे, योगेश जानकर अंकुश कदम आदी उपस्थित होते.यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.जिल्हा परिषद,पंचायत समिती सदस्य, नगराध्यक्ष,पालिका नगरसेवक आदी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, सातारा हा एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. पण आता काँग्रेस नाही असा टोमणा त्यांनी भाजपाचे नाव न घेता लगावला. नाव गेले की परत येत नाही. ते कमवायला फार कष्ट घ्यावे लागतात.तुम्ही मिळकत (प्रॉपर्टी) किती कमावली. संपत्ती किती कमावली. पैसा किती कमवला. यापेक्षा माणसं किती कमावली. माणसांचे प्रेम किती कमवले हे महत्त्वाचं आहे.पण नुकत्याच झालेल्या येथील निवडणुकीत तुम्ही ते घालवलं. सातारच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि परंपरेच्या राजकारणाला खालच्या पातळीवरचे राजकारण केले. जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष कोणी होऊ द्यात पण लोकांच्या मनातला जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा शिवसेनेचाच आहे, असे एकनाथ शिंदे यांनी ठासून सांगितले.

ते पुढे म्हणाले, सत्ता ही लोकांना मदत करण्याचे माध्यम आहे. साताऱ्यात खालच्या पातळीवरचे राजकारण झाले. हे सातारकर सहन करणार नाहीत.मी पण सातारकर आहे.रोख ठोक आहे.एक तर मी कोणाच्या वाटेला जात नाही. पण कोणी छेडलं तर त्याला सोडायचं नाही हा माझा चांगला जुमला आहे, असेही त्यांनी सुनावले.

पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी जिल्ह्यात शिवसेना वाढविण्यात यशस्वी प्रयत्न केले. पालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत महायुती करण्याचा प्रयत्न केला. मात्र आम्हाला टाळण्यात आले. जिल्ह्यात पुनर्वसनाच्या प्रश्नांना गती दिली आहे. जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून महायुतीतील प्रत्येक घटक पक्षातील सदस्याला प्रामाणिकपणे निधी दिला असल्याचे सांगितले. या सभेला मोठ्या संख्येने शिवसैनिकांनी आणि सातारकर नागरिकांनी गर्दी केली होती.

# महाराजस्व अभियानामुळे नागरिकांचे प्रश्न सोडविण्यास गती–आ.देशमुख

शिराळा,ता.२१(प्रतिनिधी)–

**छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न तत्काळ सोडविण्यास गती मिळत आहे. शासनाच्या विविध सेवा एकाच छताखाली सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून महसूल यंत्रणा थेट गावपातळीपर्यंत पोहोचत आहे, असे प्रतिपादन आमदार सत्यजित देशमुख यांनी केले.**


शिरशी येथे लाभार्थींना प्रमाणपत्राचे वाटप करताना आम. सत्यजित देशमुख, तहसीलदार शामला खोत पाटील आदी.

शिरशी येथे आयोजित 'छत्रपती श्री. शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत शिबिरात ते बोलत होते. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व त्या तात्काळ सोडविण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.या शिबिरात महसूल विभागाच्या विविध सेवांसह अनेक योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. महिला बचत गटांना 'उमेद' अभियानांतर्गत धनादेशांचे वाटप करण्यात आले. कृषी विभागामार्फत लाभार्थ्यांना ट्रॅक्टर व रोटावेटर यांसारख्या शेतीसाठी आवश्यक साधनांचे वितरण करण्यात आले. तसेच संजय गांधी निराधार योजनेतील पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.याशिवाय रेशन मंजुरी आदेश, नवीन रेशन कार्ड वाटप, तसेच शेत पाणंद रस्त्यांच्या अडचणी दूर करण्यासंदर्भात विविध लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) रघुनाथ पोटे, तहसीलदार शामला खोत पाटील, सरपंच स्मिताताई भोसले, माजी जिल्हा परिषद सदस्य के. डी. पाटील,उपसरपंच आनंदा महिंद यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिरशीत लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण**


लाभार्थ्यांना शासनाच्या विविध विभागातील लाभांचे, दाखल्यांचे वाटप करताना ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले व इतर मान्यवर.

## योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहचवा-ना.शिवेंद्रसिंहराजे

सातारा,ता.२१(प्रतिनिधी)–

**राज्यातील जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी, विविध सोयी–सुविधा पुरवण्यासाठी सरकारने अनेक कल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत. अशा योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून त्याचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम प्रशासनाने काटेकोरपणे करावे, असे आवाहन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.**

कुमठे (ता.सातारा) येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत लाभार्थ्यांना शासनाच्या विविध विभागातील लाभांचे, साहित्याचे व दाखल्यांचे वाटप ना. शिवेंद्रसिंहराजे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जि.प. सदस्या पूजा मोरे,सातारा पंचायत समितीचे सभापती महेश गाडे, प्रमिला सुतार, कोमल दळवी, सातारा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रम पवार,अरुण कापसे, सुरेंद्र देशपांडे, अरविंद चव्हाण, अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन नामदेव सावंत,प्रांताधिकारी आशिष बारकुल,तहसीलदार समीर यादव, भूमी अभिलेखचे उप अधीक्षक तुषार पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.

# सहकारी संस्थांनी उत्पन्नाचे नवनवीन स्रोत निर्माण करावेत

## प्रवीण दरेकर;सातारा जिल्हा बँकेतर्फे चर्चासत्र

सातारा,ता.२१(प्रतिनिधी)–

**ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था ही विविध सहकारी संस्थांवर अवलंबून आहे. ज्या संस्था सध्या अडचणीत किंवा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, त्यांना पुन्हा ऊर्जीतावस्थेत आणण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. मात्र, केवळ शासनावर अवलंबून न राहता सहकारी संस्थांनी स्वतःचे उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण केले पाहिजेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं–समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी केले.**


सातारा जिल्हा बँकेच्यावतीने आयोजित चर्चासत्राचे दिपप्रज्वलन करुन उद्घाटन करताना प्रवीण दरेकर, शेजारी इतर मान्यवर.

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्व. यशवंतराव चव्हाण सभागृहात 'सहकार चळवळीसमोरील आव्हाने व उपाययोजना' या विषयावर आयोजित चर्चासत्रात श्री. दरेकर बोलत होते. या प्रसंगी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा खासदार नितीन पाटील, बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई, जिल्हा उपनिबंधक संजयकुमार सुद्रीक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे संचालक धनंजय शेडगे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

श्री. दरेकर म्हणाले, सहकारी संस्थांना शासन मदत आणि अनुदान देत आहे, परंतु त्यासोबतच संस्थांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होणे अधिक गरजेचे आहे. पश्चिम महाराष्ट्राला सहकाराची मोठी परंपरा लाभली आहे.येथील जिल्हा बँक शेतकऱ्यांना वित्तपुरवठा करून मोठी ताकद देत आहे. सभासदांनीही सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करून संस्थांचे बळकटीकरण करावे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले, सातारा जिल्ह्यातील सहकारी संस्था अनेक अडचणींवर मात करून उत्कृष्ट कार्य करत आहेत. या संस्थांना जिल्हा बँकेचे नेहमीच सहकार्य लाभते.संस्थांच्या अडचणी सोडवण्यासाठी शासन खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा खासदार श्री.पाटील म्हणाले, जिल्हा बँक ही जिल्ह्याची अर्थवाहिनी असून देशात अग्रणी बँक म्हणून ओळखली जाते. सहकार क्षेत्रात शिस्त आणि प्रामाणिकपणा अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा चर्चासत्रांमुळे संस्थांचे अनेक प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक धनंजय शेळके यांनी केले. चर्चासत्रास विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेणोलीत मोफत आरोग्य शिबीर संपन्न

कराड,ता.२१(प्रतिनिधी)–

**शेणोली (ता.कराड) येथे डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांच्या जयंतीनिमित्त गांधी फाउंडेशन, कराड व शेणोली ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच एच.व्ही.देसाई आय सेंटर कराड व प्राथमिक उपकेंद्र शेणोली यांच्या वैद्यकीय सहकार्याने मोफत आरोग्य शिबीर पार पडले.**

यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. शिबिरामध्ये मोफत नेत्र तपासणी,मोतिबिंदू शस्त्रक्रिया तपासणी करण्यात आली. एकूण ३७५ लोकांनी शिबिरामध्ये सहभाग नोंदवला. त्यापैकी २७५ लोकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले व ६३ लोक मोतिबिंदूचे आढळले. त्यांची पुणे येथे शस्त्रक्रिया पार पडणार आहे. तसेच ३२५ लोकांची मधुमेह व रक्तदाब तपासणी करण्यात आली.


जलव्यवस्थापन कृती पंधरवडा कार्यक्रमात जलप्रतिज्ञा घेताना आ.सुरेश खाडे व इतर प्रमुख मान्यवर.

## प्रत्येकाने जल व्यवस्थापन करणे काळाची गरज-आ.खाडे

मिरज,ता.२१(प्रतिनिधी)–

**पाणी वाया जाऊ नये यासाठी सर्वांनी जागरूक राहून प्रयत्न करावेत.प्रत्येक नागरिकाने जलव्यवस्थापन करणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार डॉ. सुरेश खाडे यांनी केले.**

सांगली येथील हरिपूर संगमेश्वर घाटावर आयोजित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२६' कार्यक्रमात ते बोलत होते.कार्यक्रमात अधिक्षक अभियंता चंद्रशेखर पाटोळे यांनी,२५ ते २९ एप्रिल दरम्यान 'गोदावरी ते नर्मदा' जलयात्रा आयोजित करण्यात येणार असून त्र्यंबकेश्वर व चौंडी येथून तिचा शुभारंभ होणार आहे. या यात्रेत विविध नद्यांचे जलकुंभ लोकसहभागातून महेश्वर येथे नर्मदा नदीत अर्पण करण्यात येणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविकात कार्यकारी अभियंता ज्योती देवकर यांनी या उपक्रमाचा हेतू स्पष्ट करत कृष्णा–वारणेच्या पाण्याचा कलश जलदिंडीसाठी पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमात जलप्रतिज्ञाही देण्यात आली. यावेळी विविध मान्यवर,अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## शक्तीपीठ मार्गाच्या विरोधात नवेखेडला आज जाहीर सभा

ईश्वरपूर,ता.२१(प्रतिनिधी)–

**वाळवा तालुक्यातून जाणाऱ्या नियोजित शक्तीपीठ मार्गाला विरोध करण्यासाठी बुधवार ता. २२ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता नवेखेड येथील विठ्ठल–रुक्मिणी मंदिर सभागृहात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते भागवत जाधव व सरपंच प्रदीपराव चव्हाण यांनी दिली.**

या सभेत कॉम्रेड धनाजी गुरव, बी. जी. पाटील, दलित महासंघाचे शंकरराव महापुरे, कॉम्रेड दिग्विजय पाटील, विजय महाडिक व दिपक कोठावळे हे मार्गदर्शन करणार आहेत.भागवत जाधव म्हणाले की, शक्तीपीठ मार्गामुळे वाळवा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांची शेती बाधित होणार आहे.शासनाने विकासाच्या नावाखाली हा प्रकल्प लादून शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचा प्रयत्न चालवला आहे. याविरोधात एकजूट दाखवण्यासाठी ही सभा आयोजित केली आहे. या बैठकीस तालुक्यातील शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# महिला आरक्षणाचे विधेयक भाजपचे षडयंत्र-खा.विशाल पाटील

सांगली,ता.२१(प्रतिनिधी)–

**भाजपला महिलांना आरक्षण द्यायचंच नाही. संसदेच्या विशेष अधिवेशनातील महिला आरक्षण विधेयक हे भाजपचे षडयंत्र होते. हे विधेयक मंजूर होऊ द्यायचे नव्हतेच, त्याबरोबरच त्याचे खापर काँग्रेसवर फोडायचे होते. पण आता या देशातील महिला शहाण्या आहेत. त्यांना सगळे कळते. महिलांना सर्वाधिक बळ वेळोवेळी काँग्रेस पक्षानेच दिले आहे. आजही ५४३ सदस्य संख्येवर महिला आरक्षण लागू करण्याची मागणी करतोय. त्यासाठी भाजप तयार आहे काय?,असा सवाल खासदार विशाल पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना उपस्थित केला.**

खा.पाटील पुढे म्हणाले, २०२३ मध्ये भाजपने जे महिला आरक्षणाचे विधेयक आणले, त्यालाही काँग्रेसने पूर्ण पाठिंबा दिला.मात्र त्यात जनगणनेनंतर हे आरक्षण लागू करण्याची अट होती. ती भाजपने पूर्ण केली नाही. अडीच वर्षात त्याचे नोटिफिकेशनही काढले नव्हते. या देशात १९५१ पासून सतत प्रत्येक दहा वर्षांनी जनगणना झाली आहे.अगदी युद्ध,आर्थिक संकट असतानाही तत्कालीन सरकारने जनगणना केली. मग २०२१ मध्ये जनगणना का झाली नाही ?. कोरोना होता, तर मग त्यानंतर विश्वचषक क्रिकेट, आयपीएल, निवडणुका कशा झाल्या? आम्ही आजही विद्यमान संख्येवर महिला आरक्षण लागू करण्याच्या बाजूने आहोत. आधी जातनिहाय जनगणना,मग मतदारसंघ पुनर्रचना आणि मग निवडणुका करायलाही हरकत नाही. परंतु, जनगणना न करता भाजप सत्तेसाठी मोडतोड करून दक्षिणेतील राज्यांसह महाराष्ट्रावर अन्याय करणार असेल, तर त्याला आमचा विरोधच राहील. आता लोकसंख्या, कर आणि जीडीपीच्या आधारे नवीन मतदारसंघ रचना करावी, अशी आमची मागणी आहे. ते पुढे म्हणाले, भाजपला हे विधेयक नामंजूर करायचेच होते. त्यात ते यशस्वी झाले आहेत. त्याचे खापर काँग्रेसवर फोडून त्यांच्याकडून आता फेक नेरेटिव्ह पसरवला जात आहे.पण महिला त्याला बळी पडणार नाहीत, असा विश्वास खासदार पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

# कराडमध्ये भव्य दरबार मिरवणूक उत्साहात

कराड,ता.२१(प्रतिनिधी)–

**छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव, जय श्रीराम...! अशा गगनभेदी जयघोषांनी कराडनगरी दुमदुमली. पारंपारिक शिवजयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेली भव्य दरबार मिरवणूक प्रचंड उत्साह, अलोट गर्दी आणि पारंपारिक दिमाखात पार पडली.**


कराड: शिवजयंतीनिमित्त शहरातून दरबार मिरवणूक काढण्यात आली त्यावेळी झालेली शिवभक्तांची गर्दी.

हिंदू एकता आंदोलनाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय शिवजयंती उत्सवाची मुख्य आकर्षण ठरलेली दरबार मिरवणूक कृष्णा नाका येथील पांढरीचा मारूती मंदिर परिसरातून प्रारंभ झाली. भगव्या ध्वजाचे पूजन, पालखीत विराजमान छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण आणि श्रीफळ वाढवून या मिरवणुकीला सुरूवात झाली. याप्रसंगी आ.डॉ.अतुल भोसले, आ.मनोज घोरपडे, माजी आ. बाळासाहेब पाटील,हिंदू एकता आंदोलनचे प्रांतीय अध्यक्ष विनायक पावसकर,संस्थापक चंद्रकांत जिरंगे,जिल्हाध्यक्ष विक्रम पावसकर, नगरसेवक अतुल शिंदे,अजय पावसकर, सुभाषराव डुबल,विष्णू पाटसकर, हणमंतराव पवार, सागर बर्गे, दादासाहेब शिंगण,आशुतोष डुबल, नंदकुमार बटाणे आदींची उपस्थिती होती.

मिरवणुकीच्या अग्रभागी सजवलेले अश्व, त्यानंतर महाराजांची भव्य पालखी, ढोल–ताशा पथके, तुतारीचा निनाद, बँड पथके, वारकरी संप्रदायाचे टाळ–मृदुंग वादन, हलगी पथके अशा पारंपारिक साजशृंगाराने वातावरण भारावून गेले होते. मिरवणुकीत विविध ऐतिहासिक चित्ररथ तसेच छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ,बाल शंभूराजे आणि मावळ्यांच्या वेशभूषेत सजलेले युवक–युवती सहभागी झाले होते. शिवतीर्थ दत्त चौकात शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून या मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

## कोयनानगर येथे विविध दाखल्यांचे वितरण

पाटण,ता.२१(प्रतिनिधी)–

**पाटण तालुका महसूल प्रशासन यांच्या वतीने कोयनानगर (ता.पाटण) येथील करमणूक केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर झाले. या अभियानांतर्गत विविध प्रकारच्या दाखल्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी विविध विभागांमार्फत योजनांची माहिती देण्यात आली.**

यावेळी मंगल माने, राजाभाऊ शेलार, सरपंच चंदा कदम, रासाटीचे सरपंच प्रदीप पाटील,सुषमा सपकाळ, नीता इंगळे,शीतल दवंडे, सावळाराम लाड, नंदकुमार सुर्वे, संतोष कदम, दयानंद नलवडे, महेश शेलार,भागोजी शेळके, सचिन कदम,समर्थ चव्हाण, संजय कुंभार,राजाराम कदम, विजय लाड, ग्राम महसूल अधिकारी निलेश भाग्यवंत व कर्मचारी आदी उपस्थित होते.

# बसवेश्वर चौकातील स्मारकामुळे शहराच्या वैभवात भर

## ना.मकरंद पाटील; महाबळेश्वरमध्ये विविध प्रकल्पांचे लोकार्पण

महाबळेश्वर,ता.२१(वार्ताहर)–

**महाबळेश्वरचे प्रवेशद्वार असलेल्या महात्मा बसवेश्वर चौकात पालिकेने केलेले स्मारक व सुशोभीकरणामुळे महाबळेश्वर शहराच्या वैभवात भर पडली, असे उद्गार मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी येथे बोलताना काढले.**



महाबळेश्वर: महात्मा बसवेश्वर चौकातील स्मारकाचे लोकार्पणप्रसंगी ना.मकरंद पाटील,नगराध्यक्ष सुनिल शिंदे व इतर प्रमुख मान्यवर.

महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेच्या वतीने शहराच्या पर्यटन वाढीसाठी आणि सौंदर्यीकरणासाठी हाती घेतलेल्या विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे लोकार्पण ना. मकरंद पाटील यांच्या हस्ते तर नगराध्यक्ष सुनील शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडले.या विकासकामांच्या पूर्ततेमुळे महाबळेश्वरला भेट देणाऱ्या पर्यटकांना आता अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार असून, शहराच्या ऐतिहासिक आणि नैसर्गिक सौंदर्याला आधुनिकतेची जोड मिळाली असल्याचे मत ना.पाटील यांनी येथे बोलताना व्यक्त केले. शहराच्या मध्यवर्ती भागातील नगरपरिषदेच्या मालकीची असलेली आणि ऐतिहासिक वारसा लाभलेली पेटीट ग्रंथालय ही ब्रिटिशकालीन इमारत काळाच्या ओघात दुर्लक्षित झाली होती. या इमारतीचा जिर्णोद्धार आणि आजूबाजूच्या मोकळ्या जागेचे सुशोभिकरण अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने पूर्ण करण्यात आले आहे.माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या वास्तुच्या सुशोभीकरण व नूतनीकरण यासाठी ५ कोटींचा निधी मंजूर केला होता. नूतनीकरण व सुशोभिकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर ही ऐतिहासिक वास्तू आता नव्या रूपात पर्यटकांच्या आणि इतिहासप्रेमींच्या सेवेत रुजू झाली आहे.या इमारतीचे उद्घाटन ना पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या सोहळ्यास शहराचे प्रथम नागरिक नगराध्यक्ष सुनिल शिंदे, उपनगराध्यक्ष नासिर मुलाणी आणि मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्यासह पंचायत समितीच्या सभापती शकुंतला चोरमले,प्रवीण भिलारे, जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्र राजपुरे,माजी नगराध्यक्ष डी.एम.बावळेकर,नगरसेवक संजय जंगम, अफझल सुतार, रोहित ढेबे, संतोष शिंदे, राहुल पिसाळ, रविंद्र कुंभारदरे, संतोष आखाडे,किसन शिंदे ,नगरसेविका विमलताई पार्टे,संगीता वाडकर,स्मिता पाटील, विद्या बावळेकर,पल्लवी कोंढळकर, प्रियंका वायदंडे, रेश्मा ढेबे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

# २९ हजार कुटुंबांचे घराचे स्वप्न साकार होणार

## शासकीय जमिनीवरील २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमानुकूल होणार

कोल्हापूर,ता.२१(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यातील शासकीय जमिनीवर वर्षानुवर्षे वास्तव्यास असलेल्या हजारो कुटुंबांसाठी राज्य सरकारने नुकताच एक अत्यंत दिलासादायक आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, ता.१ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे मिशन मोडवर अधिकृतरीत्या नियमानुकूल करण्याचे निर्देश देण्यात आले.**



कोल्हापूर : जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीप्रसंगी उपस्थित पालकमंत्री प्रकाश आबिटकर, आम.राजेंद्र पाटील-यड्रावकर व इतर.

या निर्णयामुळे जिल्ह्यातील तब्बल २९ हजार नागरिकांना त्यांच्या हक्काच्या घराची मालकी मिळणार असून 'अतिक्रमणधारक' हा शिक्का पुसून ते आता अधिकृत घरमालक होणार आहेत. १ मे २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभांमध्ये या लाभार्थ्यांच्या याद्यांचे वाचन करून या महाभियानाला प्रत्यक्ष सुरुवात केली जाणार आहे. यावेळी आम. राजेंद्र पाटील यड्रावकर, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख शिवाजीराव भोसले, उपजिल्हाधिकारी शक्ती कदम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जयवंत उगले, सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी यांच्यासह जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांनी यावेळी माहिती दिली. शासनाने यासाठी एक विशेष (प्रमाणित कार्यपद्धती) जाहीर केली असून, संपूर्ण प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि कालमर्यादेत पूर्ण केली जाणार आहे.या योजनेंतर्गत १५०० चौरस फुटांपर्यंतचे निवासी क्षेत्र नियमानुकूल करण्याची तरतूद असून, ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, ही सर्वसामान्य जनतेसाठी मोठी भेट आहे. ५०० ते १५०० चौरस फुटांपर्यंतच्या क्षेत्रासाठी बाजारमूल्याच्या केवळ १० टक्के शुल्क आकारून मालकी हक्क प्रदान केले जातील. अर्जाच्या छाननीपासून ते अंतिम आदेशापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया केवळ ९० दिवसांत पूर्ण करण्याचे बंधनकारक करण्यात आल्याने प्रशासकीय कामाला आता मोठी गती मिळणार आहे.

या प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे सोपे व्हावे, यासाठी शासनाने स्पष्ट नियमावली दिली आहे. यामध्ये २०११ पूर्वीचे पुरावे म्हणून मतदार यादी, वीज बिल, मालमत्ता कर पावती आणि महत्त्वाचे म्हणजे २०११ पूर्वीची गुगल अर्थ इमेजेसचा वापर केला जाणार आहे. महानगरपालिका क्षेत्रात वॉर्ड ऑफिसर, नगरपालिका क्षेत्रात मुख्याधिकारी आणि ग्रामीण भागात ग्रामसेवक हे अर्ज स्वीकारण्याचे केंद्र असतील.विशेष म्हणजे, केवळ निवासासाठी वापरण्यात येत असलेल्या घरांसोबतच दैनंदिन गरजांची छोटी दुकाने, दवाखाने किंवा पिठाची गिरणी यांसारखी अतिक्रमणे देखील अपवादात्मक परिस्थितीत घराचाच भाग समजून नियमानुकूल केली जाणार आहेत, ज्यामुळे अनेक छोट्या व्यावसायिकांनाही मोठा आधार मिळणार आहे.

पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्पष्ट केले आहे की, या योजनेचा लाभ एका कुटुंबाला केवळ एकदाच घेता येईल आणि नियमानुकूल झालेली ही जागा पुढील ५ वर्षांपर्यंत हस्तांतरित करता येणार नाही. नदीपात्र, रस्ते, वन जमीन किंवा सीआरझेड क्षेत्रात झालेली अतिक्रमणे मात्र या कक्षेत येणार नाहीत. १ मे पासून सुरू होणाऱ्या या प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हा स्तरावर आणि विधानसभा क्षेत्रनिहाय आढावा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील हजारो कष्टकरी कुटुंबांच्या डोक्यावर आता हक्काचे छत कायमस्वरूपी स्थिरावणार आहे.

# सवलत योजनेद्वारे एसटीला पावणेसहा कोटीचे उत्पन्न

कोल्हापूर,ता.२१(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कोल्हापूर विभागाने शालेय सहलींसाठी जाहीर केलेल्या ५० टक्के सवलत योजनेला जिल्ह्यातील शाळांकडून मोठा प्रतिसाद मिळाला आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात या योजनेमुळे कोल्हापूर विभागाच्या एसटीच्या उत्पन्नात विक्रमी वाढ झाली आहे.**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्यावतीने एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत २ हजार १८२ एसटी बसेसद्वारे सवलत योजनेव्दारे ५ कोटी ७५ लाख ९४ हजार ६०९ इतके उत्पन्न मिळाल्याची माहिती विभाग नियंत्रक अभय देशमुख यांनी दिली.



यामध्ये एप्रिल २०२५ या महिन्यात ८२ हजार ५६० इतके उत्पन्न मिळाले, जून २०२५ या महिन्यात ९ हजार ६००, ऑगष्ट २०२५ या महिन्यात ७२ हजार ६४०, सप्टेबर २०२५ या महिन्यात २ लाख ७३ हजार २४०, ऑक्टोंबर २०२५ या महिन्यात १ लाख २९ हजार २९४, नोव्हेबर २०२५ या महिन्यात ८८ लाख ६९ हजार २८, डिसेंबर २०२५ या महिन्यात १ कोटी ९९ लाख २४ हजार ३२९, जानेवारी २०२६ या महिन्यात २ कोटी ३८ लाख ५० हजार ४३२, फेब्रुवारी २०२६ या महिन्यात ३८ लाख ५७ हजार ८५६ तर मार्च २०२६ या महिन्यात ५ लाख २५ हजार ६३० इतके उत्पन्न मिळाले आहे. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सवलत योजनेमुळे ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थ्यांना राज्यातील गड-किल्ले,नयनरम्य समुद्रकिनारे आणि ऐतिहासिक स्थळांना स्वस्तात भेट देणे शक्य होत असल्याचेही विभाग नियंत्रक अभय देशमुख यांनी सांगितले.

## राज्यातील साखर कारखान्यांकडे

# २१३० कोटींची एफ.आर.पी.थकीत

राशिवडे,ता.२१(प्रतिनिधी)-

**राज्यातील ऊस गाळप हंगाम संपून आता महिना उलटला आहे. तरीही अनेक साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या घामाचे दाम पूर्णपणे दिलेले नाहीत. राज्यातील साखर कारखान्यांकडे अजूनही २१३० कोटी रुपयांची एफ.आर.पी.थकीत आहे. बाजारपेठेत साखरेचे दर कोसळल्याने आणि उपपदार्थांनाही अपेक्षित भाव मिळत नसल्याने कारखाने आर्थिक अडचणीत सापडले असून, ही थकीत बिले देण्यासाठी सध्या कारखानदारांची मोठी कसरत सुरू आहे.**



चालू गाळप हंगामात राज्यातील एकूण २०९ सहकारी आणि खाजगी साखर कारखान्यांनी सहभाग नोंदवला होता. या हंगामात विक्रमी १०४२.२७ लाख टन ऊसाचे गाळप करण्यात आले आहे. एफ.आर.पी. अदा करण्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात आघाडीवर असले, तरी थकीत रकमेचा आकडा मोठा आहे.आतापर्यंत राज्याने ९५.७२ टक्के एफ.आर.पी.अदा केली आहे. परंतु उर्वरित ४.२८ टक्के रक्कम अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेली नाही. साखर कारखाने सध्या दुहेरी संकटात आहेत. एकीकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून बिलासाठी दबाव वाढत आहे,तर दुसरीकडे जागतिक आणि स्थानिक बाजारपेठेत साखरेचे दर ढासळले आहेत. साखरेसोबतच मळी, इथेनॉल यांसारख्या उपपदार्थांनाही समाधानकारक दर मिळत नसल्याने कारखान्यांची आर्थिक गणिते कोलमडली आहेत. ही थकीत बिले देण्यासाठी अनेक कारखाने आता बँकांकडून कर्ज मिळवण्यासाठी किंवा इतर मार्गांनी आर्थिक जुळवाजुळव करण्यासाठी धडपडत आहेत.

**साखर दरातील घसरणीचा कारखान्यांना फटका**

हंगाम संपून काळ लोटल्याने आता शेतकऱ्यांच्या नजरा कारखान्यांच्या निर्णयाकडे लागल्या आहेत. पावसाळा तोंडावर असल्याने शेतीकामासाठी पैशांची गरज असताना ही थकबाकी लवकर मिळावी, अशी मागणी ऊस उत्पादक शेतकऱ्यांमधून होत आहे.

### कारखान्यांची सद्यस्थिती

**थकीत बिलांच्या आकडेवारीनुसार ८४ कारखान्यांनी ८० ते ९९.९९ टक्के एफ.आर.पी.अदा केली आहे तर २३ कारखान्यांनी ६० ते ७९.९९ टक्के, १० कारखान्यांनी ५९.९९ टक्क्यांपेक्षा कमी रक्कम अदा केली असून १७७ कारखान्यांकडे २१३० कोटींची एकूण थकबाकी आहे.**

# 'मुख्यमंत्री पाणंद रस्ते योजना' प्रभावीपणे राबवा

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर; रोजगार हमी योजनेतील विलंबाची चौकशी होणार

कोल्हापूर,ता.२१(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यातील शेतीमालाची वेळेवर वाहतूक आणि यांत्रिकीकरणाला चालना मिळावी, यासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबवावी. केवळ मार्गदर्शक तत्त्वे देऊन चालणार नाही, तर स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत यंत्रणेला विश्वासात घेऊन ही योजना कोल्हापूर जिल्ह्यात राज्यात सर्वाधिक यशस्वी करावी, असे निर्देश पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष आढावा बैठकीत ते बोलत होते.**



यावेळी आम.राजेंद्र पाटील-यड्रावकर, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख शिवाजीराव भोसले, उपजिल्हाधिकारी शक्ती कदम, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जयवंत उगले व सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी यांच्यासह जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या धडाडीच्या निर्णयामुळे या योजनेला बळकटी मिळाली असल्याचेही पालकमंत्र्यांनी यावेळी नमूद केले. योजनेच्या अंमलबजावणीतील अडथळे दूर करण्यासाठी सरकारने महत्त्वाचे सवलतीचे निर्णय घेतले आहेत. रस्त्यासाठी लागणारा गाळ, मुरूम आणि दगडावर आता कोणतेही रॉयल्टी (स्वामित्व शुल्क) आकारले जाणार नाही. तसेच, भूमि अभिलेख विभागामार्फत मोजणी मोफत केली जाईल आणि अतिक्रमणे हटवण्यासाठी पोलीस बंदोबस्तही विनामूल्य उपलब्ध करून दिला जाणार आहे.जमिनीचे संपादन केवळ नोंदणीकृत दानपत्राद्वारे स्वेच्छेने दिलेल्या जागेवरच केले जाईल. या सवलतींमुळे कामाचा खर्च आणि वेळ वाचणार असून शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान टाळणे शक्य होणार असल्याचे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**रोजगार हमी योजनेतील विलंबाच्या चौकशीसाठी विशेष समितीची नियुक्ती**

**रोहयो अंतर्गत जनावरांचे गोठे, विहीर बांधकाम आणि घरकुलांच्या कामांना मिळणारी प्रशासकीय मान्यता व निधी वितरणात होणाऱ्या विलंबाची पालकमंत्र्यांनी गंभीर दखल घेतली आहे. या तक्रारींच्या निवारणासाठी उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती नियुक्त करण्यात आली असून ही समिती एका महिन्यात अहवाल सादर करेल. मस्टर काढण्यापासून ते प्रत्यक्ष पैसे मिळेपर्यंतच्या प्रक्रियेतील तांत्रिक अडथळे दूर करून लाभार्थ्यांना तात्काळ निधी उपलब्ध करून देणे हा या समितीचा मुख्य उद्देश आहे.**

आम.राजेंद्र पाटील-यड्रावकर यांनी प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या मात्र सरकारी दफ्तरी नोंद नसलेल्या रस्त्यांच्या नोंदी घेण्याची सूचना केली. या कामांसाठी जिल्हास्तरीय समितीने जेसीबी, पोकलेन यांसारख्या यंत्रसामग्रीचे तासाचे दर निश्चित केले असून १५ वा वित्त आयोग, आमदार/खासदार निधी आणि सीएसआर मधून निधीचे नियोजन केले आहे. जलद अंमलबजावणी आणि दर्जेदार रस्ते निर्मितीवर बैठकीत भर देण्यात आला. जिल्हा प्रशासनाने ही योजना मिशन मोडवर राबवून लोकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत, असे आवाहनही पालकमंत्र्यांनी केले.

## डी.वाय. इंजिनिअरिंगमध्ये हॅकॅत्सोवचे आयोजन

कोल्हापूर,ता.२१(प्रतिनिधी)-

**येथील डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटमध्ये ता.२४ व २५ एप्रिल रोजी राष्ट्रीय स्तरावरील हॅकथॉन 'हॅकॅत्सोव २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे.**

या स्पर्धेसाठी पूर्वनिवड चाचणी घेण्यात आली होती. या चाचणीत देशभरातील सुमारे ४०० संघांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी अंतिम फेरीसाठी ३० उत्कृष्ट संघांची निवड करण्यात आली आहे. २४ तास अखंड चालणारा हा बहुप्रतिक्षित स्पर्धात्मक महोत्सव तंत्रज्ञानप्रेमी विद्यार्थ्यांसाठी मोठे आकर्षण ठरणार आहे.या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. अजित पाटील यांच्या नेतृत्वाखाली होत असून, डॉ.विनायक पुजारी हे कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून कार्य पाहत आहेत.

# आम.रोहित पवार यांची श्री दत्त कारखान्याला सदिच्छा भेट

शिरोळ,ता.२१(प्रतिनिधी)-

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे नेते आमदार रोहित पवार यांनी श्री दत्त साखर कारखाना कार्यस्थळी सदिच्छा भेट दिली. श्री दत्त उद्योग समूहाचे प्रमुख, उद्यानपंडित गणपतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या जमीन क्षारपड मुक्तीच्या कामाचे कौतुक करून लवकरच क्षारपड मुक्ती कामाची विस्तृत माहिती घेणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.**


आम.रोहित पवार यांचे स्वागत करताना गणपतराव पाटील, चेअरमन रघुनाथ पाटील व इतर प्रमुख मान्यवर.

आम. रोहित पवार हे वैयक्तीक कार्यक्रमानिमित्त शिरोळ तालुक्यात आले होते. श्री दत्त साखर कारखाना कार्यस्थळी त्यांनी सदिच्छा भेट दिली. उद्यानपंडित गणपतराव पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

यावेळी गणपतराव पाटील यांनी शिरोळ तालुक्यामध्ये झालेल्या जमीन क्षारपड मुक्तीच्या कामाची यशोगाथा सांगितली. दहा हजार एकरावर क्षारपड मुक्तीचा हा प्रकल्प यशस्वी झाला असून चार हजार एकरावरती शेतकरी प्रत्यक्षात उत्पादन घेत असल्याचे सांगितले. कारखान्याच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या ऊस विकास योजना, सेंद्रिय कर्ब वाढीचे प्रयत्न, सुपर केन नर्सरी, माती पाणी पाने परीक्षणाचा अहवाल, अशा विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. मुख्य शेती अधिकारी श्रीशैल हेगाण्णा यांनी क्षारपडमुक्तीच्या कामाची तांत्रिक माहिती दिली. आमदार रोहित पवार यांनी हे काम निश्चितच कौतुकास्पद असून थोड्याच दिवसात या कामाची सविस्तर माहिती घेणार असल्याचे सांगितले.

यावेळी चेअरमन रघुनाथ पाटील, संचालक दरगु गावडे, महेंद्र बागे, अशोकराव कोळेकर, रावसाहेब भिलवडे, विजयसिंह जगदाळे,दिलीप पाटील-कोथळीकर, नितीन बागे, वरुण पाटील, पंडितराव काळे, बी.जी. माने, अंबादास नानिवडेकर, ए.एस. पाटील, अमर चौगुले यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# गोकुळसाठी राष्ट्रवादीने स्वतंत्र पॅनेल उभारावे

कोल्हापूर, ता.२१(प्रतिनिधी)-

**गोकुळ दूध संघाच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीच्या तयारीला वेग येत असताना,या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि मित्रपक्षांचे संयुक्त पॅनेल उभारण्याची मागणी पुढे आली आहे. गोकुळचे संचालक युवराज पाटील आणि केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैया माने यांनी ही भूमिका मांडत मंत्री हसन मुश्रीफ यांनी मुख्यमंत्र्यांच्या परवानगीने एकत्रित पॅनेल उभे करावे, असे आवाहन केले आहे.**

**युवराज पाटील, भैय्या माने यांची मागणी**

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की,दूध उत्पादकांच्या हिताचा विचार करून राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्रपक्षांनी एकत्रितपणे निवडणूक लढवावी, गोकुळमध्ये महायुतीची सत्ता कायम राहील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी या निवडणुकीत एकजूट दाखवण्याची गरज अधोरेखित केली.तसेच या संदर्भात मुख्यमंत्री स्तरावर चर्चा होणार असल्यास हसन मुश्रीफ यांनी हा मुद्दा ठामपणे मांडावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.संयुक्त पॅनेलच्या माध्यमातून दूध उत्पादकांचा विश्वास दृढ करण्यास मदत होईल, असेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# शिरगाव-मुसळवाडी रस्ता दुरुस्तीचे काम सुरु

शिरगाव,ता.२१(प्रतिनिधी)-

**बालिंगा ते दाजीपूर या राज्य मार्गात समावेश असलेल्या शिरगाव - मुसळवाडी दरम्यानच्या नवीन रस्ता बांधणीसाठी नोव्हेंबर महिन्यात अंदाजे दोनशे मिटर रस्त्याची खुदाई करण्यात आली होती. मात्र या परिसरातील शेतकऱ्यांनी संपादीत जमिनीचा योग्य मोबदला मिळावा.या मागणीसाठी या रस्त्याचे काम बंद पाडले होते. सुमारे चार ते साडेचार महिन्याचा काळ लोटला तरी या दुरुस्तीचे काम करण्यात आले नव्हते.**


शिरगाव-मुसळवाडी दरम्यानच्या रस्ता दुरुस्तीचे सुरु असलेल्या कामाचे छायाचित्र.

दै.महासत्ताने १८ एप्रिलच्या अंकात शिरगाव-मुसळवाडी दरम्यानचा रस्ता बनला धोकादायक, या मथळ्याखाली वृत्त प्रसिध्द केले होते. या वृत्ताची दखल घेऊन सार्वजानिक बांधकाम विभागाने या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे प्रवाशी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.नोव्हेंबर महिन्यात शिरगाव ते मुसळवाडी दरम्यान रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरू केले होते. मात्र या परिसरातील शेतकऱ्यांनी आम्हाला विश्वासात न घेता भूसंपादन केल्याचा आरोप करत संपादीत केलेल्या जमिनीचा योग्य मोबदला मिळावा या मागणीसाठी रस्त्याचे काम बंद पाडले होते. या घटनेला सुमारे चार ते साडेचार महिन्याचा कालावधी लोटला तरी रुंदीकरणाचे काम सुरू झाले नव्हते.त्यामुळे फोडलेला रस्ता वाहतूकीसाठी धोकादायक बनला होता.या रस्त्यावरून एकेरी वाहतूक सुरू असल्याने वाहतूकीची कोंडी होत होती. याठिकाणी कोणत्याही प्रकारचे सुचना फलक न लावल्याने रात्री वेळी अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. अशा या पार्श्वभुमीवर प्रवाशी वर्गातून रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी मोठ्या प्रमाणात होत होती. अखेर सार्वजनिक बांधकाम विभागाने सोमवार पासून या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेतल्याने प्रवाशी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

**दै.महासत्ताच्या वृत्ताची दखल**

# 'वानरमारे कुटुंबांना घर कधी? वर्षभरापासून फक्त आश्वासनांचा खेळ'

## स्थलांतर झाले पण ना जमीन, ना घर प्रशासनाचे डोळे कधी उघडणार?

बाजारभोगाव,ता.२१(राम करले)-

**भेगाळलेल्या जमिनीवर तीन दगडांची चूल, कारवीच्या भिंती, तडा गेलेले पत्र्याचे छप्पर आणि कागद-फाट्यांनी झाकलेलं आयुष्य ही आहे, पोंबरे (ता.पन्हाळा) येथील वानरमारे कुटुंबांची वास्तव परिस्थिती. स्वातंत्र्याला ७५ वर्षे उलटली, पण त्यांच्या आयुष्यात अजूनही 'घर' हा शब्द फक्त स्वप्नच आहे.**


उजेडात उघड झालेली गरिबी. घराचं स्वप्न कधी पूर्ण होणार?

पोटाची आग विझवण्यासाठी डोंगरदऱ्यांत भटकंती करणाऱ्या या कुटुंबांचं जीवन आजही अत्यंत हालाखीचं आहे. ना हक्काची जागा, ना सुरक्षित निवारा जणू काही हे लोक आजही विकासाच्या नकाशावरच नाहीत.

मात्र, आशेचा एक किरण तेव्हा दिसला, जेव्हा तत्कालीन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी स्वतः डोंगरात जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांनी ११ कुटुंबांना ५५ गुंठे जमीन आणि मोफत घरे देण्याचा निर्णय घेत यंत्रणा कामाला लावली. प्रशासनाने हालचाली सुरू केल्या, आणि वानरमारे कुटुंबांच्या आयुष्यात 'घर' या स्वप्नाची चाहूल लागली.

तांबटीच्या डोंगरावरून पोंबरे/चव्हाणवाडी वस्तीनजीक तलावाजवळ स्थलांतर करण्यात आले, जेणेकरून मूलभूत सुविधा मिळतील. पण तिथेही आज या कुटुंबांची अवस्था 'ना घर का, ना घाट का' अशीच आहे. स्थलांतर झालं, पण पुनर्वसन अपूर्णच राहिलं. आजही ही कुटुंबं भटकंती, उपासमार आणि असुरक्षिततेच्या छायेत जगत आहेत. शासनाच्या योजनांचा लाभ कागदावरच राहणार का? की खरोखरच या कुटुंबांना न्याय मिळणार? जर आता तरी प्रशासन जागं झालं नाही, तर 'लोकशाही' आणि 'विकास' हे शब्द त्यांच्या दृष्टीने कायमचे पोकळ ठरणार आहेत.

### उजेडात उघड झालेली गरिबी, घराचं स्वप्न कधी पूर्ण होणार?

शासनाने नळपाणी योजनेतून पिण्याच्या पाण्यासाठी टाकी उभारली,तसेच वस्तीपर्यंत वीजही पोहोचवली आहे. हे निश्चितच प्रशासनाचे सकारात्मक पाऊल मानावे लागेल. विकासाची काही किरणे येथे पोहोचली आहेत, हे नाकारता येणार नाही.

मात्र, या विजेच्या प्रकाशात वानरमारे कुटुंबांचा फाटका संसार अधिकच ठळकपणे समोर येतोय. उजेड पडतोय, पण त्यांच्या आयुष्यातील अंधार अजूनही तसाच आहे. पाण्याची टाकी आहे, वीज आहे पण डोक्यावर हक्काचं छप्पर नाही, पायाखाली स्वतःची जमीन नाही! घर आणि जमीन हक्काची कधी मिळणार? आश्वासनांच्या उजेडात हे वास्तव किती दिवस झाकून ठेवणार?

# कामगार संयुक्त कृती समितीच्या वतीने प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**इचलकरंजी ता.२१**

**यंत्रमाग कामगारांना व इतर उद्योगातील कामगारांच्या किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी करा तसेच यंत्रमाग कामगारांच्या तक्रारीबाबत सहा.कामगार आयुक्त कारखानदारांवरती गुन्हे दाखल करीत नाहीत तसेच असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या तक्रारीमध्ये लक्ष न घालणाऱ्या सहा. कामगार आयुक्त व सरकारी कामगार अधिकारी यांची ताबडतोब चौकशी करून बदली करण्यात यावी या व इतर मागण्यांचे निवेदन कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने प्रांताधिकारी दिपक शिंदे यांना देण्यात आले.**



प्रांताधिकारी दिपक शिंदे यांना निवेदन देताना कॉ.दत्ता माने,राजेंद्र निकम,आनंदा गुरव व इतर पदाधिकारी.

सदरचे निवेदन देतेवेळी कॉ. दत्ता माने, आनंदा गुरव, राजेंद्र निकम, हनुमंत लोहार, शिवाजी भोसले, प्रदीप शाहू, राजू जिबटे, सुलतान पटेल इत्यादी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सदरची निवेदन स्वीकारून प्रांताधिकारी दिपक शिंदे यांनी, येत्या २४ एप्रिलला सहा. कामगार आयुक्त व कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे पदाधिकारी यांची बैठक घेऊन संपूर्ण कामकाजाचा अहवाल मागून घेऊ असे आश्वासन कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या शिष्टमंडळास दिले.

# स्टेटसवरून गाडेगोंडवाडीत दोन गटांत तुंबळ हाणामारी

**हळदी ता.२१(प्रतिनिधी)**

**करवीर तालुक्यातील गाडेगोंडवाडी येथे हनुमान जयंतीच्या कार्यक्रमातील वादाचे पर्यावसान सोशल मीडियावरील स्टेटसवरून हाणामारीत झाले.**

सोमवारी रात्री उशिरा दोन गट समोरासमोर आल्याने झालेल्या या राड्यामध्ये दोन्ही बाजूंचे सहाजण जखमी झाले आहेत. याप्रकरणी करवीर पोलिसांनी परस्परविरोधी फिर्यादीवरून सुमारे २५ जणांवर गुन्हे दाखल केले असून परिसरात तणावाचे वातावरण आहे.

गावात हनुमान जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉल्बी पुढे-मागे घेण्याच्या कारणावरून शहाजी पोलीस युवा मंच आणि हनुमान तालिम मंडळ यांच्यात वाद झाला होता. हा वाद मिटण्याऐवजी सोशल मीडियावरील चिथावणीखोर स्टेटसमुळे अधिक चिघळला. यापूर्वी बुडके यांच्या घरी समेट घडवून आणण्याचा प्रयत्न झाला होता, मात्र सोमवारी रात्री पुन्हा एकदा जुन्या वादातून शिवीगाळ झाल्याने दोन्ही गट आमनेसामने आले.

# संघर्षातून समृध्दीकडे नेणारे नेतृत्व : लोकनेते संजयबाबा घाटगे

**कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणात आणि समाजकारणात ज्या काही मोजक्या नेत्यांनी आपल्या कर्तृत्वाने आणि संघर्षाने शून्यातून विश्व निर्माण केले, त्यामध्ये माजी आमदार संजयबाबा घाटगे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. संजयबाबांचा प्रवास म्हणजे धगधगत्या संघर्षातून फुललेली एक लोकशाहीची पताकाच आहे. केवळ सत्ता मिळवणे हा त्यांचा कधीच उद्देश नव्हता; तर ज्यांच्या पदरी कायम उपेक्षा आली, अशा दीनदलितांच्या डोळ्यांतील पाणी पुसणे आणि राबणाऱ्या बळीराजाच्या आयुष्यात सुखाची पहाट आणणे हेच त्यांच्या जीवनाचे अढळ व्रत राहिले आहे. सामान्यांच्या प्रश्नासाठी अहोरात्र धडपडणारा हा लोकनेता म्हणजे केवळ एक राजकीय व्यक्तिमत्व नसून, हजारो कुटुंबांचा आधारवड आणि समृद्धीचा मार्गदाता आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या अष्टपैलू कार्याचा थोडक्यात आढावा...**

**श्री अन्नपूर्णा योजना : पांढऱ्या पट्ट्यातील हरितक्रांतीचे जनक**

कागल तालुक्यातील साके,व्हनाळी,केनवडे,गोरंबे हा भाग एकेकाळी पाण्यासाठी तहानलेला होता. या पांढऱ्या पट्ट्याचे नंदनवन करण्याचे स्वप्न संजयबाबांनी पाहिले आणि ते प्रत्यक्षात उतरवले. श्री अन्नपूर्णा पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून त्यांनी या भागातील पाच हजार एकर जमिनीला शाश्वत पाणी उपलब्ध करून दिले. ज्या जमिनी पावसाच्या पाण्यावर अवलंबून होत्या, तिथे काटेरी गवतही उगवत नव्हते.आज त्याच ठिकाणी हिरव्यागार ऊसाची पिके डोलत आहेत. ही योजना केवळ पाणीपुरवठा योजना नसून या भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक क्रांतीची जीवनवाहिनी ठरली आहे.

**शिक्षणाची दारे केली खुली**

ग्रामीण भागातील गुणवत्ता असूनही केवळ सोयींअभावी मागे राहू नये, यासाठी बाबांनी शिक्षणाचे जाळे विणले. हायस्कूल, प्रायमरी स्कूल आणि तांत्रिक शिक्षणासाठी आयटीआयची उभारणी करून त्यांनी ग्रामीण युवकांच्या हाताला कौशल्य दिले. आज या संस्थांमधून शिकलेले विद्यार्थी विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत असून, बाबांनी लावलेल्या या ज्ञानवृक्षाची फळे आज समाज चाखत आहे.



**सहकारातून आर्थिक सक्षमीकरण**

शेतकरी हा केवळ शेतीवर अवलंबून न राहता तो आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, यासाठी संजयबाबांनी सहकाराचा आधार घेतला. विविध दूध संस्था, विकास सेवा संस्था आणि पतसंस्थांची उभारणी करून त्यांनी शेतकऱ्यांना आणि कष्टकऱ्यांना भांडवल उपलब्ध करून दिले. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवी उभारी मिळाली आणि सामान्यांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा झाला.

**अन्नपूर्णा शुगर : शेतकऱ्यांचा हक्काचा आधार**

शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकवलेला ऊस वेळेत जावा आणि त्याला योग्य दर मिळावा, या तळमळीतून त्यांनी अन्नपूर्णा शुगर अँड जॅगरी वर्क्स या कारखान्याची उभारणी केली. या प्रकल्पामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची चिंता तर मिटलीच, पण त्यासोबतच हजारो स्थानिक युवकांच्या हाताला सन्मानाचा रोजगार उपलब्ध झाला. एका नेत्याने पाहिलेल्या स्वप्नातून हजारो कुटुंबे आज स्थिरावली आहेत.

**कुटुंबाची साथ आणि सामान्य कार्यकर्त्यांना संधी**

संजयबाबांच्या या प्रदीर्घ प्रवासात त्यांना कुटुंबाची खंबीर साथ लाभली आहे. जनतेने त्यांच्या कार्यकर्तृत्वावर विश्वास दाखवत त्यांच्या पत्नी सौ. अरुंधती घाटगे व चिरंजीव अंबरिषसिंह घाटगे यांना गोकुळमध्ये संचालक म्हणून सेवा करण्याची संधी दिली. तसेच, त्यांच्या स्नुषा सौ. सुयशा अंबरिषसिंह घाटगे यांनीही जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत उच्चांकी मताधिक्य मिळवून दुसऱ्यांदा विजय संपादन केला, जे त्यांच्या जनसंपर्काचे प्रतीक आहे.

विशेष म्हणजे, बाबांनी केवळ घराणेशाहीला महत्त्व न देता आपल्या निष्ठावान कार्यकर्त्यांनाही सत्तेची पदे मिळवून दिली. बिद्री साखर कारखाना, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती,जिल्हा परिषद,पंचायत समिती यांसारख्या महत्त्वाच्या संस्थांमध्ये सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी देऊन त्यांनी नेतृत्व घडवणारा नेता अशी आपली ओळख निर्माण केली आहे. २००७ मध्ये त्यांनी दलित समाजातील नानासो कांबळे (साके) यांना जिल्हा परिषद सदस्य त्यानंतर आता कोल्हापूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष केले. वंदूर येथील दयानंद कांबळे यांना जिल्हा परिषद सदस्य केले. त्यांच्या पत्नी कल्पना दयानंद कांबळे यांना पंचायत समिती सदस्य म्हणून संधी दिली. सांगाव येथील वैशाली आवळे यांना जिल्हा परिषद सदस्यपद, अर्जुनी येथील आनंदी कांबळे यांना कागल पंचायत समितीवर सभापती, तर २०२६ मध्ये सांगाव पंचायत समितीवर तेजस्विनी भोरे यांना सदस्य म्हणून संधी दिली आहे.

**संघर्षातून उभे राहिलेले नेतृत्व**

संजयबाबांचा प्रवास हा संघर्षाचा आहे. राजकारणातील गट-तटाच्या पलीकडे जाऊन त्यांनी नेहमीच विकासाला प्राधान्य दिले. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी रस्त्यावरची लढाई असो किंवा विधिमंडळातील अभ्यासपूर्ण मांडणी, बाबांनी नेहमीच सामान्यांचा आवाज म्हणून भूमिका बजावली आहे. कार्यकर्त्याला जीवापाड जपणारा आणि जनतेच्या प्रश्नावर संवेदनशील असणारा हा नेता आजही तितक्याच उत्साहाने जनसेवेत कार्यरत आहे.

**भाजप पक्षाला उभारी**

संजयबाबा घाटगे यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केल्यापासून त्यांनी कागल तालुक्यात भाजप सदस्य नोंदणी,पक्षाच्या वतीने सक्षम कार्यकर्ता कार्यशाळा, विविध मंडल निवडी करून भाजपाच्या विविध योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यास सुरूवात केल्याने तालुक्यात भाजप पक्षाला उभारी मिळत आहे. पांढऱ्या पट्ट्यात हरितक्रांती घडवणारा, सहकाराचा कणा मजबूत करणारा आणि शिक्षणाची गंगा घराघरात पोहोचवणारा हा लोकनेता म्हणजे कागलच्या विकासाचे चालते-बोलते विद्यापीठ आहे.अशा या दूरदृष्टीच्या लोकनेत्याला ७३ व्या वाढदिवसानिमित्त उदंड आयुष्य लाभो, हीच आई अंबाबाई आणि श्री अन्नपूर्णा देवीच्या चरणी प्रार्थना!

**शब्दांकन :**
**बाजीराव पाटील (केनवडे)**
व्हा.चेअरमन - अन्नपूर्णा पंत संस्था

# पान शॉप चालकास दगडाने मारहाण

**सांगली, ता. २१( प्रतिनिधी)**

**दारु देण्यास पैसे नसल्याचे सांगितल्याचा राग आल्याने चौघांनी एका पान शॉपचालकास दगडाने मारहाण करुन गंभीर जखमी केले. गोकुळनगर येथील स्वस्तिक कट्टा परिसरात ही घटना घडली.**

यामध्ये फिर्यादी मच्छिंद्र आनंदराव माने (रा. खेराडकर पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, चैतन्य नगर, संजनगर) हे जखमी झाले आहेत. याप्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

फिर्यादी माने यांचे पान शॉपचे दुकान आहे. मंगळवारी सकाळच्या सुमारास त्यांच्याकडे गौरव सुर्वे, चिक्या, वरद आणि निखील कांबळे (सर्व रा. शिवाजीनगर, सांगली) असे चौघेजण आले. त्यांनी माने यांच्याकडे दारुची मागणी केली. मात्र, माने यांनी संशयितांना त्याच्याकडे पैसे नसल्याचे सांगितले. याचा राग आल्याने संशयितांनी माने यांना शिवीगाळ केली. यानंतर झालेल्या वादावादीतून चौघांनी माने यांना लाथाबुक्कयांनी मारहाण केली.

संशयित चिक्या याने माने यांना कपाळावर दगडाने हल्ला चढविला. मारहाणीत मच्छिंद्र माने गंभीर जखमी झाले. यानंतर संशयितांनी घटनास्थळावरुन पलायन केले.

# धारदार शस्त्राने हल्ला : चौघांवर गुन्हा

**मिरज,ता.२१(प्रतिनिधी)**

**मिरजेतील कमान वेस परिसरात धारदार शस्त्राने हल्ला करून एका व्यक्तीस गंभीर जखमी केल्याची घटना १९ रोजी रात्री अकराच्या सुमारास घडली.**

उदय माने (रा. गणेश तलाव परिसर, मिरज) असे जखमीचे नाव असून त्यांच्यावर मिरज शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी त्याची पत्नी आरती माने यांनी मिरज शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पिट्या उर्फ पृथ्वीराज भोरे, रुद्र भोरे, प्रथमेश तांदळे आणि प्रवीण (पूर्ण नाव उपलब्ध नाही) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, किरकोळ वादातून आरोपींनी माने यांच्यावर जीवघेणा हल्ला केला.

यामध्ये धारदार शस्त्राने वार तसेच दांडक्याने मारहाण करण्यात आली. सर्व आरोपी हे पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# सुरेश हाळवणकरांना विधान परिषदेवर संधी द्यावी

## नाना जाधव

**पेठ वडगाव,ता.२१ (प्रतिनिधी)**

**माजी आमदार व भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर यांना तात्काळ विधान परिषदेवर आमदार म्हणून संधी द्यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते नाना जाधव यांनी सोमवारी वडगाव येथे माध्यम प्रतिनिधींशी बोलताना केली.**

जाधव बोलताना म्हणाले, नगरसेवक, आमदार, भाजपचा जिल्हाध्यक्ष, प्रदेशउपाध्यक्ष अशा पदांवर काम करताना हिंदुत्ववादी संघटन वाढीबरोबर भाजप पक्ष संघटना बळकट करण्यात हाळवणकरांनी योगदान दिले. भाजपच्या अडचणीच्या काळात भारतीय जनता पार्टी त्यांनी रुजवली, वाढवली. दहा वर्षे आमदार असताना पक्ष संघटना मजबूत त्यांनी केली. मतदारसंघातले अनेक प्रश्न सोडवले. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत जी भारतीय जनता पार्टीची भूमिका तीच आपली असे त्यांनी मानले. या नेत्यावर अन्याय होतोय, अशा भावना आज भारतीय जनता पार्टीच्या जुन्या कार्यकत्यांमध्ये आहे. तात्काळ त्यांना विधान परिषदेवर संधी द्यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , भाजपाचे प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.

# गोळीबार प्रकरणी आरोपींना खणभागात फिरवले

**सांगली, ता. २१ (प्रतिनिधी )-**

**शहरातील राम मंदिर चौकातील पंचमुखी मारुती रस्ता परिसरात गोळीबार करणारा सराईत गुन्हेगार टोल्या ऊर्फ प्रफुल्ल अरुण पोतदार (सम्राट व्यायाम मंडळाजवळ) याच्यासह तिघांना मंगळवारी बेड्या ठोकून खणभागात फिरवण्यात आले. टोल्यासह दिलावर ईलाही जमादार (सम्राट व्यायाम मंडळजवळ ), सुधीर ऊर्फ कांचा माळी (शामरावनगर) या दोघांचा त्यात समावेश होता.**

संशयित टोल्या, दिलावर व कांचा हे राममंदिरजवळील पंचमुखी मारुती रस्ता परिसरात शुक्रवारी (ता. १७) थांबले होते. त्यावेळी नीलेश प्रमोद जाधव, त्याचा आतेभाऊ अजय माने हे तेथे आले. अजय हा टोल्याच्या मुलाच्या वाढदिवसाला आला नसल्याच्या निमित्ताने दोघांत वादावादी झाली. वाद टोकाला गेल्यानंतर अजय माने याला 'जिवंत सोडणार नाही', अशी धमकी टोल्याने दिली आणि दिलावरच्या कमरेला लावलेले पिस्तूल काढत हवेत गोळी झाडली. त्याचवेळी दिलावर कोयता घेऊन आला. टोल्याने अजयच्या दिशेने पिस्तूल रोखले. त्यावेळी नीलेश त्यांना रोखण्यासाठी गेला. तेव्हा, नीलेशवर गोळीबार करण्यात आला. गोळी नीलेश याच्या गुडघ्याखाली लागून तो जखमी झाला. त्यानंतर टोल्या व साथीदारांनी पळ काढला. शहर पोलिसांनी पाठलाग करत टोल्यासह तिघांना जेरबंद केले. तिघेही पोलिस कोठडीत आहेत. मंगळवारी त्या तिघांना घटनास्थळी फिरवण्यात आले होते. पोलिस निरीक्षक अरुण सुगांवकर, उपनिरीक्षक सागर होळकर यांच्यासह गुन्हे प्रकटीकरणचे पोलिस यावेळी होते.

# गुडाळात चोरट्यांनी सहा घरे फोडली

## परिसरात भीतीचे वातावरण

**शिरगाव,ता.२१(प्रतिनिधी )**

**राधानगरी तालुक्यातील गुडाळ येथे अज्ञात चोरट्यांकडून रात्री सहा बंद घरांना लक्ष्य करत धाडसी घरफोडी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे गावात आणि या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.**

गुडाळ येथील आशिष पाटील (पत्रकार), विजय माने (पोलीस) प्रकाश पाटील, बाबुराव चौगले, प्रकाश माळवी, एस. बी. पाटील यांच्या घरांमध्ये हा चोरीचा प्रकार झाला असून तसेच अमोल माळवी यांची मोटरसायकलही चोरीला गेली आहे.

गावातील काही कुटुंबे बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरांवर डल्ला मारला आहे. घरात कोणी नसल्याची खात्री करून चोरट्यांनी कडी-कोयंडे तोडून आत प्रवेश केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानंतर घरातील कपाटे उचकटून सोने-चांदीचे दागिने तसेच रोकड रक्कम लंपास केली आहे. चोरीची ही घटना सकाळी उघडकीस आली, जेव्हा घरमालक परतल्यानंतर घरातील सामान अस्ताव्यस्त अवस्थेत आढळले.



या घटनेची माहिती मिळताच राधानगरी पोलीस ठाण्याचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. त्यांनी पंचनामा करून तपासाची चक्रे फिरवण्यास सुरुवात केली आहे. प्राथमिक तपासात ही चोरी पूर्वनियोजित असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. तसेच, सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून संशयितांचा शोध सुरू आहे.

दरम्यान,या चोरीच्या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत असून रात्रीच्या वेळी पोलीस गस्त वाढवावी अशी मागणी होत आहे.


जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१ दि. १८/१०/२०२३

**परिशिष्ट - ३**

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग,
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय
पत्ता:- सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६००३
ई-मेल:- eemdkop@gmail.com दुरध्वनी क्र.:-(०२३१) २६५१२८

**ई-निविदा सुचना क्र. १०/२ सन २०२५-२०२६ (तृतीय वेळ)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे खाली नमूद केलेल्या कामाचा पुर्वानुभव असलेल्या सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ब- १ नमुन्यात (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. शासन जलसंपदा विभाग निर्णय क्र. संकीर्ण/१११७/प्र.क्र.१०४/१७ यांत्रिकी, दि. १४/०३/२०१८ अन्वये ''निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही.'' निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ enders.gov.inhttp://mahat येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| | |
|---|---|
| *कामाचे नाव :-* | उप अभियंता, यांत्रिकी उपविभाग क्र. ०४, कोल्हापूर या उपविभागाकडील संयंत्राचे/वाहनांचे परीचलना करीता आवश्यक मनुष्यबळाचे (जडयंत्रचालक, हलके वाहनचालक, मदतनीस, जोडारी, विजतंत्री इ.) यांची वार्षिक सेवा बाह्य अभिकरणामार्फत पुरविणे बाबत. |
| जिल्हा :- | कोल्हापूर |
| निविदेची अंदाजित किंमत रुपये :- | रु. ८३,१०,८२०/- (रु. त्र्याऐंशी लक्ष दहा हजार आठशे वीस रुपये फक्त) (वस्तु व सेवाकर व विमा वगळून) |
| ऑनलाईन कोऱ्या निविदा संच विक्री कालावधी :- | दिनांक :- २२/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पासुन<br>दिनांक :- २९/०४/२०२६ रोजी सायंकाळी १७.४५ वा. पर्यंत |
| ऑनलाईन भरलेल्या निविदा सादर करणेचा कालावधी :- | दिनांक :- २२/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पासुन<br>दिनांक :- २९/०४/२०२६ रोजी सायंकाळी १७.४५ वा. पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडणेचा कालावधी :- | दिनांक :- ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. (शक्य झाल्यास) |

खालील ठिकाणी निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ :- www.mahayantriki.org and www.wrd.maharashtra.gov.in
२) सदर निविदेसुचनेमध्ये / निविदेमध्ये काही बदल होत असल्यास असे बदल फक्त या कार्यालयाचे सूचना फलकावर आणि वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील (वृत्तपत्रात प्रसिध्द केले जाणार नाही.)
३) सदर निविदेमधील अटी व शर्तींची पुर्तता निविदाकारांकडुन न झाल्यास सदरील निविदा सुचना तृतीय वेळ मागणीसाठी उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील (वृत्तपत्रात प्रसिध्द केले जाणार नाही.)
४) निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही.
५) ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकारांकडून निविदा छापील प्रतीच्या (हार्ड कॉपी) स्वरुपात स्विकारली जाणार नाही.
६) निविदाकारासमवेत निविदा पूर्व बैठक (Pre-Bid Conference) लागू नाही.
७) निविदाकारांनी कागदपत्रे अपलोड/सादर करताना निविदा प्रत स्कॅन करुन इतर कागदपत्रामध्ये अपलोड करु नये.
८) कार्यारंभ आदेश दिल्यानंतर निविदाकारामार्फत सादर होणाऱ्या देयकासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे खोटी आढळल्यास त्यासाठीही संबंधीत निविदाकार भारतीय दंड संहिता व माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील कलमाप्रमाणे कारवाईस पात्र राहतील. अशा निविदेतील कामे प्रारंभिक स्तरावर असल्यास निविदा रद्द केली जाईल व निविदाकारास काळया यादीत टाकणेत येईल.

जा.क्र.यांविको/लेशा-१/८८८/सन२०२६
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय,
दि.१७-०४-२०२६

सही/-
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी विभाग, कोल्हापूर

**विमाका/कोल्हापूर/१७/२०२६-२०२७**


# टोळक्याकडून युवकावर हल्ला;

## आठ जणांविरुद्ध गुन्हा

**मिरज,ता.२१(प्रतिनिधी)**

**मिरजेत तानाजी चौक परिसरात आठ जणांच्या टोळक्याने एका युवकावर कोयता व वीट मारून हल्ला केल्याची घटना घडली. रात्री बारा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली असून यश पालेकर (वय १९, रा. लाल नगर, मिरज) हा युवक जखमी झाला आहे.**

याप्रकरणी मिरज शहर पोलिसांनी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, पालेकर हा मित्राला भेटून घरी परतत असताना आरोपींनी त्याला अडवून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर कोयत्याने वार करून व डोक्यात वीट मारून गंभीर जखमी केले. सार्थक, अरुण गोसावी, विनायक ढंग, श्लोक गोसावी, रोहित, आर्यन नाईक, करण गोसावी आदी आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

# रुई बंधाऱ्यावर बुडालेल्या युवकाचा अखेर मृतदेह सापडला

**हातकणंगले,ता.२१(प्रतिनिधी):**

**रुई (ता. हातकणंगले) बंधारा येथे पोहण्यासाठी गेलेल्या १७ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. सोमवारी दुपारी पाण्यात बेपत्ता झालेल्या या युवकाचा मृतदेह मंगळवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पाण्यावर तरंगताना आढळून आला.**

तोहीद हनीफ पठाण (वय १७, रा. रेणुका नगर, यड्राव फाटा, इचलकरंजी) हा आपल्या मित्रांसह सोमवारी दुपारी रुई बंधारा येथे पोहण्यासाठी गेला होता. त्यावेळी पाण्यात उडी मारल्यानंतर ''मी पुढे मोहरीच्या दिशेने पोहून येतो'' असे सांगून तो पुढे गेला. मात्र काही वेळानंतर तो परत वर आला नसल्याचे लक्षात आले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांच्या मदतीने शोधकार्य सुरू करण्यात आले. रुई बंधाऱ्याजवळ पाण्याचा वेग अधिक असल्यामुळे अशा घटनांमध्ये मृतदेह पाण्याच्या प्रवाहासोबत दत्तवाड, नृसिंहवाडी या परिसरात वाहून जाण्याची शक्यता असते. मात्र, पाण्याचा प्रवाह कमी करण्यात आल्याने संबंधित युवकाचा मृतदेह बंधाऱ्याजवळच आढळून आला.

# शेतीच्या वादातून मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**मिरज,ता.२१(प्रतिनिधी)**

**मिरज तालुक्यातील संतोषवाडी येथे शेतजमिनीच्या वादातून दांडक्याने मारहाण करून एका व्यक्तीस जखमी केल्याची घटना सायंकाळी साडेआठच्या सुमारास घडली.**

सचिन घोडके (वय ३८, रा. मंगसुळी, ता. कागवाड) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार किरण घोडके व अश्विनी घोडके (रा. संतोषवाडी) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, शेतातील वीज जोडणीच्या कारणावरून वाद निर्माण झाला. यावेळी आरोपींनी शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने हातावर मारहाण केली तसेच पुन्हा शेतात आल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी दिली. घटनेनंतर जखमीवर उपचार करण्यात आले असून मिरज ग्रामीण पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# संत निरंकारी मिशनतर्फे शुक्रवारी रक्तदान शिबिर

**सांगली दि.२१ (प्रतिनिधी)**

संत निरंकारी मिशनतर्फे 'मानव एकता दिवस' श्रद्धा व सेवा भावनेत साजरा करण्यात येणार आहे. बाबा गुरबचन सिंह जी यांच्या स्मृतीनिमित्त हा उपक्रम आयोजित केला जात आहे. शुक्रवारी (दि.२४) एप्रिल सांगलीतील संत निरंकारी सत्संग भवन येथे दुपारी २ ते रात्री ८.३० वाजेपर्यंत रक्तदान शिबिर होणार आहे. सायंकाळी ६ ते ९ या वेळेत सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रचारक विरेंद्र बामणे उपस्थित राहणार आहेत.


**महावितरण** | **ई-निविदा**

म. रा.वि.वि.कं.मर्या. जयसिंगपूर विभागीय कार्यालय अंतर्गत पाच उपविभागातील लघुदाब वाहिनी (LT) व उच्चदाब वाहिनी (HT) यामधील देखभाल दुरुस्ती (प्रिव्हेन्टीव्ह मेनटेनन्स) कामासाठी रु.१० लक्ष प्रत्येकी याप्रमाणे ई-निविदा क्र. टी-०४ ते टी-१३/२०२६-२७ महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आली आहे. सदर निविदा विक्रीसाठी २२.०४.२०२६ पासून २८.०४.२०२६ पर्यंत उपलब्ध राहील. सदर निविदा संकेतस्थळावर २८.०४.२०२६ वेळ १८: ०० पर्यंत उपलब्ध राहील. वरील प्रत्येक निविदेस ई.एम.डी. १००००/- व प्रत्येकी टेंडर फ़ी ११८०/- आहे.

कार्यालयीन संपर्क क्र- ७८७५७६९३५५

पी.आर.ओ. - २४ /२०२६-२७ — कार्यकारी अभियंता, जयसिंगपूर







आयसीसी महिला टी २० क्रमवारी

## शफाली अव्वल पाचमध्ये स्थान मिळवण्याच्या जवळ

नवी दिल्ली,ता.२१-

**भारतीय महिला संघाची फलंदाज शफाली वर्मा आयसीसी टी आंतरराष्ट्रीय क्रमवारीत अव्वल पाच फलंदाजांमध्ये स्थान मिळवण्याच्या अधिक जवळ पोहोचली आहे. भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने दोन स्थानांची झेप घेतली असून ती अव्वल १० मध्ये प्रवेश करण्याच्या मार्गावर आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पाच सामन्यांची टी आंतरराष्ट्रीय मालिका सुरू असून, या मालिकेतील कामगिरीच्या आधारावर दोन्ही देशांच्या खेळाडूंनी क्रमवारीत प्रगती केली आहे.**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या शेफालीच्या प्रभावी कामगिरीमुळे फलंदाजी क्रमवारीत तिने दोन स्थानांची झेप घेत सहावे स्थान पटकावले आहे. स्मृती मंधाना भारताची अव्वल क्रमांकाची फलंदाज कायम आहे. पण ती एक स्थान घसरून चौथ्या स्थानावर आली आहे. हरमनप्रीत कौरनेही दोन स्थानांची झेप घेत संयुक्तपणे ११वे स्थान मिळवले आहे. तिने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टी आंतरराष्ट्रीय सामन्यात नाबाद ४७ धावा केल्या होत्या.

कर्णधार लॉरा वॉल्व्हार्डने आपले पाचवे स्थान कायम राखले, तर ॲनेरी डर्कसेनने १८ स्थानांची झेप घेत ३३ वे स्थान पटकावले. सुने लुस ३५ व्या स्थानावर पोहोचली. गोलंदाजांमध्ये सादिया इक्बाल अव्वल स्थानी कायम आहे.



# टीम इंडिया अफगाणशी भिडणार

## गिल-बुमराहला विश्रांती मिळू शकते, टेस्टमध्ये नवीन खेळाडूंना संधी मिळणार

नवी दिल्ली,ता.२१-

**अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात शुभमन गिल आणि जसप्रीत बुमराह यांना विश्रांती दिली जाऊ शकते. ३१ मे रोजी आयपीएल २०२६ चा अंतिम सामना आहे आणि भारतीय संघाचे आंतरराष्ट्रीय वेळापत्रक व्यस्त आहे. कार्यभाराच्या व्यवस्थापनामुळे काही खेळाडूंना विश्रांती मिळू शकते.**

तर, हर्ष दुबे, आकिब नबी आणि देवदत्त पडिक्कल यांना संधी मिळू शकते. अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीने गोलंदाजीत सुधारणा केली आहे, त्यामुळे त्याच्या नावावर चर्चा आहे. निवड समिती घाई करण्याऐवजी वैद्यकीय संघाच्या सल्ल्यानुसार निर्णय घेईल.

आयपीएल २०२६ चा अंतिम सामना ३१ मे रोजी आहे, तर अफगाणिस्तानविरुद्धची कसोटी ६ जूनपासून सुरू होईल. दोघांमध्ये फक्त ५-६ दिवसांचे अंतर आहे. व्यवस्थापन खेळाडूंचा थकवा आणि दुखापतीचा धोका याबाबत गंभीर आहे. नियमित कसोटी खेळाडूंचे आयपीएल संघ कोणत्या टप्प्यापर्यंत पोहोचतात, हे निवडकर्ते पाहतील.

**वरिष्ठ खेळाडू बाहेर होऊ शकतात**

अफगाणिस्तानविरुद्धच्या या एकमेव कसोटीत युवा खेळाडूंना संधी दिली जाऊ शकते.सूत्रांनुसार, निवडकर्ते आणि व्यवस्थापन स्टार खेळाडूंना एकदिवसीय किंवा इंग्लंड मालिकेसाठी ताजेतवाने ठेवू इच्छितात. व्यवस्थापनाचे मत आहे की बुमराहसारख्या महत्त्वाच्या गोलंदाजाला अशा सामन्यात उतरवणे धोकादायक ठरू शकते.

**मुल्लनपूर कसोटीत नवीन चेहरे दिसू शकतात**

६ जूनपासून मुल्लनपूरमध्ये सुरू होणाऱ्या कसोटीसाठी निवडकर्ते देशांतर्गत क्रिकेटवर लक्ष ठेवून आहेत. वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती मिळाल्यास युवा खेळाडूंना पदार्पणाची संधी मिळू शकते. इंडिया-ए चे वेगवान गोलंदाज गुरनूर बराड आणि डावखुरे फिरकीपटू मानव सुथार शर्यतीत आघाडीवर आहेत.

**अफगाणिस्तान आणि भारत यांच्यात ४ एकदिवसीय सामने झाले, ते सर्व मल्टीनेशन स्पर्धांमध्ये. आशिया कपमध्ये २ सामने झाले, १ भारताने जिंकला आणि २०१८ मध्ये एक बरोबरीत सुटला. २०१९ आणि २०२३ च्या विश्वचषकातही २ सामने झाले, दोन्ही भारताने जिंकले. दोघांमध्ये पहिल्यांदाच एकदिवसीय मालिका होईल.**

**जून ते जुलैपर्यंत सलग मालिका**

भारतीय संघाचा जून महिना व्यस्त आहे. अफगाणिस्तानविरुद्ध कसोटी आणि एकदिवसीय सामन्यानंतर संघ आयर्लंडविरुद्ध टी-२० मालिका खेळेल. त्यानंतर इंग्लंड दौरा असेल, जिथे ३ टी-२० आणि ३ एकदिवसीय सामने होतील. त्यानंतर २३ जुलैपासून झिम्बाब्वेविरुद्ध ३ टी-२० सामने सुरू होतील.

# अभिषेकचे तुफानी शतक अन् हैदराबादची विजयाची हॅट्ट्रिक



हैदराबाद,ता.२१-

**सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात आयपीएल २०२६ मधील सामना रंगला. दिल्लीने नाणेफेक जिंकून प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या हैदराबादने तब्बल दोन विकेट्स गमावून २४२ धावांचा डोंगर उभारला. अभिषेक शर्माने एकट्याने १३५ नाबाद धावा केल्या. याउलट दिल्लीच्या संघाला १९५ इतक्या धावा करता आल्या आणि सामना हैदराबादने ४७ धावांनी जिंकला.**

आयपीएल २०२६ चा ३१ वा सामना २१ एप्रिल रोजी खेळला गेला,ज्यामध्ये सनरायझर्स हैदराबादचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी झाला. हैदराबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सला दारुण पराभव पत्करावा लागला. यजमान हैदराबादने दिल्ली कॅपिटल्सला ४७ धावांनी पराभूत करून या हंगामातील आपला चौथा विजय नोंदवला. तर मागील दोन सामन्यात जिंकल्यानंतर याही सामन्यात जिंकल्यामुळे विजयी हॅटट्रिकही पूर्ण केली आहे. यामुळे हैदराबाला गुणतालिकेत चौथ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर झेप घेण्यास मदत झाली. हैदराबादने तिसऱ्या स्थानावर झेप घेतल्यामुळे राजस्थानचें नुकसान झाले आहे. कारण याआधी राजस्थानचा संघ तिसऱ्या क्रमांकावर होता.

तत्पूर्वी, दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना सनरायझर्स हैदराबादच्या फलंदाजांनी जोरदार प्रभाव पाडला. अभिषेक शर्माच्या धडाकेबाज शतकामुळे हैदराबादने २० षटकांत २ गडी गमावून २४२ धावा केल्या. अभिषेक शर्माने ६८ चेंडूंमध्ये १० चौकार आणि १० षटकारांसह १३५ धावांची नाबाद खेळी केली. ट्रॅव्हिस हेड आणि हेनरिक क्लासेन यांनी प्रत्येकी ३७ धावांचे योगदान दिले. कर्णधार इशान किशनने २५ धावा केल्या. हैदराबादकडून गोलंदाजी ईशान मलिंगा आणि हर्ष दुबेने चांगली कामगिरी केली. ईशान आणि हर्षने प्रत्येकी तीन विकेट काढल्या. दिशान मदुशंका आणि साकिब हुसैनला प्रत्येकी एक विकेट काढता आली.

दिल्ली कॅपिटल्सकडून सर्वाधिक ५७ धावा नितीश राणाने केल्या. ट्रिस्टन स्टबस(२७), समीर रिझवी(४१), के .एल. राहुल(३७), आशुतोष शर्मा(१४) धावा करता आल्या. इतर फलंदाजाने दुहेरी आकडाही गाठटा आले नाही. अक्षर पटेलला एक विकेट मिळाली.



# 'चेन्नई'चा आयुष म्हात्रे दुखापतीमुळे बाहेर

नवी दिल्ली, ता.२१-

**आयपीएल २०२६ दरम्यान चेन्नई सुपर किंग्सला मोठा धक्का बसला आहे. फॉर्मात असलेला युवा फलंदाज आयुष म्हात्रे हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडला आहे. फ्रँचायझीने एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे, १८ एप्रिल रोजी सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात फलंदाजी करताना आयुष म्हात्रेच्या डाव्या हॅमस्ट्रिंगला दुखापत झाली. त्याला सहा ते १२ आठवड्यांच्या पुनर्वसनाची आवश्यकता असेल. आम्ही त्याच्या शीघ्र आरोग्यासाठी शुभेच्छा देतो.**

सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्या दरम्यान धावताना म्हात्रेच्या हॅमस्ट्रिंगला ताण आला. दुसरी धाव घेताना तो वेदनेने खाली बसला, त्यानंतर फिजिओ तात्काळ मैदानावर पोहोचला. मात्र, तो मैदान सोडून गेला नाही आणि फलंदाजी करत राहिला, पण काही चेंडूंनंतर तो बाद झाला.

आयुष म्हात्रे या मोसमात सीएसकेचा सर्वोत्तम फलंदाज ठरला आहे. जवळपास प्रत्येक सामन्यात त्याने उच्च स्ट्राइक रेटने धावा केल्या आणि संघाला मोठी धावसंख्या उभारण्यास मदत केली. त्याचा फॉर्म सीएसकेसाठी पुढेही महत्त्वाचा ठरला असता. मात्र, तो आता संघाबाहेर गेला असून, हा संघासाठी एक मोठा धक्का आहे.



सामन्यानंतर सीएसकेचे फलंदाजी प्रशिक्षक मायकल हसी यांनी दुखापतीबद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, हॅमस्ट्रिंग फाटली आहे. दुखापतीची तीव्रता अद्याप कळलेली नाही, पण ती खूप गंभीर दिसते. तो चांगल्या फॉर्ममध्ये असल्याने हे आमच्यासाठी मोठे नुकसान आहे. तो एक उत्कृष्ट युवा क्रिकेटपटू आहे. पण, यामुळे दुसऱ्या क्रिकेटपटूला संधी मिळेल. आमच्याकडे असे अनेक चांगले क्रिकेटपटू आहेत. ज्यांना अद्याप संधी मिळालेली नाही.

या हंगामात दुखापतीमुळे संघाबाहेर गेलेला आयुष म्हात्रे हा सीएसकेचा तिसरा क्रिकेटपटू आहे. खलील अहमद आणि नॅथन एलिस हे देखील संघाबाहेर आहेत. माजी कर्णधार एम.एस. धोनी देखील पोटरीच्या दुखापतीतून सावरत असल्याने एकही सामना खेळलेला नाही.

**सीएसकेची ताकद दुपटीने वाढली!**

एमएस धोनी दुखापतीतून पूर्णपणे सावरलेला नाही. डेवाल्ड ब्रेव्हिने पुनरागमन केल्यानंतर आता आयुष म्हात्रे ३ आठवड्यांसाठी बाहेर झाला आहे. दुखापतीच्या धक्क्यांनंतर आता चेन्नईला दिलासा देणारी बातमी समोर आली आहे.ऑस्ट्रेलियाचा स्टार गोलंदाज संघासोबत जोडला गेला असून तो लवकरच खेळताना दिसू शकतो.

चेन्नई सुपर किंग्ज संघातील गोलंदाज नॅथन एलिस दुखापतग्रस्त झाल्यानंतर त्याची रिप्लेसमेंट म्हणून स्पेंसर जॉन्सनला संधी दिली गेली होती. तो २० एप्रिलला संघासोबत जोडला जाणार असल्याची माहिती दिली गेली होती. आता त्याने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून स्टोरी शेअर करून चेन्नईच्या ताफ्यात दाखल झाल्याची बातमी दिली आहे. त्याने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये तो चेन्नईतील एमएस धोनीच्या ७ पॅडेल ब्रँडजवळ असल्याचे दिसून येत आहे.



**आयुष्यच सर्कस....**

**इचलकरंजी - चेहऱ्यावर सुरकुत्या, दुसऱ्याला हसवता हसवता डोळ्यात पाणी, स्वतःच्या चेहऱ्यावर रंग रंगोटी करून स्वतःचं दुःख विसरून दुसऱ्याला आनंद देण्याचा प्रयत्न करत असतो, हेच माझं आयुष काय? पद्माकर खुरपे यांनी स्टेशन रोडवरील गोल्डन सर्कस मध्ये टिपलेले छायाचित्र.**



## शिवाजी स्पोर्ट्स अकॅडमीचे फुटबॉल प्रशिक्षण शिबिर उत्साहात प्रारंभ

कोल्हापूर, ता.२१ (प्रतिनिधी)-

**शिवाजी स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने १२ ते १६ वर्षांखालील मुलांसाठी मोफत फुटबॉल प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, या शिबिराचा मंगळवारी सकाळी छत्रपती शिवाजी स्टेडियमवर उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ झाला. २१ एप्रिल ते २० मे या कालावधीत हे शिबिर चालणार आहे. शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय फुटबॉल खेळाडू डॉ. मुक्ता पाटील यांच्या हस्ते झाले.अध्यक्षस्थानी बंटी सावंत हे होते.**

या शिबिराला यंदाही उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंना मूलभूत कौशल्ये, फिटनेस, तसेच खेळातील शिस्त यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. अभिजीत बेलेकर, नगरसेवक विनायक फाळके, संपत जाधव, महावीर मूग, उदय पाटील, किरण साळोखे, प्रमोद भोसले, महेश पाटील, सुशील गायकवाड आदींसह खेळाडू व क्रीडाप्रेमी उपस्थित होते. प्रास्ताविक अकॅडमीचे अध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार विजेते शिवाजी पाटील यांनी केले.

## लॉरियस वर्ल्ड स्पोर्ट्स अवॉर्ड्स २०२६: कार्लोस अल्काराझ, आर्यना सबालेन्काचा गौरव

माद्रिद,ता.२१-

**प्रतिष्ठित लॉरियस वर्ल्ड स्पोर्ट्स अवॉर्ड्स २०२६ मध्ये टेनिसपटूंचे वर्चस्व होते. स्पॅनिश टेनिस स्टार कार्लोस अल्काराझ आणि बेलारूसची आर्यना सबालेन्का यांना अनुक्रमे महिला आणि पुरुष गटात वर्षातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरवण्यात आले.**

अल्काराझने फ्रेंच ओपन आणि यूएस ओपन ही दोन ग्रँड स्लॅम विजेतेपदे जिंकून वर्षाचा शेवट जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी केला.

सबालेन्काने संपूर्ण हंगामात उत्कृष्ट कामगिरी करत अनेक मोठ्या स्पर्धांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

नोव्हाक जोकोविच आणि आयलीन गु यांनी या सोहळ्याचे सूत्रसंचालन केले. २००० साली स्थापित झालेले लॉरियस अवॉर्ड्स हे क्रीडा क्षेत्रातील सर्वात प्रतिष्ठित सन्मानांपैकी एक मानले जाते.

**लॉरियस वर्ल्ड स्पोर्ट्स अवॉर्ड्स २०२६ चे मुख्य विजेते** : वर्षातील सर्वोत्कृष्ट पुरुष खेळाडू: कार्लोस अल्काराझ, वर्षातील सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू: आर्यना सबालेन्का, वर्षातील सर्वोत्कृष्ट संघ: पॅरिस सेंट-जर्मेन,वर्षातील सर्वोत्कृष्ट उदयोन्मुख खेळाडू: लँडो नॉरिस, वर्षातील सर्वोत्कृष्ट पुनरागमन: रॉरी मॅकिलरॉय,वर्षातील सर्वोत्कृष्ट युवा खेळाडू: लॅमिन यामाल, क्रीडा प्रेरणा पुरस्कार : टोनी क्रूस





## बोरगावातील घोडागाडी शर्यतीत खंड्या ग्रुप प्रथम

बोरगाव,ता.२१-

**बोरगाव गावचे ग्रामदैवत श्री कोडी सिद्धेश्वर देवाच्या यात्रेनिमित्त भव्य घोडागाडी शर्यतींचे आयोजन करण्यात आले होते. या शर्यतीचे उद्घाटन युवा नेते उत्तम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.**

जनरल 'अ' गट घोडागाडी शर्यतीत खंड्या ग्रुप (बोरगाव) यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर राजू मगदूम (बोरगाव) यांनी द्वितीय आणि मल्हार प्रेमी (बोरगाव) यांनी तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

'आदत घोडा एक घोडा एक बैल' या स्पर्धेत हुपरी राणा (हुपरी) यांनी प्रथम क्रमांक मिळवला.



**सिद्धेश्वर देवाच्या यात्रेनिमित्त आयोजीत शर्यतींचा शुभारंभ युवा नेते उत्तम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपस्थित अन्य मान्यवर.**

त्यानंतर ओमकार वाले (सदलगा) यांनी द्वितीय, तर मेजर (शिरदवाड) यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

जनरल 'एक घोडा एक बैल' गटात मोरके बैजा यांनी प्रथम क्रमांक मिळवला, बंडा महाराज (रुही) यांनी द्वितीय, तर पांडा दिसले (तासगाव) यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

'जनरल दोन दात चार दात' या गटात वैभव पाटील (हातकणंगले यांनी प्रथम क्रमांक मिळवला. त्यानंतर रोहित बोंद्रे (दानोळी) आणि लाट बैजा (अब्दुल लाट) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवले.

तसेच 'जनरल घोडा' गटात चंदू अण्णा (बोरगाव) यांनी प्रथम, बबन बसनार (बोरगाव) यांनी द्वितीय, तर खंड्या ग्रुप (बोरगाव) यांनी तृतीय क्रमांक मिळवला.